*Smart ways for 100 % success at the HSC Board Exam*

**EXCLUSIVE STUDY MATERIAL FOR HSC RE- EXAMINER STUDENTS**

# Subject : Geography

**Prepared by**

State Council of Educational Research and Training Pune

(SCERT– Pune)

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (महाराष्ट्र)

## इयत्ता- 12 वी, पुनर्परीक्षार्थींसाठी साहित्य निर्मिती

## विषय- भूगोल

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पान क्रमांक |
|---|---|---|
| | सराव प्रश्नपत्रिका क्र- 1 | 4 |
| | सराव उत्तर पत्रिका क्र- 1 | 9 |
| | सराव प्रश्नपत्रिका क्र- 2 | 25 |
| | सराव उत्तर पत्रिका क्र- 2 | 30 |
| | सराव प्रश्नपत्रिका क्र- 3 | 42 |
| | सराव उत्तर पत्रिका क्र- 3 | 48 |
| 1 | लोकसंख्या - भाग 1 | 64 |
| 2 | लोकसंख्या - भाग 2 | 81 |
| 3 | मानवी वस्ती आणि भूमी उपयोजन | 97 |
| 4 | प्राथमिक आर्थिक क्रिया | 110 |
| 5 | द्वितीयक आर्थिक क्रिया | 124 |
| 6 | तृतीयक आर्थिक क्रिया | 133 |
| 7 | प्रदेश आणि प्रादेशिक विकास | 143 |
| 8 | भूगोल : स्वरूप व व्याप्ती | 148 |
| | उतारे व त्यावरील प्रश्न उत्तरे | 156 |

# सराव प्रश्नपत्रिका - 1

**विषय - भूगोल (39)**

**वेळ- 3.00 तास** **गुण- 80**

**सूचना**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रश्नांची उत्तरे लिहितांना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.
3) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
4) नकाशा स्टेन्सिलचा वापर योग्य तेथे करावा.
5) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
6) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.

**प्रश्न 1 अ) 'अ', 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पुर्ण करा.** 5

| अक्र | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | बंदराचा विकास | कार्यशील लोकसंख्या | मासेमारी पुरक क्षेत्र |
| 2 | 15 ते 59 वयोगट | प्लवक | तृतीयक व्यवसाय |
| 3 | दंतूर किनारा | सागरी वाहतूक | मुनष्यबळाची उपलब्धता |
| 4 | कुलुमनाली | मृदाशास्त्र | व्यापारास अनुकुल |
| 5 | प्राकृतीक भूगोलाची शाखा | पर्यटन | मातीची निर्मीती व गुणधर्म |

**प्रश्न 1 ब) अयोग्य घटक ओळखा व लिहा :** 5

**1) नागरीकरणाचे घटक -**

अ) वाहतूक व्यवस्था ब) व्यापार

ड) आरोग्य सुविधा ड) शेती

**2) प्राथमिक आर्थिक क्रिया -**

अ) फळे,कंदमुळे गोळा करणे ब) मासेमारी

क) पशुपालन ड) संदेशवहन

**3) खनिजांवर आधारित उद्योग -**

अ) कागद निर्मिती उदद्योग　　ब) लोहपोलाद उदयोग

क) सिमेंट उद्योग　　ड) ॲल्युमिनिअम उद्योग

**4) क्षेत्रीय विकास मोजण्याचे मापदंड -**

अ) शिक्षण　　ब) पर्वत

क) आयुर्मान　　ड) लोकसंख्या गुणवत्ता

**5) मानवी भूगोलाच्या शाखा -**

अ) लोकसंख्या भूगोल　　ब) राजकीय भूगोल

क) आर्थिक भूगोल　　ड) मृदा भूगोल

**प्रश्न 1 क) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** 5

**1) अक्षांशांशी थेट संबंध नसलेला प्राथमिक व्यवसाय**

अ) लाकूडतोड　　ब) मासेमारी

क) खाणकाम　　ड) शेती

**2) या वाहतुकीमुळे नवनवीन भूमीचा शोध लागला**

अ) हवाई वाहतूक　　ब) रेल्वे वाहतूक

क) सागरी वाहतूक　　ड) रस्ता वाहतूक

**3) साक्षरतेचे प्रमाण कमी असलेला प्रदेश**

अ) पूर्व व आग्नेय आशिया　　ब) उत्तर अमेरिका

क) दक्षिण आशिया　　ड) युरोप

**4) प्राकृतिक घटकांच्या आधारे ठरवलेला प्रदेश**

अ) कार्यात्मक प्रदेश　　ब) प्राकृतिक प्रदेश

क) औपचारिक प्रदेश　　ड) राजकीय प्रदेश

**5) सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विषयांचा अभ्यास करणारी भूगोलाची मुख्य शाखा**

अ) आर्थिक भूगोल　　ब) प्राकृतिक भूगोल

क) मानवी भूगोल　　ड) राजकीय भूगोल

**प्रश्न 1 ड) 'बरोबर' की 'चूक' ते लिहा** 5

1) भारतात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात नाही.

2) भूगोल विषयाचे स्वरूप गतिशील आहे.

3) नागपुर शहर हे कार्यात्मक प्रदेश आहे.

4) तुलनात्मक दुष्ट्र्या सागरी वाहतुक खर्चीक असते.

5) लाकुडतोड हा प्राथमिक व्यवसाय आहे.

**प्रश्न 2 ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही चार)** 12

1) वाहतुकीच्या सोयीमुळे लोकवस्तीत वाढ होते ?

2) कॅनडामध्ये लाकूडतोड व्यवसायाचा विकास झाला आहे. ?

3) कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक फळप्रक्रिया उद्योग स्थापित झालेले आढळतात. ?

4) हिमालयीन पर्वतीय प्रदेशाचा विकास फारसा झालेला नाही. ?

5) हवाई वाहतुकीचे प्रमाण वाढत आहे.?

**प्रश्न 3 ) खालील संज्ञांमध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन)** 9

1) ओसाड भूमी आणि बिगरशेती भूमी

2) लोकसंख्या वितरण: मैदानी प्रदेश आणि पर्वतीय प्रदेश

3) लोकंसंख्येची ग्रामीण रचना आणि शहरी रचना.

4) हवाई वाहतूक आणि जलवाहतूक

5) प्राकृतीक प्रदेश आणि राजकीय प्रदेश

**प्रश्न 4. अ) जगाच्या नकाशामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या सहाय्याने सुचिसह दाखवा (कोणतेही सहा)** **6**

1) सर्वाधिक लोकसंख्या घनता असलेला आशियातील एक देश

2) सक्तीने स्थलांतरास भाग पाडणारा राजकीय अस्थिर एक देश.

3) भारतातील कोणतेही एक धार्मिक केंद्र

4) अरबी समुद्रातील खाणकाम क्षेत्र


5) पंचमहासरोवराजवळील औद्योगिक क्षेत्र

6) सेंटलुशिया

7) सेशेल्स

8) युगांडा

प्रश्न 4. ब) खालील आलेखाचे वाचन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा 5




1) दिलेल्या आकृतीत काय दर्शविले आहे ?

2) कोणत्या खंडात लोकसंख्या सर्वात जास्त आहे ?

3) आकृतीत लोकसंख्येची टक्केवारी कमी असलेला खंड कोणता आहे ?

4) 16.96% टक्केवारी कोणत्या खंडाची आहे?

5) या आकृतीमध्ये किती खंड दर्शविले आहेत?

**प्रश्न 5 ) खालील विषयांवर संक्षिप्त टीपा लिहा: (कोणतेही तीन) 12**

1) सखोल उदरनिर्वाह शेतीचे वैशिष्टे

2) कच्च्या मालाच्या स्त्रोतानुसार उदयोगांचे वर्गीकरण

3) मासेमारी व्यवसायावर परिणाम करणरे घटक

4) भूगोल अभ्यासकाची कौशल्ये

5) भूगोलातील आधुनिक कल

**प्रश्न 6 अ) खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4**

मानव खनिजांचा उपयोग प्राचीन काळापासून करत आला आहे. हत्यारे, अवजारे, दागिने, भांडी, औषधे इत्यादी तयार करण्यासाठी खनिजांचा वापर केला जात असे. मानवाच्या सांस्कृतिक उत्क्रांतीचे वेगवेगळे टप्पे ही त्यांच्या खनिज वापराशी निगडित आहेत. पाषाण युगाच्या शेवटच्या टप्प्यावर मानवाने भूमिगत खाणकामाचे कौशल्य आत्मसात केले. अनुक्रमे कास्ययुग, ताम्रयुग, लोहयुग, अणुयुग या क्रमाने कालखंड खनिजांच्या वापरानुसार अधोरेखीत करण्यात आले. या प्राथमिक आर्थिक क्रियेतूनच मानवाची प्रगती होत गेली आहे. मानवाने समुद्र आणि महासागराच्या तळातून सुद्धा खनिज तेल व नैसर्गिक वायूंचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली आहे.

**प्रश्न :**

1) मानवाने खनिजांचा उपयोग कोणकोणत्या वस्तू बनवण्याकरिता केला आहे?

2) मानवाने भूमिगत खाणकामाचे कौशल्य केव्हा आत्मसात केले?

3) खनिजांच्या वापरानुसार कोणकोणते कालखंड आहेत?

4) मानवाने महासागराच्या तळातून कोणकोणती उत्पादने घेतली आहेत?

**प्रश्न 6. ब) आकृती काढून नावे दया (कोणतेही दोन) 4**

1) वयोरचनेचा संकोचनारा मनोरा

2) रेषीय वस्ती

3) लोकसंख्या संक्रमण सिध्दान्ताचे विविध टप्पे

**प्रश्न 7. सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही एक) 8**

1) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक घटक उदाहरणासहित स्पष्ट करा.

2) नागरी भूमी उपयोजन स्पष्ट करा.

# सराव उत्तरपत्रिका- 1

**प्रश्न 1 अ) 'अ', 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पुर्ण करा. 5**

**उत्तर-**

| अक्र | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | बंदराचा विकास | सागरी वाहतूक | व्यपारास अनुकुल |
| 2 | 15 ते 59 वयोगट | कार्यशील लोकसंख्या | मुनष्यबळाची उपलब्धता |
| 3 | दंतूर किनारा | प्लवक | मासेमारी पुरक क्षेत्र |
| 4 | कुलुमनाली | पर्यटन | तृतीय व्यवसाय |
| 5 | प्राकृतीक भूगोलाची शाखा | मृदाशास्त्र | मातीची निर्मीती व गुणधर्म |

**प्रश्न 1 ब) अयोग्य घटक ओळखा व लिहा : 5**

1) ड) शेती
2) ड) संदेशवहन
3) अ) कागद निर्मिती उदद्योग
4) ब) पर्वत
5) ङ) मृदा भूगोल

**प्रश्न 1 क) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : 5**

1) क) खाणकाम - खाणकाम व्यवसायाचा अक्षांशांशी थेट संबंध नसतो.
2) क) सागरी वाहतूक - सागरी वाहतुकीमुळे नवनवीन भूमीचा शोध लागला
3) क) दक्षिण आशिया- दक्षिण आशिया प्रदेशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे
4) ब) प्राकृतिक प्रदेश - प्राकृतीक घटकांच्या आधारे ठरवलेला प्रदेश हा प्राकृतीक प्रदेश असतो.
5) क) मानवी भूगोल - सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विषयांचा अभ्यास करणारी मानवी भूगोल ही मुख्य शाखा आहे.

**प्रश्न 1 ड) 'बरोबर' की 'चूक' ते लिहा** **5**

1) चुक
2) बरोबर
3) बरोबर
4) चुक
5) बरोबर

**प्रश्न 2 ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही चार) 12**

**1) उत्तर-**

① वाहतूक मार्ग जगाला - जगाशी जोडतात त्यामुळे ते नेहमीच विकासासाठी आधारभुत असतात कोणत्याही प्रदेशात जाण्या- येण्यास सुलभता ही त्या प्रदेशातील लोकसंखेची घनता वाढवते.

② वाहतुक मार्ग एकत्र आलेल्या प्रदेशात व्यापार व उदयोग विषयक घटकांना चालना मिळते त्याच बरोबर रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्याने अशा प्रदेशात लोकसंख्या वाढत असते.

③ सागरी वाहतुकीमुळे नवीन भूमीचा शोध व बंदराचा विकास होत असतो, सागरी वाहतुकीमुळे व्यापार वाढतो व रोजगार निर्मीती होते, बंदरे व गोंदीच्या समृध्दीतुन लोकवस्ती वाढत जाते.

④ रस्ते, रेल्वे वाहतुकीच्या जाळे असणाऱ्या ठिकाणी बाजारपैंठाची निर्मीती होवुन रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत असल्याने अशा ठिकाणी लोकवस्तीत वाढत जाते. उदा. मुबंई

⑤ रस्ते, रेल्वे, हवाई व जलवाहतुक ही पर्यटन व्यवसास चालना देतात व त्यातुन पर्यटन स्थळी लोकवस्ती वाढत जाते.

**2) उत्तर-**

① कॅनडा हा देश समशीतोष्ण हवामानाच्या प्रदेशात येतो.

② येथे सुचीपर्णी वनांचे क्षेत्र अधिक आढळते.

③ या वनात एकाच जातीचे वृक्ष विस्तृत प्रदेशात आढळतात.

④ या वनातील वृक्ष सरळ, उंच वाढतात व लाकूड मऊ असल्याने याला मागणीही खूप असते.

⑤ वृक्षतोडीसाठी आधुनिक यंत्रांचा वापर केला जातो.

⑥ तसेच कॅनडामध्ये इतर व्यवसायाचे प्रमाण कमी आहे.

त्यामुळे कॅनडामध्ये लाकूडतोड व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे..

**3) उत्तर-**

① उदयोगांसाठी लागणारा कच्चा माल प्रामुख्याने शेती, खाणकाम, वने व मासेमारी यातून मिळत असतो. उद्योगाची स्थान निश्चिती निसर्गातून उपलब्ध होणाऱ्या कच्च्या मालाच्या स्वरूपावर अवलंबून असते.

② नाशवंत, वजनात घट होणाऱ्या कच्च्यामालावर आधारीत उदयोग कच्चामाल उत्पादन क्षेत्राजवळ स्थापन करणे योग्य असते.

③ कोकणात आंबा, फणस, कोकम, काजु, ताग, नारळ, राणमेवा सारख्या फळांचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असते. ④ फळे नाशवंत असल्याने त्यांच्यावर प्रक्रिया करणे व ते हवाबंद डब्यात डब्यात भरणे या क्रिया त्वरित होणे गरजेचे असते. म्हणुन कोकणातील उत्पादीत फळांवर त्वरील प्रकीया करुन जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याच्या दुष्ट्रीकोणातुन कोकणात स्थानिक फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापित झालेले आढळतात.

**4) उत्तर-**

① प्रदेशाच्या विकासावर तेथील हवामान व प्राकृतीक रचनेचा मोठा प्रभाव असतो. हिमालयीन प्रदेश हा जगातील सर्वात उंच पर्वतश्रेणीचा प्रदेश असुन तेथील पर्वतांवर थंड हवामान आहे व अनेक शिखरे बर्फाच्छादित आहेत.

② हिमालयीन पर्वत श्रेणीमध्ये प्रतिकुल भौगोलिक स्थिती असल्याने तेथे शेती व्यवसायाचा फारसा विकास झालेला नाही. जलसिंचनाच्या सोयी विकसीत झालेल्या नाहीत.

③ तसेच तेथे उंचसखलपणा तीव्र उतार यामुळे वाहतूक सुविधांचा देखिल फारसा विकास झालेला नाही.

④ वाहतुकीच्या मर्यादा व शेतीसाठी प्रतीकुल परिस्थिती यामुळे मोठे उदयोगधंदे व व्यावसायासाठी येथे अनुकुल परिस्थिती उपलब्ध नाही.

⑤ हिमालयीन प्रदेशात जास्त उंची, थंड हवामान, तीव्र उतार, अरण्ये, निकृष्ट मृदा, उंचसखलपणा, मोठया उदयोगधंदयाचा अभाव यासारख्या प्रतिकुल घटकांमुळे लोकसंख्या विरळ आढळते व त्यामुळे फारसा विकास झालेला नाही.

**5) उत्तर-**

① हवाई वाहतुक सर्वात आधुनिक व वेगवान वाहतूकीचे साधन असल्याने वेळची बचत होते.

② नाशवंत उत्पादने, मौल्यवान उत्पादने, वजनाने हलक्या मालाची वाहतूक व आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक यासाठी हवाई वाहतुकीचा वापर वाढत आहे.

③ देशांच्या संरक्षण यंत्रनेतही हवाई वाहतूकीचे प्रमाण दिवसे दिवस वाढत आहे.

④ अपघात, नैसर्गीक आपत्ती, आपत्कालीन स्थितीच्या वेळी मदत व बचाव कार्यात हवाई वाहतुकीस महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

⑤ जीवनावश्यक औषधांचा तातडीने पुरवठा करण्यास हवाई वाहतुक महत्वाची भूमीका बजावते.

⑥ जगातील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय औदयोगिक, व्यापारी महानगरे हवाई वाहतूकीमुळे जोडली गेलेली आहे. लोकांचे राहणीमान उंचावत असल्याने हवाई वाहतूकीची पसंती वाढली आहे.

⑦ तंत्रज्ञानातील बदलामुळे, व्यापारातील वाढत्या मागणीमुळे, जलद गतीमुळे, वेळेची बचत होत असल्याने हवाई वाहतूकीचे प्रमाण वाढत आहे.

**6) उत्तर-**

① भूगोलात पृथ्वीच्या प्राकृतीक पर्यावरणाबरोबरच व मानवी क्रिया व त्यांच्या परस्परांशी असलेला संबंध अभ्यासला जातो.

② पृथ्वीवरील नैसर्गिक घटकांमध्ये व मानवी घटकामध्ये सदैव परिवर्तन आढळते व या घटकांमध्ये विविधता आहे, या विविधतेचा अभ्यास भूगोलात केला जातो.

③ घटकांचे वितरण, प्रारुप व विविधता यांचा अभ्यास भूगोल अभ्यासक करतात. थोडक्यात कार्यकारणभाव जाणून घेणे हा भूगोल अभ्यासकाचा मुख्य हेतू आहे.

④ स्थळ क्षेत्र किंवा भौगोलिक स्थानाचाही अभ्यास भूगोलात करतात.

⑤ आधुनिक काळात भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) व भौगोलिक स्थान निश्चिती प्रणाली (GPS) या तंत्रज्ञानाचा वापर भूगोलात केला जातो.

⑥ भूगोल विषयाचा अभ्यास निरीक्षण, वर्णन, विश्लेषण, सादरीकरण करताना आज दृकश्राव्य साधने, संगणक, माहिती तंत्रज्ञान, उपग्रहीय वापर, GIS, GPS या सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो.

थोडक्यात निसर्ग व मानव परीवर्तनशील आहेत व गतिशील आहेत. त्यामुळे भूगोल विषयाचे स्वरुप हे गतीशील आहे.

**प्रश्न 3) खालील संज्ञांमध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन)** **9**

1) **उत्तर -**

| **ओसाड भूमी** | **बिगरशेती भूमी** |
|---|---|
| 1) ओसाड भूमी प्रकार ग्रामीण भूमी उपयोजनात आढळून येते. | 1) बिगर शेती भूमी उपयोजन ग्रामीण व नागरी या दोन्हीं भूमी उपयोजनात आढळून येते. |
| 2) उंचसखल, डोंगराळ भूमी, वाळवंट, घळीयुक्त भूमी या सारख्या अनुत्पादक घटकात ओसाड भूमी मोडली जाते. | 2) ग्रामीण व नागरी भागातील वस्ती, पायाभूत सोयी, रस्ते,महामार्ग, लोहमार्ग, कालवे, उदयोग, दुकाने, व्यापारी संकुल इ. चा या प्रकारात समावेश होतो. |
| 3) ग्रामीण भागातील हा भूमी प्रकारातुन कोणत्याही प्रकारचे उत्पादन घेतले जात नाही. | 3) बिगरशेती भूमी प्रकारात अनुत्पादन व उत्पादक अशा दोन्ही प्रकारातील भूमी उद्देशानुसार वापरात आणली जाते. |
| 4) हा भूमी प्रकार कोणत्याही प्रकारचे तंत्रज्ञान वापरुन शेतीसाठी वापरता येत नाही अशी भूमी या प्रकारात मोडते. | 4) व्दितीयक व तृतीय व्यवसायात होणाऱ्या बदलानुसार या श्रेणीतील भूमीचा वापर वाढत जातो. |

2) **उत्तर -**

| **लोकसंख्या वितरण: मैदानी प्रदेश** | **लोकसंख्या वितरण: पर्वतीय प्रदेश** |
|---|---|
| 1 100 मीटर पेक्षा कमी उंची असलेल्या सपाट व मंद उताराच्या प्रदेशास मैदानी प्रदेश म्हणतात | 1 1000 मी. पेक्षा उंच, तीव्र उतार व शिखराकडे निमुळत्या होत गेलेल्या उंच प्रदेशास पर्वतीय प्रदेश म्हणतात. |
| 2 मैदानी प्रदेशात जमीनीच्या सपाट भाग किंवा मंद उतारामुळे लोकसंख्येचे वितरण दाट आढळून येते. | 2 पर्वतीय प्रदेशात तीव्र उतारामुळे लोकसंख्येचे वितरण विरळ आढळते. |
| 3 या प्रदेशात सुपिक गाळाची मृदा, जलसिचंन शेती सुघमता यामुळे लोकसंख्या वाढीस पुरकस्थिती असते. | 3 पर्वतीय प्रदेशात ओसाड किंवा नापिक जमीन, दुर्गम भाग, पाण्याचा अभाव यामुळे लोकसंख्या विरळ असते. |
| 4 सपाट किंवा मंद उतारामुळे या प्रदेशात वाहतुक सुविधांचा विकास झालेला असतो. | 4 तीव्र उतार व उंचसखलपणा यामुळे वाहतूक मार्ग फारसे विकसीत नसतात. |
| 5 मैदानी प्रदेशात कच्च्या मालाची उपलब्धता, वाहतूक सुविधा या सारख्या पुरक स्थिती उपलब्ध | 5 शेती अयोग्य जमीन, घनदाट जंगले दुर्गम प्रदेश यामुळे उदयोगधदयांना फारशी चालणा मिळालेली |

| | |
|---|---|
| असल्याने उदयोगधंदयाचा विकास झालेला असतो. त्यामुळे लोकसंख्या एकवटलेली असते. | नसते. |
| 6 उदा. भारतातील गंगा सिधु नदीचे खोरे, इजिप्त मधिल नाईल नदीचे खोरे, मिसिसीपी नदीचे खोरे | 6 उदा. हिमालय पर्वत, रॉकी, अँडीज, ॲपलेशियन पर्वत रांगा |

3) **उत्तर -**

| ग्रामिण रचना | शहरी रचना |
|---|---|
| 1 प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या कर्यशील लोकसंख्येचा वर्ग जेथे जास्त असतो तो ग्रामीण वस्ती रचना म्हणतात. | 1) व्दितीय व तृतीयक व्यवसायात कार्यशील लोकससंख्या जास्त गुंतलेली असते अशा भागास शहरी किंवा नागरी वस्ती रचना म्हणतात. |
| 2) ग्रामिण भागतील लोकांचे राहणीमान हे साधे असते. मर्यादीत सेवा वापरतात. | 2) शहरी भागातील लोकांचे रहाणीमान चांगले व उच्च दर्जाचे असते. विविध सेवा व्यवसांचा ते वापर करतात. |
| 3) ग्रामिण भागात लोकसंख्या कमी असते. | 3) शहरी भागात लोकसंख्या जास्त असते. |
| 4) ग्रामिण वस्ती रचनेत पायाभुत सुविधांची कमतरता असते. | 4) शहरी वस्ती रचनेत पायाभुत सुविधा उपलब्ध असतात. |
| 5) या वस्ती रचनेत अनेक अपकर्षक घटक असल्याने ग्रामीण भागातुन अनेक लोक स्थलांतर करतात. | 5) शहरी वस्ती रचनेत आकर्षक घटक असल्याने मोठया प्रमाणात लोक स्थलांतर करुन येथे येतात. |


4) **उत्तर -**

| हवाई वाहतूक | जलवाहतूक |
|---|---|
| 1) सर्वात महाग वाहतूक प्रकार आहे. | 1) सर्वात स्वस्त वाहतुक प्रकार आहे. |
| 2) मौल्यवान व नाशंवत माल वाहतुकीसाठी उपयुक्त आहे. | 2) अवजड वाहतूकीसाठी उपयुक्त आहे. |
| 3) वाहतुक क्षमता कमी किंवा मर्यादित असते. | 3) वाहतुक क्षमता जास्त असते. |
| 4) वाहतुकीचा वेगवान प्रकार आहे, वेळ कमी लागतो. | 4) जलवाहतुकीचा वेग कमी असतो व वेळ जास्त लागतो. |
| 5) अपघात, नैसर्गीक आपत्ती, युध्दजन्य परीस्थितीत बचाव व मदत कार्यात उपयुक्त. | 5) राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व्यापारास उपयुक्त असल्याने देशाच्या विकासात महत्वाची भूमीका असते. |

5) **उत्तर -**

| प्राकृतीक प्रदेश | राजकीय प्रदेश् |
|---|---|
| 1) प्राकृतीक घटकांच्या आधारे ( हवामान, नदया, मृदा, वनस्पती, वन्यजीवन, भूरचना इ. ) ठरलेल्या प्रदेशांना प्राकृतीक प्रदेश म्हणतात. | 1) मानवी घटकांच्या आधारे (भाषा, वंशिकता इ.) ठरवलेल्या प्रदेशांना राजकीय प्रदेश म्हणतात. |
| 2) प्राकृतीक प्रदेशांच्या सिमा निश्चित असतात. | 2) राजकीय घटकांच्या सिमा निश्चित करणे तुलनेने कठीण असते. |
| 3) वाळवंटी प्रदेश, पर्वतीय प्रदेश, गवताळ प्रदेश, मोसमी हवामान प्रदेश, इ. | 3) विविध जिल्हयांच्या सिमा, विदयापिठांचे क्षेत्र, राज्य इ. |

**प्रश्न 4. अ) जगाच्या नकाशामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या सहाय्याने सुचिसह दाखवा (कोणतेही सहा)** **6**




**प्रश्न 4. ब) खालील आलेखाचे वाचन करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा** **5**

1) **उत्तर-** दिलेल्या आकृतीत लोकसंख्येचे चे वितरण (सन 2019) दर्शविलेले आहे.

2) **उत्तर-** आशिया खंडात लोकसंख्या जास्त आहे.

3) **उत्तर-** आकृतीत ऑस्ट्रेलिया खंडाची टक्केवारी सर्वात कमी आहे.

4) **उत्तर-** आफ्रिका खंडाची टक्केवारी 16.96% आहे.

5) **उत्तर-**दिलेल्या आकृतीत सहा खंड दर्शविलेले आहेत.

**प्रश्न 5 ) खालील विषयांवर संक्षिप्त टीपा लिहा: (कोणतेही तीन)** **12**

1) **उत्तर -**

सखोल उदनिर्वाह शेती म्हणजे शेतकरी व त्याच्य कुटुंबीयांच्या गरजा भागविण्यासाठी केली जाणारी पिकांची लागवड आणि त्याबरोबर केले जाणारे पशुपालन होय. या शेतीस पौर्वात्य शेती देखिल म्हणतात.

① या शेती प्रकारात शेतजमिनीचा आकार लहान असतो.

② शेतीचा आकार लहान असल्याने शेतकरी कमीतकमी जागेत जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा प्रयत्न करतो. वर्षातुन दोन ते तीन पीके घेतली जातात. या शेती प्रकारात सेद्रींय खतांचा वापर केला जातो.

③ या शेती प्रकारात विविध पिके घेतली जातात परंतु अन्नधान्याच्या उत्पादनास प्राधान्य दिले जाते. या शेती प्रकारात तांदुळ हे मुख्य पिक घेतले जाते.

④ सखोल उदरनिर्वाह शेती प्रकारात मोठया प्रमाणात मानवी श्रमाव्दारे कामे केली जातात, त्यामुळे मजुरांची आवश्यकता असते बैल, रेडा या सारख्या प्राण्यांचा देखील वापर या शेती प्रकारात होत असतो.

⑤ ही शेती प्रामुख्याने चीन, भारत, जपान, कोरिया, श्रीलंका पूर्व आशिया खंडातील काही देशांमध्ये केली जाते.

⑥ जगातील काही भागात या शेतीतुन एक पिक पध्दतीने भात (तांदूळ) हे प्रमुख पीक घेतले जाते. मका, गहू, कडधान्ये, बार्ली, ज्वारी या प्रकाराची पिके देखिल घेतली जातात.


⑦ मर्यादीत क्षेत्रातुन जास्तीत जास्त उत्पादन घेतले जात असल्याने प्रति हेक्टरी जास्त उत्पादकता असते परंतु अवलंबुन असलेल्या व्यक्तींचे प्रमाण जास्त असल्याने दरडोई उत्पादन कमी असते.

2) **उत्तर -**

उदयोगांचे प्रमुख वर्गीकरण हे त्यांचा i) आकार, ii) कच्च्या मालाचे स्त्रोत, iii) उत्पादनाचे स्वरुप आणि iv) उदयोगाचा मालकी हक्क यांच्या आधारे केले जात असते त्या पैकी आपण कच्च्या मालाच्या स्त्रोतानुसार उदयोगांचे वर्गीकरण पाहू-

① **<u>कृषी आधारित उद्योग</u>** - या प्रकारच्या उद्योगांमध्ये कृषी उत्पादनावर प्रक्रिया केली जाते. उदा. साखर कारखाने, कापड गिरण्या, अन्नप्रक्रिया इत्यादी.

② **<u>सागरी उत्पादनावर आधारित उद्योग</u>**- यामध्ये मत्स्योत्पादनावर प्रक्रिया करून डबाबंद करणे. याशिवाय मोती, शंखशिंपले, मत्स्यतेल, शोभिवंत वस्तू या बाबींचा समावेश होतो.




③ **<u>वनाधारित उद्योग</u>** - यामध्ये वनांपासून मिळणाऱ्या बाबींवर प्रक्रिया करून उत्पादन घेतले जाते. कागदनिर्मिती, जहाजबांधणी, इमारतींसाठी तसेच विविध उपयोगांसाठी लाकूड वापरले जाते. राळ, डिंक, रंग, वंगण, तेल, सुगंधी द्रव्य हे उद्योग यावर आधारित आहेत.

④ **<u>खनिजांवर आधारित उद्योग</u>**- खाणकामातून मिळविलेल्या खनिजसंपत्तीवर आधारित उत्पादनांचा समावेश या उद्योगांत केला जातो. पेट्रोकेमिकल्स, लोहपोलाद आणि ॲल्युमिनिअमचे घटक ही याची प्रमुख उदाहरणे आहेत.

⑤ **<u>प्राणिजन्य उद्योग</u>** - मांस प्रक्रिया आणि दुग्धोत्पादन प्रक्रिया यात अंतर्भूत आहेत. हे उद्योग पशुपालनातून प्राप्त होणाऱ्या कच्च्या मालावर आधारित असतात. प्राण्यांचे केस, कमावलेली कातडी, हाडे, शिंग, दूध, मांस इत्यादी कच्चा माल या उद्योगात वापरला जातो. उदा. बॅगा, चपला, बूट इत्यादी. दुग्ध उत्पादने जसे, चीज, दही, मिष्टान्न हे पदार्थ बनतात. रेशीम कापड, लोकरीचे कापड, जॅकेट इत्यादी वस्तू या उद्योगात तयार होतात.

3) **उत्तर -**

मासेमारी या प्राथमिक व्यवसायावर अनेक प्राकृतिक आणि मानवी घटकांचा परिणाम होतो. या व्यवसायाचे सुरुवातीचे - स्वरूप उपजीविकेपुरते मर्यादित होते परंतु आता व्यापारी तत्वावर चालणारी महत्वाची प्राथमिक आर्थिक क्रिया आहे.

① **भूखंड मंच**- समुद्राचा असा भाग जो 200 मी. पेक्षा कमी खोल आहे अशा उथळ समुद्रास भूखंड मंच म्हणतात. उदा., वायव्य पॅसिफिक महासागरातील चीनजवळील ओखोत्स्क. या भागात माशांची उत्पत्ती मोठया प्रमाणात होत असल्याने येथे मासेमारी मोठया प्रमाणात होते.

② **उष्ण व थंड सागरी प्रवाहांचा संगम**- उष्ण व थंड सागरी प्रवाहांचा संगम ज्या ठिकाणी होतो व असे प्रवाह जर भूखंड मंचावर एकत्र होत असल्यास अशा प्रदेशांत प्लवकांची वाढ मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात माशांची पैदास होते. असे प्रदेश निसर्गतः मासेमारीची क्षेत्रे म्हणून

प्रसिद्धीस येतात. उदा. क्युरोशियो उष्णप्रवाह व ओयाशियो थंड प्रवाह जपानजवळ एकत्र येतात. या प्रदेशात मासेमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो.

③ **मासेमारी कौशल्य-** जपान आणि चीनसारख्या काही देशांमध्ये मासेमारीचे पारंपरिक कौशल्य उच्च दर्जाचे आहे, त्यामुळे तेथे हा व्यवसाय जास्त वृद्धिंगत झाला आहे.

④ **समुद्र सानिध्य स्थान** - जमिनीची कमतरता, जास्त लोकसंख्या आणि प्रथिनांचा पुरवठा करणाऱ्या इतर अन्नघटकांची टंचाई यामुळे बेट स्वरूपातील देशांना मासेमारीवर अवलंबून राहावे लागते. उदा. जपान, फिलिपाइन्स. त्यामुळे येथे हा व्यवसाय परंपरेने आर्थिक व्यवसाय म्हणून विकसित झाला.

⑤ **इतर व्यवसायांची कमतरता-** इतर व्यवसायांची कमतरता देखील मासेमारी व्यवसायाच्या वाढीस कारणीभूत आहे.

⑥ **तंत्रज्ञान-** अद्ययावत तंत्रज्ञानाच्या वापरामुळे हा व्यवसाय वाढीस लागला आहे.


⑦ **दंतूर किनारे-** दंतूर किनारे उत्तम बंदरांच्या निर्मितीस सहाय्यक ठरतात.

⑧ **शितगृहे-** उच्च अक्षवृत्तीय प्रदेशामध्ये मासे हा नाशवंत पदार्थ सहज साठवता येतो. उष्ण कटिबंधात मात्र त्यासाठी शीतगृहांची सोय करावी लागते.

**4) उत्तर -**

① **निरीक्षण व त्यांच्या नोंदी** - भूगोलाच्या अभ्यासात निरीक्षण कौशल्यास महत्त्व आहे. भौगोलिक घटक व या घटकांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम यांचे अचूक निरीक्षण करून त्यांच्या नोंदी ठेवण्याचे कौशल्य हे प्रत्येक भूगोल अभ्यासकाच्या अंगी असणे गरजेचे आहे.

② **नकाशा काढणेः-** भूगोलामध्ये अनेक घटकांचे वितरण हे नकाशाच्या साह्याने दर्शवले जाते. त्यामुळे नकाशा काढणे व त्याची वाचन करणे इत्यादी कौशल्य भूगोलात अत्यंत महत्त्वाचे आहे.




③ **आधुनिक तंत्रज्ञान व उपकरणाच्या साह्याने भू सर्वेक्षणः** आधुनिक काळात सुदूर संवेदन, भौगोलिक माहिती प्रणाली, भौगोलिक स्थान निश्चिती तसेच उपग्रहाच्या साह्याने भू सर्वेक्षण करण्याच्या कौशल्यास भूगोलाच्या अभ्यासात महत्त्वाचा आहे. ज्यामुळे अचूक भू सर्वेक्षणाद्वारे प्राप्त होणाऱ्या माहितीच्या साह्याने भविष्यातील योग्य नियोजन करण्यास व अंदाज वर्तवण्यास मदत होते.

④ **सर्वेक्षण, छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा इत्यादी द्वारे विदा माहितीचे संकलन :-** सर्वेक्षण, छायाचित्रे, उपग्रह प्रतिमा इत्यादींचे अचूक निरीक्षण व वाचन करून त्याद्वारे मिळणाऱ्या माहितीचे संकलन करता आले पाहिजे. उपग्रहाद्वारे अचूक सांख्यिकीय माहिती प्राप्त होण्यास मदत होते

⑤ **विदा संघटन** :- विविध स्त्रोताद्वारे प्राप्त झालेल्या विदाचे योग्य असे संघटन भूगोल अभ्यासकाला करता आले पाहिजे ज्याद्वारे त्या माहितीला अर्थ प्राप्त होईल.

⑥ **विदा सांख्यिकीय माहिती विवेचन व विश्लेषण-** विविध स्त्रोताद्वारे प्राप्त केलेल्या भौगोलिक विदाचे अचूक संघटन केल्यानंतर तिचे विवेचन करता आले पाहिजे. माहितीचे अचूक विवेचन करण्याचे कौशल्य भूगोलामध्ये गरजेचे आहे ज्याद्वारे अचूक भौगोलिक माहिती मांडणी करता येईल भूगोलामध्ये प्राप्त झालेली प्राकृतिक, मानवी घटका संदर्भातील सांख्यिकीय माहितीचे विविध संख्याशास्त्रीय, गणितीय तंत्रांचा वापर करून अचूक विश्लेषण करणे गरजेचे आहे. यासाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण करावयाचे कौशल्य भूगोल अभ्यासकात असणे महत्त्वाचे आहे.

⑦ **आलेख व नकाशाद्वारे विदाचे सादरीकरणः** भौगोलिक विदांचे आलेख व नकाशाद्वारे सादरीकरण करणे गरजेचे आहे. ज्याद्वारे भौगोलिक विदांचे वितरण सहज एका दृष्टिक्षेपात समजण्यास मदत होईल, तिची तुलना करता येईल यासाठी आलेख व नकाशा काढण्याचे कौशल्य भूगोल अभ्यासकाला असणे गरजेचे असते.

⑧ **अहवाल लेखन आणि निष्कर्ष सादरीकरणः** मिळालेली भौगोलिक माहिती, विदा यांचे संघटन, विश्लेषण केल्यानंतर त्या माहितीवरून अचूक निष्कर्ष काढणे व आलेल्या निष्कर्षाच्या आधारित अहवाल लेखन करण्याचे कौशल्य भूगोलामध्ये भूगोल अभ्यासकाला अवगत असावे लागते.

**5) उत्तर -**

भूगोलतज्ज्ञ मूलभूत घटकांचे स्पष्टीकरण कार्यकारणभावाच्या चौकटीत राहून करतात. त्याचा उपयोग माहितीचे संकलन आणि नमुन्यांच्या आधारे विदा विश्लेषणाबरोबर अंदाज वर्तविण्यासाठी होतो. त्यामुळे आंतरशाखीय कक्षा विकसित होऊन भूगोलाची व्याप्ती वाढत आहे.

① भूगोलाच्या गतिमान स्वरूपामुळे या विषयात अनेक गोष्टींची भर पडत आहे. दृकश्राव्य माध्यम आणि माहिती तंत्रज्ञानामुळे भूगोलात माहिती स्रोत समृद्ध झाले आहेत.

② भूगोलात तंत्रज्ञान, संगणक आणि संगणक प्रणालीचा वापर यांमुळे माहितीचे संकलन, विदा विश्लेषण, सादरीकरण यामुळे चांगल्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

③ भूगोलाच्या अभ्यासासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (G.I.S.) आणि जागतिक स्थाननिश्चिती प्रणाली (G.P.S.) अनिवार्य आहेत. अलीकडे नकाशे G.I.S. च्या प्रणाली आधारे तयार करतात.

④ भूगोलामध्ये गणितीय प्रतिकृती व संगणकीय प्रतिकृती अलीकडे मोठ्या प्रमाणात वापरल्या जात आहेत. या प्रतिकृतींच्या आधारे भविष्यातील लोकसंख्येची वृद्धी आणि घनता, भूमी उपयोजन, शेतीकरणाचे प्रमाण, लोकसंख्येचे स्थलांतर, प्रारूप् औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि झोपडपट्ट्यांची वाढ या विषयी अंदाज वर्तविले जातात.

⑤ हवेच्या स्थितीचा अंदाज, हवामान बदल, समुद्र पातळीतील बदल, पर्यावरणातील प्रदूषण, मृदा अपक्षरण, निर्वनीकरण आणि भूआकारांची निर्मिती यांसाठी भूगोलात विविध तंत्रज्ञान व उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

⑥ भूगोलात प्रगत सांख्यिकीय तंत्र आणि संगणक प्रणाली (Programmes) यांचा वापर भूपृष्ठीय आणि भौगोलिक घटकांच्या अभ्यासात आणि स्पष्टीकरणात आवश्यक विश्वसनीय माहिती संकलनासाठी केला जात आहे. संगणकावर वापरण्यात येणाऱ्या स्वरूपात माहिती पुरविल्यास त्याचा उपयोग भौगोलिक पर्यावरणातील अनेक घटकांचे मोजमाप करण्यासाठी उपयोग होत आहे.

⑦ भूगोलात भविष्यात नकाशाकार, हवामान बदल विश्लेषक, हवामान तज्ञ, लोकसंख्या शास्त्रज्ञ, भूअंतराळ विश्लेषक म्हणुन मोठया संधी उपलब्ध आहेत.

**प्रश्न 6 अ) खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4**

1) उत्तर- मानवाने खनिजांचा उपयोग हत्यारे, अवजारे, दागिने, भांडी, औषधे तयार करण्यासाठी केला आहे.


2) उत्तर- पाषाण युगाच्या शेवटच्या टप्प्यावर मानवाने भूमिगत खाणकामाचे कौशल्य आत्मसात केले.

3) उत्तर- खनिजांच्या वापरानुसार कास्ययुग, ताम्रयुग, लोहयुग, अणुयुग असे कालखंड आहेत.


4) उत्तर- मानवाने समुद्र आणि महासागराच्या तळातून खनिज तेल व नैसर्गिक वायूंचे उत्पादन घेतले आहे.

**प्रश्न 6. ब) आकृती काढून नावे दया (कोणतेही दोन) 4**


1) वयोरचनेचा संकोचनारा मनोरा




2) रेषीय वस्ती





3) लोकसंख्या संक्रमण सिध्दान्ताचे विविध टप्पे-



**प्रश्न 7. सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** **8**

1) **उत्तर -**

लोकसंख्या वितरणावर प्राकृतिक व मानवी घटकांचा परिणाम पहावयास मिळतो. जगात मानवी जीवनास पोषक व आरोग्यवर्धक हवामान असलेल्या ठिकाणी मानवी लोकसंख्या एकवटलेली आहे. त्यात विविध घटकांचा समावेश असतो. मानवी लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक पुढील प्रमाणे-




① **प्राकृतिक रचना ( भूरुपे)-**

**अ) मैदाने / सुपिक खोरे-** मैदानी प्रदेशात विपुल जलसंपत्ती मुळे व सुपीक मृदेमुळे शेती व्यवसाय विकसीत झालेला असतो त्यामुळे तेथे शेतीवर आधारीत व्यवसाय विकसीत होतात. रोजगाराच्या संधी अशा प्रदेशात जास्त असतात. त्याच बरोबर वाहतुक मार्गांच्या विकास, व उत्सावर्धक हवामान यामुळे मैदानी प्रदेशात लोकसंख्या जास्त असते. उदा. गंगा-सिंधू नदी मैदानी प्रदेश, यांगत्से व मिसिसिपी नदयांचे खोरे

**ब) पठारी प्रदेश**- पठारी प्रदेशात खनिज संपत्तीच्या उपलब्धतेमुळे खनिज संपत्तीवर आधारीत जड उदयोग विकसीत होतात तसेच काही भागात जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध असलेल्या प्रदेशात शेतीस पुरक वातावरण असल्याने येथे मध्यम ते जास्त लोकसंख्या आढळते. उदा. छोटा नागपुरचे पठार काही पठारांवर सुपिक मृदेमुळे लोकसंख्या जास्त आढळते.

**क) पर्वतीय प्रदेश** - पर्वतीय प्रदेशात उंची, पतिकूल हवामान, उतार, घनदाट अरण्ये, शेती अयोग्य जमीन यामुळे जिवन जगण्यास अनेक अडचणी असतात त्यामुळे पर्वतीय भागात लोकसंख्या विरळ आढळते. उदा. रॉकी, हिमालय अँडीज पर्वतांचे प्रदेश. काही ठिकाणी मात्र आवश्यक पाण्याची सोय, जीवन जगण्यासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध असलेल्या पर्वतीय ठिकाणी काही प्रमाणात लोकसंख्या केंद्रीत झालेली आढळते. उदा. पर्वतीय पर्यटन स्थळे

② **हवामान-** समशितोष्ण हवामान, भूमध्य सागरी हवामान, मोसमी हवामाना सारख्या अल्हाददायक हवामाच्या प्रदेशात जास्त लोकसंख्या आढळते उदा. युरोप खंडातील देश, आशिया खंडातील मौसमी हवामानाचा प्रदेश या उलट अति थंड, अति उष्ण, वाळवंटी प्रदेश, अति पर्जन्याचे प्रदेश हे मानवी वस्तीस अनुकूल नसतात त्यामुळे तेथे लोकसंख्या कमी असते. उदा. विषृववृत्तीय हवामान, वाळवंटी प्रदेश.

③ **पाण्याची उपलब्धता**- पाणी हा सर्व सजीवांसह मानवासाठीही महत्वाचा घटक आहे. पाणी मानवाच्या दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला व मोठया प्रमाणावर आवश्यक असलेला प्राकृतिक घटक असल्याने प्राचीण काळापासून मानवाने आपल्या वसाहती पाण्याच्या ठिकाणी वसविलेल्या आहेत.

उदा. नाईल, गंगा इ. नदयांच्या खोऱ्यातील प्रदेश. तसेच समुद्रकिनारी प्रदेशात दाट लोकसंख्या आढळते. उदा. भारतीय किनारी प्रदेश. वाळवंटातील मरुदयाण्याच्या प्रदेशातही लोकसंख्या आढळते उदा. भारतातील फलोदी, सौदी अरेबियातील अल् अहसा इ.

④ **मृदा**- सुपीक गाळाच्या मृदेच्या प्रदेशात शेती व्यवसाय विकसतील होतो त्यामुळे तेथे इतर व्यवसांचा विकास होवुन लोकसंख्या अधिक असते. उदा. भारतातील गंगा नदी, मिसिसिपी, यांगत्से या नदयांची पुर मैदानांचा प्रदेश. त्याच बरोबर ज्वालामुखीय मृदेच्या सुपीकतेमुळे ही ज्वालामुखीय पर्वतांच्या पायथ्याच्या प्रदेशात शेती व्यवसाय विकसीत होतो व येथेही लोकसंख्या जास्त आढळते. उदा. जावा, जपान, सिसिली.

**2) उत्तर-**

① **निवासी क्षेत्र** : माणसाने स्वतःच्या निवासासाठी बांधकाम केलेले क्षेत्र (भूमी आच्छादन)

② **औद्योगिक क्षेत्र** : अशी जमीन, जेथे कोणत्या न कोणत्या वस्तुनिर्मितीचे कार्य चालते (भूम्मी आच्छादन), जेथे लोक स्वतःच्या उपजीविकेसाठी काम करतात. (भूमी उपयोजन)

③ **संस्थात्मक क्षेत्र** - शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मुख्य कार्यालये, छावणी इत्यादींच्या कार्यासाठी व्यापलेली जमीन. या जमिनीचा वापर वरील कार्यांसाठी केला जातो. (भूमी उपयोजन).

④ **मनोरंजनाखालील क्षेत्र** : नागरिकांच्या मनोरंजनाची साधने उपलब्ध असलेली जमीन (भूमी आच्छादन), जेथे नागरिक मनोरंजन किंवा करमणुकीसाठी जातात. (भूमी उपयोजन) उदा. खेळाचे मैदान, बाग, सिनेमागृह, नाट्यगृह इत्यादी.


⑤ **वाहतूक** : या जागेचा वापर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी होतो. यामध्ये विमानतळ, रेल्वेस्थानक, रस्ते, नैसर्गिक बंदर, लोहमार्ग इत्यादींचा समावेश होतो.

⑥ **व्यापारी क्षेत्र** : नागरी क्षेत्र, ज्या जमिनीवर पक्क्या मालाची दैनंदिन विक्री होते असे क्षेत्र. हे क्षेत्र निवासी क्षेत्रातही आढळते. काही ठिकाणी मात्र असे क्षेत्र विविध प्रकारचा माल मिळण्याच्या दृष्टीने एका ठिकाणी केंद्रित झालेले आढळतात. उदा. केंद्रीय व्यपारी क्षेत्रे.

⑦ **रेखांकित/सीमांकित भूखंड** : हे मोकळे भूखंड असतात. ज्याचा वापर इमारतीच्या बांधकामासाठी केला जातो. हे क्षेत्र प्रामुख्याने नागरी क्षेत्राच्या सीमेवर आढळते. वाढत्या लोकसंख्येच्या दबावामुळे कृषीखालील जमिनीवर या क्षेत्राचे अतिक्रमण होते.

⑧ **संमिश्र भूमी उपयोजन** - एखादया क्षेत्रात जेव्हा संमिश्र भूमी उपयोजन होत असते तेव्हा विभिन्न प्रकारचे भूमी उपयोजन या क्षेत्रात एकत्रित पाहावयास मिळते. निवासी, व्यावसायिक, औद्योगिक या

प्रकारचे भूमी उपयोजन एकाच क्षेत्रात एकत्रितपणे आढळून येते. अशा क्षेत्रांमध्ये घरे, व्यवसाय, दुकाने, शाळा, दवाखाने मोकळ्या जागी एकाच ठिकाणी असू शकतात.



# सराव प्रश्नपत्रिका - 2

**विषय - भूगोल (39)**

**वेळ- 3.00 तास** **गुण 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रश्नांची उत्तरे लिहितांना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.
3) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
4) नकाशा स्टेन्सिलचा वापर योग्य तेथे करावा.
5) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
6) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी

**प्रश्न 1 अ) 'अ','ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पुर्ण करा.** **5**

| अक्र | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | अंटार्क्टिका खंड | चहा | स्थानिक लोकसंख्या नाही |
| 2 | मानवी वसाहत | कॅलिफोर्निया | सामाजिक कारण |
| 3 | उद्यान शेती | 9 टक्के भूमी | औषधी वनस्पती |
| 4 | कुटिरोद्योग | सुरक्षितता | कुंभार |
| 5 | श्रीलंका | हाताने निर्मिती उद्योग | निर्यात |

**प्रश्न 1 ब) अयोग्य घटक ओळखा व लिहा :** **5**

**1) दाट लोकवस्तीने व्यापलेले प्रदेश**

अ) नद्यांची खोरी ब) किनारी प्रदेश

क) सैबेरिया प्रदेश /प्रांत ड) सुपीक मैदाने

**2) रेषीय वस्त्यांच्या संदर्भात -**

अ) सरळ सेवेत ब) नदीच्या कडेला

क) सरोवराच्या बाजूला ड) रस्त्याच्या बाजूला

**3) मासेमारी व्यवसाया संदर्भात - सुविधा**

अ) दंतूर किनारा ब) उष्ण व शीत सागरी प्रवाहांचा संगम

क) प्लवंकाची वाढ ड) खोल समुद्र

**4) तृतीयक श्रेणीच्या आर्थिक क्रिया -**

अ) व्यापार ब) वाहतूक

क) संदेशवहन ड) शेती

**5) वाहतूकीच्या साधनांचे विविध मार्ग प्रकार -**

अ) भूमार्ग ब) जलमार्ग

क) हवाई मार्ग (ङ) दूरसंचार

**प्रश्न 1 क) योग्य पर्याय निवडा :** 5

**1) लोकसंख्येचा विस्फोट --------------- टप्प्यात होतो.**

अ) पहिल्या ब) दुसऱ्या

क) तिसऱ्या ड) पाचव्या

**2) कृषीप्रधान देशात ----------------- या व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या अधिक असते.**

अ) प्राथमिक ब) दवितीयक

क) तृतीयक ड) चतुर्थक

**3) भारतातील लोकसंख्येचे आयुर्मान ---------------- मुळे वाढत आहे.**

अ) वैद्यकीय सुविधा ब) सामाजिक सुविधा

क) शैक्षणिक सुविधा ड) कौटूंबिक सुविधा

**4) टुंड्रा प्रदेशातील ---------------- लोक शिकारीवर चरितार्थ चालवतात.**

अ) एस्किमो ब) बोरा इंडियन

क) बुशमेन ड) सेंटिनाल

**5) पशुपालन व्यवसायावर ---------------- घटकाचा प्रभाव सर्वात जास्त आहे.**

अ) पर्जन्य ब) भांडवल

क) हवामान ड) मनुष्यबळ

**प्रश्न 1 ड) 'बरोबर' की 'चूक' ते लिहा** 5

1) ऑस्ट्रेलिया खंडात लोकसंख्या सर्वात कमी आहे.
2) स्थलांतरामुळे शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.
3) एका केंद्राभोवती केंद्रीय वस्तीचा विकास होतो.
4) दोन नदयांच्या किंवा रस्त्यांच्या संगमावर किंवा समुद्रकाठी चौकोनी वस्त्या आढळतात.
5) बहुतांश देशांत शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे.

**प्रश्न 2 ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही चार)** **12**

1) भारत लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातून जात आहे.
2) स्थलांतर हे नेहमीच कायमस्वरुपी असते असे नाही.
3) शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे.
4) मध्य ऑस्ट्रेलियात उद्योगांना विकास न होण्यामागे विविध घटक जबाबदार आहेत.
5) भौगोलिक विविधता ही व्यापारास कारणीभूत असते.

**प्रश्न 3 ) खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन)** **9**


1) अल्पकालीन स्थलांतर आणि दीर्घकालीन स्थलांतर
2) रेषीय वस्ती आणि केंद्रोत्सारी वस्ती
3) स्थलांतरित शेती आणि उद्यान शेती
4) दवितीयक व्यवसाय आणि तृतीयक व्यवसाय
5) कार्यात्मक प्रदेश व औपचारिक प्रदेश

**प्रश्न 4. अ) दिलेल्या जगाच्या नकाशात पुढील माहिती भरा. (कोणतेही सहा)** **6**

1) भारतातील कमी लोकसंख्या प्रदेश
2) ऑस्ट्रेलियातील पशुपालन प्रदेश
3) युरोपमधील शेतीखालील क्षेत्र
4) ग्रेड बँक मत्स्य क्षेत्र
5) रशियातील वनकटाईचे क्षेत्र
6) आफ्रिकेतील स्थलांतरीत शेतीचा प्रदेश
7) पंचमहासरोवर

8)  जपान मधील एक औद्योगिक क्षेत्र (टोकियो)

**प्रश्न 4 ब)  खालील दिलेल्या आलेखाचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **5**




1 आलेख काय दर्शवतो

2 कोणत्या वयोगटात पुरुषांची टक्केवारी जास्त आहे

3 कोणत्या वयोगटात स्त्रियांची टक्केवारी कमी आहे

4  30 ते 39 वयोगटात कोणाचे प्रमाण जास्त आहे

5  कोणत्या वयोगटात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे

**प्रश्न 5 )  खालील विषयांवर संक्षिप्त टीपा लिहा : (कोणतेही तीन)** **12**

1) संमिश्र भूमी उपयोजन

2) अनुमापी अनुकूलता

3) पर्यटन आणि राष्ट्राचे स्थूल उत्पादन

4) प्रादेशिक विकास

5) प्राकृतिक भूगोलाच्या शाखा

**प्रश्न 6 अ)  खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** 4

शेती : एक प्राथमिक व्यवसाय'

जागतिक स्तरावरील शेती व्यवसायाचे वितरण पाहता या व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण आफ्रिका खंडात जास्त आहे. त्या मानाने आशिया खंडात ते आफ्रिकेपेक्षा कमी आहे. तर युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडात शेतीक्षेत्र विस्तृत असूनदेखील या व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण अत्यंत

कमी आहे. अर्थात विकसित राष्ट्रांत शेती व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या कमी आहे. तर विकसनशील राष्ट्रात या व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या जास्त आहे.

शेतीच्या विकासावर अनेक प्राकृतिक व मानवी घटकांचा प्रभाव पडतो. त्यामुळे नगात विविध प्रदेशात विविध प्रकारची पिके घेतली जातात. त्याच प्रमाणे शेती करण्याच्या विविध पद्धतीही पहावयास मिळतात. शेती या व्यवसायावर भूरचना, दा, हवामान, पाणीपुरवठा, जैविक इ. प्राकृतिक घटकांचा परिणाम होतो. तर मजूर, ाजारपेठ, भांडवल, वाहतूक सुविधा, साठवणुकीच्या सोयी, सरकारी धोरण, बोकसंख्या, भूमीचा मालकी हक्क इ. मानवी घटकांचा परिणाम होतो. या घटकांना ननुसरूनच पीक पद्धतीमध्ये बदल दिसून येतो.

**प्रश्न :**

1) कोणत्या खंडात शेतीचा विकास कमी झाला आहे ?
2) शेती व्यवसायावर कोणत्या घटकांचा परिणाम होतो?
3) कोणत्या खंडात शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक आहे
4) शेती व्यवसायावर कोणत्या मानवी घटकांचा परिणाम होतो.

**प्रश्न 6 ब) आकृती काढून नावे दया (कोणतेही दोन)** **4**

1) स्थिरावलेला मनोरा
2) केंद्रित वस्ती
3) भूगोलाच्या अभ्यासासाठी लागणारे कौशल्य

**प्रश्न 7. सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** **8**

1) लोकसंख्या संक्रमण सिध्दांताचे विविध टप्प्यांचे आकृतीसह विश्लेषण करा
2) मंडई बागायती शेतीची वैशिष्टये लिहा.

# सराव उत्तरपत्रिका - 2

**विषय - भूगोल**

गुण - 80 वेळ- 3.00 तास

---

**प्रश्न 1 अ) 'अ','ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पुर्ण करा.** **5**

| अक्र | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | अंटार्क्टिका खंड | 9 टक्के भूमी | स्थानिक लोकसंख्या नाही |
| 2 | मानवी वसाहत | सुरक्षितता | सामाजिक कारण |
| 3 | उद्यान शेती | कॅलिफोर्निया | औषधी वनस्पती |
| 4 | कुटिरोद्योग | हाताने निर्मिती उद्योग | कुंभार |
| 5 | श्रीलंका | चहा | निर्यात |

**प्रश्न 1 ब) अयोग्य घटक ओळखा व लिहा :** **5**

1) क) सैबेरिया प्रदेश /प्रांत

2) क) सरोवराच्या बाजूला

3) ड) खोल समुद्र

4) ड) शेती

5) (ङ) दूरसंचार

**प्रश्न 1 क) योग्य पर्याय निवडा :** **5**

1) ब) दुसऱ्या

2) अ) प्राथमिक

3) अ) वैद्यकीय सुविधा

4) अ) एस्किमो

5) क) हवामान

**प्रश्न 1 ड) 'बरोबर' की 'चूक' ते लिहा** **5**

1) हे विधान बरोबर आहे.

2) हे विधान बरोबर आहे.

3) हे विधान बरोबर आहे.

4) हे विधान चुकीचे आहे.

5) हे विधान बरोबर आहे.

**प्रश्न 2 ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही चार) 12**

**1) उत्तर -**

① लोकसंख्या संक्रमणांच्या तिसऱ्या टप्प्यात मृत्यूदर व जन्मदर दोन्ही कमी झालेले असतात त्यामुळे लोकसंख्यावाढीचा दर कमी झालेला असतो. परंतु लोकसंख्या वाढतच असते. लोकसंख्येच्या बाबतीत भारताशी अशीच स्थिती आहे.
② या टप्प्यात देशाच्या प्रगतीचा वेग वाढून देशातील नागरिकांचे उत्पन्न वाढलेले असते, भारताचा प्रगतीचा वेग वाढलेला असुन गेल्या काही दशकात नागरिकांचे उत्पन्न वाढलेले आहे.
③ तंत्रज्ञानाचा वापर, शैक्षणिक सोयी सुविधा, व्दितीयक व तृतीयक व्यवसांचा विस्तार हे संक्रमणांच्या तिसऱ्या टप्प्यातील घटक भारतात सध्या आढळत आहेत.
④ कुटुंबनियोजनाचे महत्व पटल्याने भारतातील कुटुंबांचा आकार कमी होत आहे.
⑤ संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातील घटक भारतात आढळत असल्याने भारत लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातुन जात आहे असे म्हणता येईल.

**2) उत्तर -**

① व्यक्ती किंवा व्यक्तींचा समुह जेव्हा एका स्थानाकडून दुसऱ्या स्थानाकडे एका राजकिय सीमेतुन दुसऱ्या राजकीय सीमेत, कमी किंवा जास्त कालावधीसाठी किंवा कायमस्वरुपी जाता तेव्हा या हालचालीस स्थलांतर असे म्हणतात.
② व्यक्ती नोकरीच्या संधी, उत्तम राहणीमान या सारख्या आकर्षक घटकांमुळे स्थलांतर करत असतो असे स्थलांतर बऱ्याच वेळा कायमस्वरुपी असते. अनेक वेळा व्यक्ती दुष्काळ, नैसर्गीक आपत्ती, युध्दजन्य परिस्थिती, सामाजिक असुरक्षितता, राजकीय असुरक्षितता या सारख्या कारणांमुळे देखिल स्थलांतर करीत असतो.
③ दुष्काळी परीस्थिती, युध्दजन्य परिस्थिती, नैसर्गीक आपत्तीत केलेले स्थलांतर परिस्थिती सुधारल्या नंतर व्यक्ती पुन्हा आपल्या मुळस्थानी परत येतो
④ आर्थिक कारणाने नोकरी निमित्त बाहेरगावी गेलेले अनेक लोकही निवृत्ती नंतर परत आपाल्यागावी येतात.
⑤ स्थलांतर हे विशिष्ट हेतु किंवा उद्दीष्टानुसार झाले असेल तर तो हेतू किंवा उद्दीष्ट साध्य झाल्यानंतर पुन्हा व्यक्ती मुळ ठिकाणी परत येतो

⑥ शैक्षणिक, पर्यटन, धार्मीक वैदयकीय कारणानांमुळे केलेल्या स्थलांतरात लोक पुन्हा आपल्या मुळ ठिकाणी परत येतात  म्हणजेच स्थलांतर हे नेहमीच कायमस्वरुप असते असे नाही.

**3) उत्तर -**

①. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शिकारीमुळे प्राण्यांच्या अनेक प्रजाती नामशेष झाले आहेत.

② काही प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

③ त्यामुळे परिसंस्थेचा ऱ्हास होत आहे.

④ पर्यावरणाचे असंतुलन निर्माण होत आहे.

म्हणून जगभरात शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे.

**4) उत्तर -**

① मध्य ऑस्ट्रेलियाचा विशाल प्रदेश हा पूर्णत: वाळवंटाने व्यापला आहे. ② तेथे स्थानिक लोकसंख्या कमी आहे, त्यामुळे मनुष्य बाळ उपलब्ध नाही. ③ कमी पर्जन्यमान, वाहतुक सुविधांचा अभाव या कारणामुळे उद्योगांच्या विकासासाठी येथे पोषक परिस्थिती उपलब्ध नाही हे सर्व घटक मध्य ऑस्ट्रेलियातील उद्योगांचा विकास न होण्याकामी जबाबदार आहेत.

**5) उत्तर -**

पृथ्वीवरील नैसर्गिक घटक, साधन संपत्ती याचे वितरण अत्यंत असमान आहे. त्यामुळेच मृदा, वने, कृषी उत्पादने, खनीज संपत्ती काही प्रदेशात मुबलक तर काही प्रदेशात अत्यंत दुर्मिळ आहे. कृषी क्षेत्रातही जागतिक विविधता आढळते. अशाच प्रकारची विविधता वन उत्पादने आणि खनीज संपत्तीही आढळते. थोडक्यात एकूणच साधन संपत्तीचे वितरण जगभरात वैविध्यपूर्ण असल्याने भौगोलिक घटकातील तफावत व्यापार निर्मितीस कारणीभूत ठरते.

प्रश्न 3 ) **खालील फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन)** 9

1) **उत्तर -**

| **अल्पकालीन स्थलांतर** | **दीर्घकालीन स्थलांतर** |
|---|---|
| 1) कमी दिवसांसाठी होणारे स्थलांतर हे | 1) खूप जास्त कालावधीसाठी होणारे स्थलांतर |

| | |
|---|---|
| अल्पकालीन स्थलांतरात असते. | दिर्घकालीन स्थलांरत असते. |
| 2) अल्पकालीन स्थलांतर तात्पुरते स्थलांतर असते. | 2) दिर्घकालीन स्थलांतर बहुतांशी कायमचे असते. |
| 3) कापणीच्या दिवसातील शेत मजुरांचे किंवा चाऱ्याच्या शोधात पशुपालकांचे स्थलांतर अल्पकालीन असते. | 3) अनुकूल हवामान, उच्च राहणीमान किंवा रोजगारासाठी होणारे स्थलांतर दिर्घकालीन असते. |
| 4) बहुतांशी अल्पकालीन स्थलांतर स्थानीक असते. | 4) बहुतांशी दिर्घकालीन स्थलांतर राज्यांतर्गत, आंतरराज्य किंवा आंतरराष्ट्रीय असते. |

2) **उत्तर -**

| **रेषीय वस्ती** | **केंद्रोत्सारी वस्ती** |
|---|---|
| 1) नदी किंवा प्रमुख हमरस्त्याच्या समांतर कलाणे वस्तीचे एकरेषीय स्वरुप विकसित होते | 1) एका केंद्राच्या भोवती वस्त्यांचा विकास होतो. |
| 2) नदी, कालवा, हमरस्ता हा रेषीय वस्तीच्या विकासात महत्त्वपूर्ण भाग असतो | 2) हा केंद्र बिंदू वस्त्यांच्या विकासातील महत्त्वपूर्ण भाग असतो. राजवाडा, मंदिर, विहीर इ. घटकांचा केंद्रोत्सारी वस्तीत महत्त्वपूर्ण भाग असतो |
| 3) या वस्तीला प्रमुख केंद्र नसते. शिवाय अशा वस्तीची लांबी जास्त व रुंदी कमी असते | 3) या केंद्रबिंदू पासून वस्ती बाहेरील दिशेने वाढते. केंद्र त्यागी वस्तीही म्हणतात. |

3) **उत्तर -**

| **स्थलांतरित शेती** | **उद्यान शेती** |
|---|---|
| 1) वनातील आदिवासी उदरनिर्वाहासाठी शेती करतात. | 1) ही शेती अत्यंत निवडक उत्पादने घेण्यासाठी व व्यापारासाठी केली जाते. |
| 2) शेतीचा आकार / क्षेत्र लहान असते. | 2) शेतीचा आकार लहान असतो. |

| | |
|---|---|
| 3) वने जाळून त्या जमिनीवर कमी कालावधीसाठी ही शेती केली जाते. | 3) अत्यंत अनुकूल हवामानाच्या क्षेत्रात ही शेती दिर्घकालावधीसाठी केली जाते. |
| 4) धान्य, कडधान्य, रानभाज्या, फळ भाज्यांचे उत्पादन घेतले जाते | 4) फुले, फळे, औषधी वनस्पती, शोभेची झाडे इत्यादी उत्पादने घेतली जातात. |

4) **उत्तर -**


| **दवितीयक व्यवसाय** | **तृतीयक व्यवसाय** |
|---|---|
| 1) प्राथमिक व्यवसायातून मिळणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्‍योगांना द्‍वितीयक व्यवसाय म्हणतात. | 1) प्राथमिक आणि द्‍वितीयक व्यवसायांना जोडण्याचे काम तृतीयक व्यवसाय करतात. |
| 2) द्‍वितीयक व्यवसायांच्या स्थानिकीकरणावर विविध घटक परिणाम करतात | 2) द्‍वितीय व्यवसायांचे स्थानिकीकरणाचे घटक एकत्र आणणे हे तृतीयक व्यवसायाचे मुख्य काम आहे. |
| 3) द्‍वितीयक व्यवसायामुळे उत्पादनाची गुणवत्ता व आणि उपयोगिताही वाढते | 3) द्‍वितीयक व्यवसायातून उत्पादीत झालेल्या मालाला बाजारपेठे पर्यंत पोहचविण्याचे हे देखील तृतीयक व्यवसायात आहे. |
| 4) द्‍वितीयक व्यवसायात उत्पादीत केलेल्या वस्तुंना अधिक मुल्य मिळते | 4) तृतीयक व्यवसायाचे स्वरुप खूपच विविधांगी आहे. तृतीयक व्यवसायाचे अनेक आर्थिक क्रियांत वर्गीकरण करता येते. |

5) **उत्तर -**

| **कार्यात्मक प्रदेश** | **औपचारिक प्रदेश** |
|---|---|
| 1) एखाद्‍या विशिष्ट क्षेत्रात केले जाणारे एखादे प्रमुख कार्य या आधारे ठरविलेला प्रदेश म्हणजे कार्यात्मक प्रदेश होय | 1) एका निश्चित घटकाच्या आधारे ठरविलेला समान वैशिष्टये असलेला एकजिनसी म्हणजे औपचारिक प्रदेश होय. |
| 2) कार्यात्मक प्रदेश एक जिनसी असतो असे नाही. | 2) औपचारिक प्रदेशात एक प्रमुख घटक आहे हा घटक त्या प्रदेशाची निश्चित सीमा रेषा |

| | |
|---|---|
| | ठरवितो. |
| 3) कार्यात्मक प्रदेशात अनेक प्राकृतीक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटकांची सरमिसळ दिसून येते. | 3) औपचारिक प्रदेशाची एक किंवा अनेक समान वैशिष्टये असतात. |
| 4) एक अर्थी कार्यात्मक प्रदेश हा तुलनेने वैविध्यपूर्ण वैशिष्टयांचा प्रदेश असतो. | 4) औपचारिक प्रदेश हा एकजिनसी प्रदेश असतो. |

**प्रश्न 4. अ) दिलेल्या जगाच्या नकाशात पुढील माहिती भरा.** **6**




| अ.क्र. | चिन्ह | सुची |
|---|---|---|
| 1 | | भारतातील कमी लोकसंख्या प्रदेश |
| 2 | | ऑस्ट्रेलियातील पशुपालन प्रदेश |
| 3 | | युरोपमधील शेतीखालील क्षेत्र |
| 4 | | ग्रेड बँक मत्स्य क्षेत्र |
| 5 | | रशियातील वनकटाईचे क्षेत्र |
| 6 | | आफ्रिकेतील स्थलांतरीत शेतीचा प्रदेश |
| 7 | | पंचमहासरोवर |
| 8 | | जपान मधील एक औद्योगिक क्षेत्र (टोकियो काबासाकी) |

**प्रश्न 4 ब) खालील दिलेल्या आलेखाचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **5**

1 **उत्तर**- आलेखात वय व लिंगानुसार (स्त्री- पुरुष) टक्केवारी लोकसंख्या मनोऱ्याव्दारे दर्शवलेली आहे

2 **उत्तर-** 0 ते 9 या वयोगटात पुरुषांची टक्केवारी जास्त आहे

3 **उत्तर-** 0 ते 69 या वयोगटात स्त्रियांची टक्केवारी कमी आहे.

4 **उत्तर-** 30 ते 39 या वयोगटात पुरुषांचे प्रमाण जास्त आहे

5 **उत्तर-** कोणत्याही वयोगटात पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांचे प्रमाण जास्त नाही

**प्रश्न 5 ) खालील विषयांवर संक्षिप्त टीपा लिहा : (कोणतेही तीन)** **12**

1) **उत्तर -**

नागरी क्षेत्रात भूमी उपयोजनांचा एक विशिष्ट कल दिसून येतो. त्यानुसार नगरांमधील किंवा शहरांमधील ठराविक क्षेत्र हे निवासी बांधकामाखाली, ठराविक क्षेत्र ही उद्योगांसाठी, वाहतूक सेवांसाठी, उद्यांनासाठी आणि मनोरंजनाच्या साधनांसाठी वापरले जाते.

मात्र, काळाच्या ओघात जशी शहराची वाढ होत आहे. तशी शहरातील किंवा नगरातील जमीन वरील विशिष्ट कारणांसाठी वापरली जाते असे नाही. तेथे राहणाऱ्या लोकांच्या सोयीने एकाच विस्तृत क्षेत्रावर विविध उद्योग व्यवसाय आणि निवासाची सोय केली जाते. त्यामुळे मिश्र भूमी उपयोजन दिसून येते. अशा प्रदेशात निवासी क्षेत्र, व्यापारी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, दुकाने, शाळा, महाविद्यालय, रुग्णालये अशा विविध गोष्टी एकमेकांजवळ आढळून येतात. त्याला संमिश्र भूमी उपयोजन असे म्हणतात. असे संमिश्र भूमी उपयोजन हे प्रामुख्याने शहराच्या अलीकडे झालेल्या वाढीच्या क्षेत्रात दिसते.

2) **उत्तर -**

उद्योगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणाऱ्या काही प्रमुख सुविधांच्या उपलब्धतेमुळे एखादा मोठा उद्योग एखाद्या प्रदेशात स्थापित होतो. उदा. लोह-पोलाद, एखादा अशाप्रकारे उद्योग स्थापित झाला की, या मोठया उद्योगावर आधारीत, त्यावर अवलंबून असणारे आणि या उद्योगाच्या सानिध्यात अवलंबून असणारे पूरक किंवा सहाय्यक इतर अनेक उद्योग अशा केंद्राकडे आकर्षित होतात यालाच अनुमापी अनुकूलता म्हणतात. उदा. लोह-पोलाद कारखाना सुरु झाल्यानंतर त्यातून उत्पादीत होणाऱ्या पोलाद या पक्क्या मालावर आधारित भांडी तयार करणे, गाडयांचे सुटे भाग तयार करणे, गाडयांचे सांगाडे निमिती, मोटार गाडया निर्मिती, उद्योग स्थापन होतांना दिसतात. लोह-पोलाद उदयोगांच्या स्थानिकीकरणामुळे उद्योगांना लागणाऱ्या विविध पायाभत सेवा-सुविधा आधीपासून उपलब्ध असतात. या अनुकुलतेचा फायदा ठरवून कमी भांडवलात अशा पूरक उद्योगांना सहजपणे आपला जम बसविता येतो. एकाअर्थी अनुमापी अनुकलतेमुळे उद्योगांना केंद्रीत होण्यास प्रोत्साहन मिळते व भविष्यात औद्योगिक पट्टयाचीही निर्मिती होते.

3) **उत्तर -**

वाहतुकीच्या प्रगत साधनाचा विकास व वाढ, पर्यटनसाठीचा आवश्यक मुलभूत सेवा-सुविधात होणारी वाढ, प्रत्यक्ष कोणतेही उत्पादन न करताही पर्यटनामुळे/पर्यटकांमुळे मिळणारे परकीय चलन व एक

प्रकारे अदृश्य स्वरुपातील व्यापार व त्यामुळे प्रत्येक देशाने पर्यटनावर दिलेला भर यांचा प्रत्यक्ष प्रभाव देशाच्या स्थूल उत्पादनात भरघोस वाढ होते. त्यामुळेच आपल्या अनुकूल भौगोलिक - सांस्कृतिक घटकांचा अधिकाधिक लाभ उठवून पर्यटन व्यवसाय वाढवणचा प्रयत्न जगातील बहुतांशी सर्वच देशात केला जातो.

4) **उत्तर -**

प्रत्येक प्रदेशाची प्राकृतिक/भौगोलिक वैशिष्टये, ठेवण, साधनसंपत्तीची उपलब्धता इ. विविध धटकांत वेगळेपण आढळते. त्यामुळेच या सर्व घटकांचा प्रदेशातील लोकांच्या जीवनमानावर परिणाम होतो. म्हणूनच प्रादेशिक विकासात असमानता दिसून येते. आल्हाददायक हवामान, प्रदेशाची सुगमता, मुबलक साधनसंपत्ती, पाण्याची उपलब्धता इ. अनुकूल घटक असल्यास अशा प्रदेशाचा विकास वेगाने होतो. उदा. नाईल, गंगा नदी खोऱ्याचे प्रदेश, किनारपट्टीची मैदाने.

याउलट, विषम हवामान, पर्जन्याचा अभाव तीव्र उतार, दुर्गम प्रदेश, पाण्याचे दुर्भिक्ष अशा प्रतिकूल प्रदेशात विकासाचा वेग खूपच कमी असतो. उदा. हिमालयीन पर्वतीय प्रदेश किंवा सहारा वाळवंट प्रदेश जगातील प्रत्येक प्रदेशाच्या प्रादेशिक विकास पातळीत असमानता आढळून येते.

5) **उत्तर -**

पृथ्वीवरील विविध नैसर्गिक घटकांचा अभ्यास प्राकृतिक भूगोलात केला जातो. प्राकृतिक भूगोलात प्रामुख्याने शिलावरण, जलावरण, वातावरण आणि जीवावरण यांचा अभ्यास केला जातो. यातील प्रत्येक घटकाच्या खोल, विस्तृत अभ्यासातून प्राकृतिक भूगोलाच्या वेगवेगळया शाखा विकसित झाल्या आहेत. खगोलशास्त्र, हवामानशास्त्र, सागरशास्त्र, भुरुपशास्त्र, भूगर्भशास्त्र, मृदाशास्त्र आणि जैव भूगोल या प्राकृतिक भूगोलाच्या शाखा आहे. या सर्व उपशाखा परस्परांशी संबंधित आहे.

शिलावरणाच्या अभ्यासात प्रामुख्याने भू म्हणजे जमिनीशी संबंधित विषयांचा अभ्यास केला जातो. जलावरणाच्या अभ्यासात पृथ्वीवरील पाणी आणि त्यासंबंधित विविध घटकांचा अभ्यास केला जातो. वातावरणाच्या अभ्यासात वायू किंवा हवा आणि त्यांचे पृथ्वी सभोवतालचे आवरण या विषयांचा अभ्यास केला जातो. जीवावरणाच्या अभ्यासात पृथ्वीवरील सजीव आणि त्यांचा पृथ्वीवरील अन्नघटकांशी येणारा संबंध या सहसंबंधांचा अभ्यास केला जातो.

**प्रश्न 6 अ) खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4**

**उत्तर-**

1) आफ्रिका खंडात शेतीचाविकास कमी झाला आहे.


2 ) शेती व्यवसायावर भूरचना, मृदा, हवामान, पाणीपुरवठा, जैविक इ. प्राकृतीक घटकांच परिणाम होतो.

3) आफ्रिका खंडात शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण सर्वाधिक आहे.


4) शेती व्यवसायवर मजूर, बाजारपेठ, भांडवल, वाहतूक सुविधा, साठवणुकीच्या सोयी, सरकारी धोरण, लोकसंख्या भूमीचा मालकी हक्क् इ. मानवी घटकांचा परिणाम होतो.

**प्रश्न 6 ब) आकृती काढून नावे दया (कोणतेही दोन)** **4**


1) **स्थिरावलेला मनोरा**




2) **केंद्रित वस्ती**



3) **भूगोलाच्या अभ्यासासाठी लागणारे कौशल्य**




**प्रश्न 7. सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** **8**

1) **उत्तर-**

लोकसंख्या संक्रमण सिध्दांन्तात लोकसंख्या वाढीचा काळ व कल हा सिध्दांताचा पाया आहे. प्रत्येक प्रदेशात नेहमी सारखा जन्मदर व मृत्यूदर राहत नाही, त्यामुळे लोकसंख्या वाढ, घट यांचा दरसुध्दा समान राहत नाही. या सिध्दांन्तानुसार प्रत्येक प्रदेश हा काळानुसार लोकसंख्या वाढीचे विविध टप्पे पार करीत असतो.

**1) पहीला टप्पा- (अतिशय स्थिर)-** या टप्प्यात जन्मदर व मृत्यूदर जास्त व लोकसंख्या वाढ स्थिर असते. या प्रदेशात प्रजनन दर जास्त असतोच तर प्रदेशात विज्ञान व तंत्रज्ञानाचा अभाव, वैदयकीय सुविधांचा अभाव, संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव, कुपोषण यामुळे मृत्यूदरही जास्त असतो. या टप्प्यातील देशाची अर्थव्यवस्था शेती किंवा इतर प्राथमिक व्यवसायांवर अवलंबून असते, येथे व्दितीयक व तृतीयक व्यवसाय कमीच असतात. सध्या कोणताही देश या लोकसंख्या संक्रमण सिध्दान्ताच्या टप्प्यात आढळत नाही.

**2) दुसरा टप्पा-** (आरंभीच्या काळात विस्तारणारा)- मृत्युदरात घट व जन्मदर काहीसा स्थिर असल्याने या टप्प्यात त्यामुळे लोकसंख्या वाढ झपाटयाने होत असते. म्हणूनच या टप्प्याला ‘लोकसंख्येचा विस्पोट टप्पा’ म्हणतात विज्ञान व तंत्रज्ञान विकास, आरोग्य सुविधांचा विस्तार व रोगराईवर मात यामुळे मृत्यूदरात घट झालेली आढळते. शेती व उदयोगातील उत्पादन तसेच वाहतूक सुविधा या टप्प्यात वाढल्या असतात. अधिक लोकसंख्या असणारे व विकसनशील देश या टप्पातुन जात आहेत उदा. कांगो, बाग्लांदेश, नायजर, व युगांडा इ. देश या टप्प्यात आहेत.




**3) तिसरा टप्पा-** (नंतरच्या काळात विस्तारणारा)- या टप्प्यात मृत्युदर आणखीन कमी होतो तर जन्मदर सध्दा कमी होऊ लागतो, त्यामुळे या टप्प्यात लोकसंख्या वाढीचा दर कमी असतो, परंतु लोकसंख्या वाढत

असते. या टप्प्यात गरीबी कमी झालेली आढळते. व्दितीयक व तृतीयक व्यवसायांचा विस्तार, वाढलेली शैक्षणिक पातळी, लोकांना कुटुंब नियोजनाचे पटलेले महत्व, लहाण आकाराचे कुटुंब या टप्प्यात आढळून येतात. विकसनशिल टप्प्यातुन विकसीत टप्प्याकडे जाणारे देश या गटात बसतात. उदा. चीन

**4) चौथा टप्पा-** (कमी बदल दर्शविणारा) - लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यात तिसऱ्या टप्प्यापेक्षा जन्मदर आणखी कमी झालेला असतो परंतु मृत्युदरापेक्षा कमी नसतो, त्यामुळे लोकसंख्या वाढ अंत्यत कमी असते. या टप्प्यात उच्च दर्जाच्या वैदयकीय सुविधा, साथीच्या आजारांचा नायनाट, आरोग्या बद्दलची जागरुकता यामुळे मृत्युदर खूपच कमी असतो. या टप्प्यात व्दितीयक व तृतीयक व्यवसायांचा वाटा प्राथमिक व्यवसायांपेक्षा खूप जास्त असतो त्यामुळे देशांची व देशातील नागरिकांची आर्थिक स्थिती चांगली असते. उदा. अमेरीकेचे सयुक्त संस्थाने

**5) पाचवा टप्पा-** ( ऋणात्मक वाढीचा टप्पा ) - या टप्प्यात जन्मदर खूप कमी होऊन मृत्युदराच्या बरोबरीत असतो लोकसंख्या वाढ अत्यंत कमी असते. या टप्प्यात काही देशात तर जन्मदर मृत्यूदरापेक्षा कमी झालेला आढळतो येथे मात्र लोकसंख्येत घट होऊ लागते. या टप्प्यात वृध्दांचे प्रमाण जास्त तर बालकांचे प्रमाण कमी असते. वाढलेले तृतीय व्यवसाय, देशातील नांगरीकांचे उंचावलेले राहणीमान, उत्तम आर्थिक स्थिती यामुळे आनंददायी जीवन या ठिकाणी पहावयास मिळते. उदा. स्वीडन फिनलँड

2) **उत्तर -**

i) जगातील अनेक शहरांमध्ये लोकसंख्येचे आत्यंतिक केंद्रीकरण झालेले आहे. जास्त घनतेच्या शहरांमधील लोकांची विविध स्वरुपाची दैनंदिन गरज भागवण्यासाठी फुले, फळे, भाजीपाला, अंडी, दुध अशा वस्तूंचे उत्पादन घेण्यासाठी या शहराच्या सीमावर्ती प्रदेशात शेती केली जाते.

ii) शहरांतील लोकांचे राहणीमानही उच्च असते. तसेच त्यांची क्रयशक्ती जास्त असते. त्यामुळे शहराच्या आजूबाजूच्या प्रदेशात बाजाराभिमुख शेतीचा विकास होतो.

iii) शेतीत भाजीपाला, फळे, फुले यांचे उत्पादन घेतले जाते.

iv) दुग्ध व्यवसायाचा विकास झाला आहे.

v) उत्पादीत वस्तूंना शहरात ट्रकमधून रस्ता मार्गाने जलदरित्या पोहचवल्या जातात.

vi) शेतजमिनीतून जास्तीत जास्त उत्पादन घेता येते.

vii) भांडवलाचा अधिकाधिक वापर करता येतो.

viii) मानवी श्रमाबरोबर शास्त्रीय ज्ञान व तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करता येतो.

ix) सेंद्रिय व रासायनिक खतांचा व जलसिंचनाचा मुक्त वापर करता येतो.

x) मंडई शेती औद्योगिकीकरण झालेल्या दाट घनतेच्या शहरी भागात होते.

अशाप्रकारे जगातील बहुतांशी सर्वच शहरांच्या आजूबाजूच्या प्रदेशांत अशाप्रकारे मंडई शेतीचा विकास झाला आहे.

# सराव प्रश्नपत्रिका - 3

**विषय:- भूगोल** **गुण- 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.
3) रंगीत पेन्सिल वापर करण्यास परवानगी आहे.
4) नकाशा स्टेन्सिलचा वापर योग्य तेथे करावा.
5) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
6) नकाशा पुरवणी मूळ उत्तर पुत्रिकेस जोडावी.

**प्रश्न 1. अ) 'अ', 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पूर्ण करा.** **5**

| अ.क्र. | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | अंटार्क्टिका | हाताने निर्मिती उद्योग | तृतीयक व्यवसाय |
| 2 | कुटिरोद्योग | प्राकृतिक घटक | गंगा नदीचे खोरे |
| 3 | माथेरान | कायम बर्फाच्छादित प्रदेश | कुंभार |
| 4 | मत्स्यक्षेत्र | पर्यटन | ईशान्य अटलांटिक महासागर |
| 5 | औपचारिक प्रदेश | डॉगर बँक | कायम निवासी लोकसंख्या नाही |

**प्रश्न 1 'ब') अयोग्य घटक ओळखा.** **5**

**1) लोकसंखेच्या वितरणावर परीणाम करणारे मानवी घटक.**

अ) वाहतूक व दळणवळण आ) प्राकृतिक रचना

इ) औद्योगिक विकास ई) नागरीकरण

**2) स्थलांतराची प्राकृतिक कारणे -**

अ) भूकंप आ) ज्वालामुखी

इ) आर्थिक ई) पूर

**3) घरांमधील अंतराच्या आधारावर वस्तीचे प्रकार**

अ) केंद्रित वस्ती　　आ) विखुरलेली वस्ती

इ) एकाकी वस्ती　　ई) व्यापार वस्ती

**4) उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरनावर परीणाम करणारे प्राकृतिक घटक**

अ) हवामान　　आ) बाजारपेठ सानिध्य

इ) कच्या मालाची उपलब्धता　　ई) पाणीपुरवठा

**5) एखादे क्षेत्र प्रदेश म्हणून संबोधण्यासाठी खालील वैशिष्ट्यांची आवश्यकता असते.**

अ) हवामान　　आ) स्थान व विस्तार

इ) सीमा　　ई) श्रेणीबद्ध उतरंड

**प्रश्न 1 क) चूक की बरोबर ते लिहा.** **5**

1) सर्वाधिक लोकसंखेची घनता आफ्रिका खंडात आहे.

2) ग्रामीण नागरी झालर क्षेत्राचे संक्रमण हे नेहमी स्वेच्छेने आणि समस्याशिवाय होते असे नाही.

3) लोहपोलाद उद्योग कच्च्या माल क्षेत्रातस स्थापन केले जातात .

4) विकसित देशात सर्वाधिक लोक प्राथमिक व्यवसायात गुंतलेले असतात.

5) मानव आणि पर्यावरण घटक यांच्या सहसंबंधाचा अभ्यास भूगोल शास्त्रात केला जातो.

**प्रश्न 1 ड) योग्य सहसबंध लावा (A:विधान, R: कारण)** **5**

1) A : दुस-या टप्प्यात मृत्यूदरात घट होते,पण जन्मदर स्थिर असतो.

R : दुस-या टप्प्यात लोकसंख्या झपाट्याने वाढते.

अ) केवळ A बरोबर आहे.　　ब) केवळ R बरोबर आहे.

इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

2) A : लोकसंखेच्या मनो-यात रुंद तळ बालकांची संख्या अधिक असल्याचे दाखवते.

R : लोकसंख्या मनो-याचे रुंद शीर्ष  वृधांची संख्या अधिक असल्याचे दयोतक आहे.

अ) केवळ A बरोबर आहे.　　ब) केवळ R बरोबर आहे.

इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

3) A : नगरे वाढतात त्याबरोबर त्यांची कार्येही वाढतात.

R : एका नगरला केवळ एकच कार्ये असते.

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

4) A : मुंबई येथील दमट हवामान सुती वस्त्रोद्योगास पूरक आहे.

R : उद्योगास मोठ्या प्रमाणात पाणी आवश्यक असते.

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

5) A : नागपूर महानगर क्षेत्र प्राकृतिक घटकांच्या आधारे ठरलेला प्रदेश नाही.

R : नागपूर महानगर क्षेत्र हा कार्यात्मक प्रदेश आहे.

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**प्रश्न 2) भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही तीन) 12**

1) जन्मदर कमी असूनही लोकसंख्या वाढू शकते.
2) ग्रामीण वस्ती मध्ये भूमी उपयोजन हे शेतीशी निगडित असते.
3) भारतातील छोट्या नागपूर पठारावर खाणकाम व्यवसाय विकसित झाला आहे.
4) उद्योगधंद्याचे वितरण असमान असते.
5) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.

**प्रश्न 3) फरक स्पष्ट करा. (कोणतेही तीन) 9**

1) देणारा प्रदेश आणि घेणारा प्रदेश .
2) मळ्याची शेती आणि विस्तृत व्यापारी शेती
3) भूमी उपयोजन आणि भूमी अच्छादन

4) द्वितीयक व तृतीयक व्यवसाय

5) प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल

**प्रश्न 4. अ) तुम्हास दिलेल्या जगाचा नकाशामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साहयाने दाखवा आणि सूची तयार करा. (कोणतेही सहा)** 6

1) लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील पाचव्या टप्प्यातील कोणतेही दोन देश

2) सर्वाधिक लोकसंख्येचा देश

3) भारतातील एक महानगर.

4) नैऋत्य अटलांटिक मधील मासेमारी क्षेत्र.


5) पंचमहासरोवराजवळील औधोगिक क्षेत्र

6) दोन खंडादरम्यान वाहतूक करणारा लोहमार्ग.

7) अँडीज पर्वतीय प्रदेश

8) कॅनडातील सुचीपर्णी वनक्षेत्र.

**प्रश्न 4 ब) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** 5




1) आलेख काय दर्शवतो.

2) कोणत्या खंडात भूमीची टक्केवारी जास्त आहे.

3) कोणत्या खंडात भूमीची टक्केवारी कमी आहे.

4) कोणात्या खंडात ९.2% भूमीची टक्केवारी आहे.

5) युरोप खंडाची भूमी किती टक्के आहे.

**प्रश्न 5. टीपा लिहा. (कोणतेही तीन)** **12**

1) जन्म आणि मृत्यू दरातील सहसंबंध.
2) लोकसंख्या मनोरा व लिंग गुणोत्तर.
3) नागरी वस्तीच्या समस्या.
4) मळ्याची शेती
5) व्यापारातील वाहतुकीची भूमिका

**प्रश्न 6 अ) उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा** **4**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पर्यटन क्षेत्रात नियोजित विकासाची आवश्यकता खूप महत्त्वाचे आहे. यात अनेक उद्योग जटील मार्गाने एकत्र काम करीत आहेत. आणि त्यांना विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मूलभूतपणे नियोजन म्हणजे विविध प्रतिस्पर्धा मधील उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने आणि विविध क्षेत्रांची योग्य वाढ होण्याचे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मर्यादित स्त्रोत वाटप करण्याचा प्रयत्न केला जातो. टुरिजम नियोजन ही अशी प्रक्रिया आहे. ज्याद्वारे निश्चित उद्दिष्टे साध्य करता येतील आणि पर्यटन विकासाकडे लक्ष दिले जाऊ शकते. पर्यटकांसाठी गंतव्यस्थान तयार करणे, श्रेणी सुधारित करणे आणि सुधारणे ही एक दीर्घकालीन आणि स्थिर प्रक्रिया आहे. समुदाय ही पर्यटनाची मूलभूत तत्वे आहेत. हे प्रामुख्याने स्थानिक समुदायद्वारे दर्शविलेल्या कृतीच्या पातळीवर अवलंबून असते. प्रक्रियेत त्यांचा सहभाग आवश्यक आहे. पर्यटनाच्या विकासामुळे मुख्यतः पर्यावरणीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर कोणत्याही गंतव्यवस्थांनी यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. हे परिणाम नकारात्मक तसेच सकारात्मक प्रभाव तयार करतात. गंतव्य स्थानाच्या शाश्वत विकासासाठी नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी आणि सकारात्मक परिणामास चालना देण्यासाठी नियोजन आवश्यक आहे.

1) पर्यटन क्षेत्राला नियोजनाची आवश्यकता का वाटते.

2) नियोजनात समुदायांचे महत्त्व काय आहे.

3) नियोजनाचे कोणतेही दोन फायदे सांगा.

4) यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर कोणत्या घटकांचा परिणाम होतो.

**प्रश्न 6 ब) आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन) 4**

1) लोकसंख्या संक्रमण टप्पे.

2) भूगोलाचा अन्यविषयाशी सहसंबंध.

3) विखुरलेली वस्ती

**प्रश्न 7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक) 8**

1) लोकसंख्या वितरणावरील मानवी घटकांचा परिणाम उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

2) व्यापारावर परिणाम करणारे घटक कोणते ते स्पष्ट करा.

# नमुना उत्तरपत्रिका- 3

इयत्ता :- बारावी | विषय:- भूगोल

गुण :- 80 | वेळ :- 3 तास

**प्रश्न 1. अ) 'अ', 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पूर्ण करा.** **5**

| अ.क्र. | अ | ब | क |
|---|---|---|---|
| 1 | अंटार्क्टिका | कायम बर्फाच्छादित प्रदेश | कायम निवासी लोकसंख्या नाही |
| 2 | कुटिरोद्योग | हाताने निर्मिती उधोग | कुंभार |
| 3 | माथेरान | पर्यटन | तृतीयक व्यवसाय |
| 4 | मत्स्यक्षेत्र | डॉगर बँक | ईशान्य अटलांटिक महासागर |
| 5 | औपचारिक प्रदेश | प्राकृतिक घटक | गंगा नदीचे खोरे |

**प्रश्न 1 ब) अयोग्य घटक ओळखा** **5**

1) - आ) प्राकृतिक रचना

2) - इ) आर्थिक

3) - ई) व्यापार वस्ती

4) - आ) बाजारपेठ सानिध्य

5) - अ) हवामान

**प्रश्न 1 क) चूक की बरोबर ते लिहा** **5**

1) चूक आहे.

2) बरोबर आहे.

3) बरोबर आहे.

4) चूक आहे.

5) बरोबर आहे

**प्रश्न 1 ड) सहसंबंध ओळखा :- A- विधान, R- कारण** 5

1) इ) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

2) ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

3) अ) केवळ A बरोबर आहे.

4) ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

5) ई) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**प्रश्न 2) भौगोलिक कारणे लिहा. (कोणतेही तीन)** 12

**1) उत्तर -**

1. लोकसंख्या संक्रमणाच्या चौथ्या टप्प्यात जन्मदर अजून कमी होत जातो.

2. मात्र, असे असले तरी या कालखंडात लोकांचे राहणीमान उच्च दर्जाचे असते. देशाची आर्थिक स्थिती सुधारते.

3. लोक आपल्या आरोग्याबद्दल जागरूक असतात.

4. मात्र, याच वेळेस मृत्युदरही खूप कमी झालेला असतो आणि त्यामुळे या टप्प्यात जन्म दर कमी असूनही मृत्युदर त्याहीपेक्षा कमी असल्यामुळे लोकसंख्या वाढते.

5. मात्र, ही वाढ खूपच अल्प किंवा कमी असते.

**2) उत्तर -**

1. ग्रामीण वस्ती चे नागरी वस्ती हे वर्गीकरण सर्वसाधारणपणे कोणत्या व्यवसायात अधिकांश लोक गुंतलेले आहेत यावरून केले जाते.

2. प्राथमिक व्यवसायात अधिक लोक गुंतलेले असतील तर तो ग्रामीण भाग व प्राथमिक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात अधिक लोक गुंतलेले असतील तर तो शहरी भाग असतो.

3. ग्रामीण वस्ती मधील बहुतांशी लोक हे शेती या प्राथमिक व्यवसायात गुंतलेले असतात त्यामुळे ग्रामीण भागात शेतीचे प्रमाण हे इतर व्यवसाय पेक्षा अधिक असते.

4. शेती व शेतीसाठी लागणारे विविध अवजारे तयार करण्याचा व्यवसाय हे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर चालतात.

5. तसेच भूमी अभिलेख कार्यालयाने ग्रामीण भूमी उपयोजनाचे जे विविध क्षेत्रात वर्गीकरण केले आहे ते वर्गीकरण हे प्रामुख्याने शेतीत केली जाणाऱ्या पीक लागवडीचा कालावधी हंगाम दोन पिकांच्या लागवडी

दरम्यान चा ठेवलेल्या जमिनीचा कालावधी यावर आधारित आहे यावरून ग्रामीण भागात शेती संबंधित भूमी उपयोजन हे अधिक असलेले दिसून येते.

**3) उत्तर -**

1. भारतातील छोटा नागपूरच्या पठारावर विपुल प्रमाणात खनिजांचे साठे आढळून येतात.

2 यामध्ये प्रामुख्याने दगडी कोळसा, लोह खनिज, बॉक्साईट खनिजांचे प्रमाण अधिक आहे.

3. या प्रदेशात खाणीमध्ये काम करण्यासाठी स्वस्त व अधिक मजूर पुरवठा सहज उपलब्ध होतो.

4. त्याच प्रमाणे खाणकाम व्यवसायासाठी पोषक सरकारी धोरण, अधिक भांडवल गुंतवणूक आणि वाहतूक व यांत्रिक साधनांचा वापर यामुळे येथे खाणीवर आधारित विविध लोहपोलाद उद्योग, यांचेदेखील केंद्रीकरण या भागात मोठ्या प्रमाणात झाले आहे.

5. त्यामुळे भारतातील छोटा नागपूर पठारावरून खाणकाम व्यवसाय अधिक विकसित झालेला आहे

**4) उत्तर -**

1. ज्या प्रदेशात उद्योगाच्या स्थापनेसाठी अनुकूल घटक अधिक उपलब्ध असतात त्या प्रदेशात उद्योगाची स्थापना व विकास अधिक होतो.

2. तर प्रतिकूल घटकामुळे उद्योगांचा विकास कमी होतो.

3. उद्योगधंद्यांच्या स्थापण्यासाठी आवश्यक असणारे प्राकृतिक, आर्थिक, राजकीय व इतर घटक हे प्रत्येक प्रदेशानुसार बदलतात.

4. यामुळे उद्योगधंद्यांचे वितरणही असमान असते.

**5) उत्तर -**

1 .प्रादेशिक विकासावर प्राकृतिक रचनेचा परिणाम होत असतो.

2. ज्या प्रदेशात नापीक मृदा असते, दुर्गम पर्वतीय भाग, वाळवंटी प्रदेश, घनदाट वने असतात. अशा प्रदेशांमध्ये प्रादेशिक विकासावर मर्यादा येतात.

3. मात्र ज्या प्रदेशात सुपीक मैदानी प्रदेश, पाण्याची उपलब्धता, लांब किनारी प्रदेश, नैसर्गिक बंदरे इत्यादी प्राकृतिक रचना आढळून येते. त्या भागाचा प्रादेशिक विकास हा अधिक चांगल्या प्रकारे करता येतो.

4. त्यामुळे दुर्गम पर्वतीय प्रदेशापेक्षा सुपीक मैदानी प्रदेशाचा प्रादेशिक विकास हा अधिक झालेला दिसून येतो.

5. उदा: भारतातील हिमालय पर्वतीय क्षेत्रापेक्षा उत्तर भारतीय मैदानी प्रदेशातील क्षेत्राचा प्रादेशिक विकास अधिक झालेला दिसून येतो.

**प्रश्न 3 ) . फरक स्पष्ट करा. (कोणतेही तीन)** **9**

1) **उत्तर -**

| देणारा प्रदेश | घेणारा प्रदेश |
|---|---|
| 1.स्थलांतरामुळे लोक जो प्रदेश सोडून जातात त्या प्रदेशाला देणारा प्रदेश म्हणतात. | 1.स्थलांतरामुळे लोक ज्या प्रदेशात जाऊन राहतात त्या प्रदेशाला घेणारा प्रदेश असे म्हणतात. |
| 2.देणाऱ्या प्रदेशातील लोक स्थलांतर करून जाण्यासाठी आपकर्षक घटक कारणीभूत असतात.उदा. रोजगाराच्या कमी संधी, दुष्काळ, युद्ध इत्यादी. | 2.घेणाऱ्या प्रदेशात लोक स्थलांतर करून येण्यासाठी आकर्षण घटक कारणीभूत असतात. उदा. शिक्षण व रोजगाराच्या संधी, पोषक सरकारी धोरण, मनोरंजन, उच्च राहणीमान इत्यादी. |
| 3.स्थलांतरामुळे देणाऱ्या प्रदेशातील लोकसंख्या कमी होते. | 3.घेणाऱ्या प्रदेशातील लोकसंख्या वाढते. |
| 4.देणाऱ्या प्रदेशातील प्रदेशातील पायाभूत सुविधा विनावापर किंवा कमी वापरल्या जातात त्यावर अनावश्यक खर्च होतो. | 4.घेणारा प्रदेशातील पायाभूत सोयी-सुविधांवर ताण निर्माण होतो. |
| 5.देणाऱ्या प्रदेशातील कार्यशील लोकांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे आर्थिक विकासाला मर्यादा पडतात. | 5.घेणाऱ्या प्रदेशात कार्यशील लोकसंख्येचे प्रमाण लोकांचे प्रमाण वाढते. त्यामुळे त्या भागाच्या आर्थिक विकास अधिक वेगाने होतो. |
| 6.देणाऱ्या प्रदेशातील अवलंबित लोकसंख्या व स्त्रियांचे प्रमाण वाढते. कारण कार्यशील वयोगटातील बहुतांशी पुरुष रोजगारासाठी स्थलांतर करून तो प्रदेश सोडून जातात. | 6.घेणाऱ्या प्रदेशात अवलंबित वयोगटाचे व स्त्रियांचे प्रमाण कमी होते. कारण कार्यशील पुरुषाचे प्रमाण वाढते. |

2) **उत्तर -**

| मळ्याची शेती | विस्तृत व्यापारी शेती |
|---|---|
| 1. या प्रकारची शेती उष्णकटिबंधात केली जाते. | 1. या प्रकारची शेती समशीतोष्ण कटिबंधात 30 अंश ते 55 अंश उत्तर व दक्षिण अक्षवृत्त च्या दरम्यान केले जाते. |
| 2.या प्रकारच्या शेतीत चहा, कॉफी, कोको, केळी | 2.या प्रकारच्या शेतीत गहू हे प्रमुख पीक घेतले |

| | |
|---|---|
| इत्यादीचे उत्पन्न घेतले जाते. | जाते. |
| 3.कुशल व अकुशल कामगारांचा मोठ्या प्रमाणात वापर करून आधुनिक तत्त्वावर पिकांचे उत्पादन घेतले जाते. | 3. याशिवाय मका, तेलबिया यांचे उत्पादन घेतले जाते. |
| 4. शेतीबरोबर कोणताही जोड व्यवसाय केला जात नाही. | 4. शेतीची सर्व कामे यंत्राद्वारे केली जातात. म्हणून या शेतीस यांत्रिक शेती असेही म्हणतात. |
| 5.या प्रकारची शेती अधिक लोकसंख्येच्या प्रदेशात केली जाते. | 5. शेतीबरोबरच पशुपालन व्यवसाय ही केला जातो.या प्रकारची शेती लोकसंख्येच्या प्रदेशात केले जाते. |
| 6 भारत, मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, फिलिपाइन्स, थायलंड, म्यानमार, ब्राझील इत्यादी देशात या प्रकारची शेती केली जाते. | 6 संयुक्त संस्थानातील रशियातील स्टेप अर्जेंटिनातील पंपास, ऑस्ट्रेलियातील डाऊन्स, आफ्रिकेतील व्हेल्ड व न्यूझीलंडमध्ये कॅंटबरी या प्रदेशात व्यापारी शेती केली जाते. |

3) **उत्तर -**

| भूमी उपयोजन | भूमी अच्छादन |
|---|---|
| 1.मानवाने भूमीचा किंवा जमिनीचा विविध कार्यासाठी केलेला उपयोग म्हणजे भूमी उपयोजन होय. | 1.भूमीवर असणारे प्राकृतिक घटकांचे आवरण म्हणजे भूमी अच्छादन होय. |
| 2.यामध्ये घरे, उद्योग, शेती, वाहतुकीचे मार्ग इत्यादीचा समावेश होतो. | 2.भूमी अच्छादन यामध्ये वने पाणी बर्फ वाळू खडक डोंगर पर्वत इत्यादींचा समावेश होतो. |
| 3.भूमी उपयोजन हे मानवी क्रियांमुळे घडून येते. | 3.भूमी अच्छादन नैसर्गिक असते. |
| 4.प्राकृतिक घटकांचा वापर मानव आपल्या विविध गरजा भागविण्यासाठी करीत असतो. | 4.हे भूमी आच्छादन मानवाच्या गरजा पूर्तीसाठी उपयोगी ठरते. |
| 5.प्रदेशातील भूमी आच्छादनाचा परिणाम मानवाच्या भूमी उपयोजनावर दिसून येतो. उदा; खनिज संपत्ती विपुल असणाऱ्या प्रदेशात उद्योगांची निर्मिती होते. | 5.भूमी अच्छादन प्रदेशानुसार बदलते भूमी अच्छा नात विविधता आढळून येते. उदा: डोंगराळ प्रदेश, जंगल, पर्वतीय प्रदेश, शुष्क व वाळवंटी प्रदेश इत्यादी. |
| 6.भूमी उपयोजन उपग्रहीय प्रतिमा द्वारे सांगितले जाऊ शकत नाही. | 6.भूमी अच्छादन हे उपग्रह प्रतिमा द्वारे समजले जाऊ शकते. |

4) **उत्तर-**


| द्वितीयक व्यवसाय | तृतीयक व्यवसाय |
|---|---|
| 1.कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्यापासून पक्का माल तयार करणारे व्यवसायांना द्वितीय व्यवसाय म्हणतात. | 1. जे व्यवसाय प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत सहभागी न होता, लोकांना केवळ सेवा पुरवितात अशा अनुत्पादक व्यवसायांना तृतीयक व्यवसाय असे म्हणतात. |
| 2.द्वितीयक व्यवसाय मध्ये कच्च्या मालापासून नवीन उत्पादने घेतली जातात. | 2. तृतीयक व्यवसायात कोणतेही उत्पादन घेतले जात नाही फक्त सेवा दिली जाते. |
| 3.द्वितीयक व्यवसाय हे कच्चा मालासाठी प्राथमिक व्यवसायावर अवलंबून असतात. | 3. तृतीयक व्यवसाय हे प्राथमिक व द्वितीयक व्यवसाय यांना पूरक व्यवसाय म्हणून कार्य करीत असतात. |
| 4. द्वितीयक व्यवसायात कुटिर उद्योग, ग्रामोद्योग, लघुउद्योग, अवजड उद्योग इ. उद्योगांचा समावेश होतो. | 4. तृतीयक व्यवसायात वाहतूक, व्यापार, वाणिज्य, संदेशवहन, पर्यटन इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो. |
| 5. द्वितीयक व्यवसाय मध्ये सुमारे 25 ते 30 टक्के जगातील लोकसंख्या गुंतलेले आहे. | 5. तृतीयक व्यवसायात जगातील लोकसंख्येपैकी सर्वात कमी म्हणजे 10 ते 15 टक्के लोकसंख्या गुंतलेले आहे. |

5) **उत्तर-**



| प्राकृतिक भूगोल | मानवी भूगोल |
|---|---|
| 1) नैसर्गिक घटकांचा आणि घडामोडींचा अभ्यास प्राकृतिक भूगोलात केला जातो. म्हणजेच पृथ्वीवरील प्राकृतिक घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे प्राकृतिक भूगोल होय. | 1) मानव आणि पर्यावरण यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संबंधांमुळे पृथ्वीवर नैसर्गिक पर्यावरणाबरोबरच मानवनिर्मित पर्यावरणाचेही स्वतंत्र स्थान निर्माण झाले. मानवनिर्मित पर्यावरणाची एक स्वतंत्र अशी वेगळी शाखा निर्माण झाली. भूगोलाची ही वेगळी शाखा म्हणजेच मानवी भूगोल होय. |
| 2) प्राकृतिक भूगोलात प्रामुख्याने पृथ्वीवरील प्राकृतिक घटक केंद्रस्थानी असतात. | 2)मानवी क्रियांमुळे मानवावर व निसर्गावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास शास्त्र म्हणजे मानवी भूगोल |
| 3) प्राकृतिक भूगोलात प्रामुख्याने शिलावरण, जलावरण, वातावरण आणि जीवावरण यांचा अभ्यास केला जातो. | 3) मानवी भूगोलात मानव हा केंद्रस्थानी आहे. |

| | |
|---|---|
| 4) शिलावरणाच्या अभ्यासात प्रामुख्याने भू म्हणजे जमिनीशी संबंधित विषयांचा अभ्यास केला जातो. जलावरणाच्या अभ्यासात पृथ्वीवरील पाणी आणि त्यासंबंधित विविध घटकांचा अभ्यास केला जातो. वातावरणाच्या अभ्यासात वायू किंवा हवा आणि त्यांचे पृथ्वी सभोवतालचे आवरण या विषयांचा अभ्यास केला जातो. जीवावरणाच्या अभ्यासात पृथ्वीवरील सजीव आणि त्यांचा पृथ्वीवरील अन्नघटकांशी येणारा संबंध या सहसंबंधांचा अभ्यास केला जातो. | 4) मानवी भूगोलात मानवाने प्राकृतिक घटकांचा उपयोग करून उभारलेले आपले स्वतःचे विश्व किंवा मानवी घटक यांचा अभ्यास केला जातो. यात प्रामुख्याने आर्थिक क्रिया, सामाजिक रचना, राजकीय व्यवस्था आणि सांस्कृतिक विकास या अभ्यासविषयांचा समावेश होतो. |
| 5) खगोलशास्त्र, हवामानशास्त्र, भूरूपशास्त्र भूगर्भशास्त्र, मृदाशास्त्र, सागरशास्त्र, जीव भूगोल या प्राकृतिक भूगोलाच्या उपशाखा आहेत. या सर्व शाखा एकमेकांशी निगडित आहेत. | 5) लोकसंख्या भूगोल, आर्थिक भूगोल, राजकीय भूगोल, सामाजिक भूगोल, या ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक भूगोल, प्रादेशिक भूगोल आणि शहरी भूगोल या विशेष शाखांसह वसाहत भूगोल या मानवी भूगोलाच्या विविध शाखा आहेत. या सर्व उपशाखा कमी-अधिक प्रमाणात एकमेकांशी निगडित आहेत. |

**प्रश्न 4 अ) तुम्हास दिलेल्या जगाचा नकाशामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साह्याने दाखवा आणि सूची तयार करा. (कोणतेही सहा)** **6**



सूची :

| अ.क्र. | विवरण | सांकेतिक चिन्हे व खुणा |
|---|---|---|
| १ | लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील पाचव्या टप्प्यातील कोणतेही दोन देश |  |
| २ | सर्वाधिक लोकसंख्येचा देश |  |
| ३ | भारतातील एक महानगर . |  |
| ४ | नैऋत्य अटलांटिक मधील मासेमारी क्षेत्र. |  |
| ५ | पंचमहासरोवराजवळील औधोगिक क्षेत्र |  |
| ६ | दोन खंडादरम्यान वाहतूक करणारा लोहमार्ग. |  |
| ७ | अँडीज पर्वतीय प्रदेश | ∧ ∧ |
| ८ | कॅनडातील सुचीपर्णी वनक्षेत्र. |  |

**प्रश्न 4 ब) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **5**

1) विभाजित आयात जगातील खंड निहाय भूमीची टक्केवारी दर्शवितो.
2) आशिया  खंडात भूमीची टक्केवारी जास्त आहे.
3) ऑस्ट्रेलिया खंडात भूमीची टक्केवारी कमी आहे.
4) अटार्क्टिका खंडात ९.2% भूमीची टक्केवारी आहे.
5) युरोप खंडाची भूमी 68० टक्के आहे .

**प्रश्न 5. टीपा लिहा. (कोणतेही तीन)** 12

**1) उत्तर-**

1. जन्मदर आणि मृत्युदरामुळे लोकसंख्येत वाढ किंवा घट होते. मात्र, लोकसंख्येतील ही वाढ किती होणार आहे की लोकसंख्येत घट होणार आहे ही बाब जन्मदर आणि मृत्युदरातील तफावतीवर अवलंबून असते.

2. जन्मदर आणि मृत्युदर दोन्ही जास्त असल्यास लोकसंख्या कमी असते, तसेच स्थिरही असते. जन्मदर जास्त मात्र मृत्युदर घटत असल्यास लोकसंख्या वाढत जाते.

3. जन्मदर जास्त व मृत्युदर कमी या टप्प्यात लोकसंख्येत प्रचंड वाढ होते, हीच लोकसंख्या स्फोटाची स्थिती असते.

4. जन्मदर घटत असल्यास आणि मृत्युदर कमी होत असल्यास लोकसंख्येत अत्यल्प वाढ होते आणि पुढे पुढे लोकसंख्या स्थिर होत जाते.

5. जन्मदर खूप कमी आणि मृत्युदरही खूप कमी असल्यास लोकसंख्या कमी असते, मात्र ती स्थिर असते.

6. काही वळेस तर जन्मदर कमी आणि मृत्युदर जास्त अशी परिस्थिती उद्भवते आणि तेव्हा त्या देशाची किंवा प्रदेशाची लोकसंख्या प्रत्यक्षात कमी होत जाते. त्यालाच लोकसंख्येची नकारात्मक वाढ असेही म्हणतात.

**2) उत्तर-**

1. लोकसंख्या अभ्यासक लोकसंख्येचे वय व लिंगानुसार वितरण दर्शवण्यासाठी मनोऱ्याचा वापर करतात. लोकसंख्या मनोऱ्याचे तीन प्रमुख प्रकार पडतात. विस्तारणारा, संकोचनारा आणि स्थिरावलेला मनोरा.

2. विस्तारणाऱ्या मनोऱ्याचा तळ विस्तारत जाणार असून शीर्षाकडे तो निमुळता होत असतो. हा मनोरा जन्म आणि मृत्यू दोन्ही दूर जास्त आहेत असे सांगतो.

3. संकोचनारा मनोऱ्याचा तळ संकुचित होत जातो. तर शिष्याकडे विस्तारलेला आहे.हा मनोरा जन्मदर कमी तर मृत्युदर अगदी कमी असतो असे सांगतो.

4. तिसरा स्थिरावलेला मनोऱ्यातील वयोगटाच्या प्रत्येक गटाची टक्केवारी जवळजवळ समान असते. लोकसंख्या मनोऱ्यात 15 ते 59 या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास ते कार्यशील लोकसंख्या जास्त असण्याचे निर्देशक असते.

5. याउलट 0 ते 15 वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास ते अवलंबित्व चे प्रमाण जास्त असते. तसेच 60 पेक्षा जास्त वयोगटातील लोकांचे प्रमाण जास्त असल्यास देशाच्या वैद्यकीय व आरोग्य सुविधांवर होणारा खर्च वाढणार निदर्शनास येते.

6. स्त्री-पुरुषांचा लोकसंख्येतील प्रमाणाला लिंगगुणोत्तर म्हणतात. देशातील दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे असणारे प्रमाण दाखवतात. देशातील स्त्रियांची स्थिती पुरुषाच्या तुलनेत किती हे लिंगगुणोत्तर याच्या आधारे समजण्यास मदत होते.

7. जागतिक स्तरावर लिंग गुणोत्तराचे सर्वसाधारण प्रमाण 990 स्त्रिया असे आहे. जगामध्ये विकसित राष्ट्रांमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे. तर जगात सर्वात कमी लिंगगुणोत्तर आशिया खंडात आहे.

**3) उत्तर-**

नागरी वस्तीच्या वाढीबरोबरच नागरी वस्तीच्या समस्या मध्ये ही दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. त्या समस्या खालील प्रमाणे आहेत.

**1. पायाभूत सोयी सुविधांची कमतरता** - वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी वस्तीच्या पायाभूत सोयी-सुविधांवर ताण निर्माण होतो. नागरी वस्तीत पाणीपुरवठा वाहतूक इत्यादी पायाभूत सुविधांची कमतरता जाणवते.

**2. आर्थिक समस्या** - अधिक लोकसंख्येमुळे सर्वांनाच काम मिळते असे नाही. त्यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. त्याचा परिणाम आर्थिक समस्या वरती होतो.

**3. सामाजिक समस्या** - येणारे स्थलांतराचे लोंढे, जागेच्या वाढत्या किमती त्यामुळे झोपडपट्टीची समस्या निर्माण होते. गुन्हेगारी व इतर अवैध प्रकारच्या कार्यात वाढ होऊन सामाजिक आरोग्य धोक्यात येते.

**4. सांस्कृतिक समस्या** - नागरी वस्त्यांमध्ये वेगवेगळ्या प्रदेशातून येणाऱ्या लोकांमुळे संस्कृतीक भिन्नता, भाषावाद, प्रांतवाद व धार्मिक वाद निर्माण होतो.

**5. पर्यावरणीय समस्या वाढते** - नागरीकरण यामुळे नागरी वस्त्यांमध्ये जल, वायू व ध्वनी इत्यादी प्रकारचे प्रदूषण वाढत आहे.

**6. प्रशासकीय समस्या** - नागरी भागातील वाढत्या लोकसंख्येला प्रशासकीय सेवा सुविधा पुरविण्यात अडचणी येतात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढते.

**4) उत्तर-**

उष्ण कटिबंधीय प्रदेशातील भौगोलिक परिस्थितीला अनुसरून विशिष्ट पिकांची मोठ्या प्रमाणावर जी लागवड केली जाते त्यास मळ्याची शेती असे संबोधले जाते.

**मळ्याच्या शेतीची वैशिष्ट्ये -**

1) मळ्याची शेती ही व्यापारी तत्त्वावर केवळ व्यापारासाठी केली जाते.

2) मळ्याच्या शेतीचे क्षेत्र फारच विस्तृत असते आणि जास्त भांडवलाची आवश्यकता असते.

3) विस्तृत शेती क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणावर मजुरांचा वापर केला जातो.

4) त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञान देखरेखीसाठी व जंतुनाशके कीटकनाशकांच्या फवारणीसाठी हेलिकॉप्टरचा वापर ही या शेतीत केला जातो.

5) या शेतीत प्रामुख्याने चहा, कॉफी, रबर या प्रमुख नगदी पिकांचे व मसाल्याचे पदार्थ, काजू या दुय्यम पिकांचे उत्पादन घेतले जाते.

6) मात्र क्षेत्रात एकाच प्रमुख पिकांची लागवड केली जाते त्यामुळे या शेती प्रकारास एक पीक शेती असेही म्हटले जाते.

7) प्रदेश-भारत, श्रीलंका, मलेशिया, ब्राझील, म्यानमार, इंडोनेशिया, फिलिपाईन्स, कॅरिबियन बेटे, व्हीयतनाम या भागात मळ्याची शेती आढळून येते.

**मळ्याच्या शेतीच्या समस्या -**

1) वाहतूक साधनांचा व भांडवल यांचा अभाव आणि प्रदूषण या प्रमुख समस्या आहेत.

2) याव्यतिरिक्त विस्तृत शेती जमिनीमुळे निगा राखण्यासाठी अडचणी येतात.

3) मजुरांचे प्रश्न आणि एक पैकी शेत क्षेत्रामुळे पर्यावरणातील बदलामुळे होणारे संभाव्य नुकसान या समस्याही आहेत.

**5) उत्तर-**

1. वाहतूक एक तृतीयक आर्थिक क्रिया असून ती व्यापार करण्यासाठी फार महत्त्वाची आहे.
2. भूवाहतूक, जलवाहतूक आणि हवाई वाहतुकीचे महत्त्व व्यापाऱ्यांमध्ये अनन्यसाधारण आहे.
3. वाहतूक साधनांद्वारे एखाद्या प्रदेशात आवश्यक असणारा माल हा दुसऱ्या प्रदेशातून पाठविता येतो.
4. यातून एका प्रदेशाचा दुसऱ्या प्रदेशाशी व्यापार चालतो. वाहतुकीमुळे माल हा कारखान्यापासून बाजारपेठेपर्यंत व ग्राहकापर्यंत पोहोचविला जातो, व व्यापार वृद्धिगत होतो.
5. मालाचे उत्पादन घेणारा प्रदेश व बाजारपेठ दूर-दूर असतात. त्यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य वाहतूक साधनांमुळे शक्य होते.
6. ज्या प्रदेशात भूमार्ग, जलमार्ग व हवाई मार्गाचा विकास झालेला असतो, अशा प्रदेशात व्यापाराला अधिक चालना मिळते व व्यापाराचा विकास होतो.
7. त्यामुळे व्यापारामध्ये एक महत्त्वाची भूमिका वाहतुकीचे आहे.

**प्रश्न 6 अ) उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा. 4**

**उत्तर -**

1) पर्यटन क्षेत्रात नियोजनाची आवश्यकता आहे. कारण पर्यटन क्षेत्रातील निश्चित उद्दिष्टे साध्य करता येतील आणि पर्यटन विकासाकडे लक्ष दिले जाऊ शकते शकते.


2) समुदाय हे पर्यटनाचे मूलभूत तत्त्व आहे. पर्यटनाचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम हा समुदायावर होणारा असतो. त्यामुळे त्यांची स्वीकृती आणि सहभाग हा पर्यटनाच्या नियोजनात महत्त्वाचा आहे.

3) ① उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार जास्तीत जास्त वाढवणे. ② विविध क्षेत्राची योग्य वाढ करणे.

4) मुख्यतः पर्यावरणीय सामाजिक सांस्कृतिक आणि इतर कोणत्याही गंतव्यस्थाने यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.

**प्रश्न 6 ब) आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन) 4**

1) **लोकसंख्या संक्रमण टप्पे.**




2) **भूगोलाचा अन्यविषयाशी सहसंबंध.**



3) **विखुरलेली वस्ती**




**प्रश्न 7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.(कोणतेही एक) 8**

1) **उत्तर-**

लोकसंख्येच्या वितरणावर प्रामुख्याने प्राकृतिक घटकांचा जास्त प्रभाव पडतो. अनुकूल प्राकृतिक पर्यावरणात साधारणतः जास्त लोकसंख्या असते, तर प्रतिकूल प्राकृतिक पर्यावरणात कमी लोकसंख्या असते. मात्र, मानवनिर्मित सांस्कृतिक पर्यावरणाचे घटकही काही प्रदेशात जास्त प्रभावी ठरतात आणि त्यामुळे काही वेळेस प्राकृतिक पर्यावरण प्रतिकूल असूनही सांस्कृतिक पर्यावरणाच्या प्रभावामुळे त्या प्रदेशात जास्त लोकसंख्या आढळते.

**अ) आर्थिक घटक :**

**1) औदयोगिक विकास** : जेथे नोकरी / कामधंदा मिळण्याची संधी सहजासहजी उपलब्ध असते, अशा ठिकाणी लोक कायमची वस्ती करून राहतात. शहरांमधील सरकारी खात्यात किंवा खाजगी संस्थांमध्ये, तसेच कारखाने, खाणकाम, वाहतूक, दळणवळण, शिक्षण यांसारख्या क्षेत्रात नोकरी / कामधंदा मिळण्याची शक्यता जास्त असते. शहरांमध्ये औदयोगिक विकास व व्यापाराची प्रचंड उलाढाल होत असते, यामुळे शहरात लोकवस्ती एकवटलेली आढळते. लंडन, शांघाय, टोकियो, सिंगापूर, मुंबई-दिल्ली यांसारख्या शहरात लोकवस्ती अतिशय दाट आहे.

**2) वाहतूक व दळणवळणाच्या सोयी** : शहरे, बंदरे व रेल्वे जंक्शन्स या ठिकाणी वाहतुकीची साधने व दळणवळणाच्या सोयी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे तेथे मालाची व प्रवाशांची सतत चढ उतार

होत असते, पर्यायाने तेथील व्यापार वाढतो. मोठ्या बंदरांचा विकास होऊन ती आयात-निर्यात व्यापाराची कैंद्रे बनतात. उदा., मुंबई, कोलकाता पुढे या बंदरांच्या आजूबाजूस रस्त्यांचा विकास झाल्यामुळे तेथे अनेक उपनगरे निर्माण होऊन तेथील शहराच्या लोकसंख्येत भर पडत आहे.

**3) व्यापारी शेती** : ज्या प्रदेशात शेतीयोग्य जमीन, पोषक हवामान व जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध आहेत, अशा प्रदेशात शहरांना पूरक किंवा निर्यातक्षम वस्तूंच्या उत्पादनासाठी शेती व्यवसाय विकसित होतो. अशा प्रदेशात लोकवस्ती जास्त प्रमाणात आढळते. उदा., शहरांच्या आसपास ट्रक फार्मिंग किंवा मंडई बागायती क्षेत्र.

**4) खाणकाम व्यवसाय** : ज्या प्रदेशात विपुल खनिजसंपत्ती उपलब्ध असते. अशा प्रदेशात लोकसंख्येचे कैंद्रीकरण झालेले दिसते. उदा.भारतातील दख्खनचे पठार, ऑस्ट्रेलियातील सोन्याच्या खाणांचा प्रदेश, मध्यपूर्वेतील खनिज तेल संपन्न देश.

**5) नागरीकरण** : शहरात येऊन कायमचे वास्तव्य करण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे शहरांची संख्याजास्त देखील वाढत आहे. शहरात नोकरी/कामधंदा मिळण्याची सुलभता, कामाच्या जागी आवश्यक सुविधा, राहण्यासाठी चांगली घरे तसेच व्यापार, वाहतूक, शिक्षण, करमणूक यांच्या आवश्यक सोयी यांमुळे ग्रामीण भागातील लोकांचा ओघ शहराकडे येत राहतो. या कारणांमुळे लंडन, टोकियो, सोम पाऊल, बीजिंग, मुंबई, कोलकाता यांसारख्या शहरात लोकवस्ती अत्यंत दाट झालेली आढळते.

**<u>ब) सामाजिक घटक</u>** : जगातील वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या सामाजिक रूढी असतात. भारतात खेडोपाडी आजही बालविवाह व लवकर लग्न करण्याची पद्धत आहे. आफ्रिकेत काही समाजात बहुपतिकत्व आणि बहुपत्नीकत्व या चालीरिती आहेत. अशा सामाजिक रूढींचा परिणाम त्या-त्या देशांतील लोकसंख्या वाढीवर झालेला दिसून येतो.

**<u>क) राजकीय व ऐतिहासिक घटक</u>** : कोणत्याही देशात खळबळजनक राजकीय बदल झाला, तर लोकांचे मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. हिंदुस्थानची फाळणी झाल्याने पाकिस्तानमधून लाखो निर्वासित भारतात आले. तसेच बांगला देशाची निर्मिती होण्यापूर्वीदेखील तेथून मोठ्या संख्येने निर्वासित भारतात आले. त्यांचे पुनर्वसन करण्यात आले व नवीन शहरे निर्माण झाली.एखादया प्रदेशातील राजकीय तणाव हादेखील त्या प्रदेशातील लोकसंख्या कमी होण्यास कारणीभूत ठरतो. कारण युद्धाचा धोका टाळण्यासाठी लोक राजकीय यंत्रणा असलेल्या प्रदेशातून दूर जातात.उदा., सिरिया या देशातील युद्धजन्य, अस्थिर परिस्थितीमुळे लोकसंख्येवर विपरीत परिणाम झाला आहे.

काही देशांचे बदलते राजकीय धोरणही लोकसंख्या वितरणावर प्रभाव पाडते. उदा., सायबेरियासारख्या अतिविषम हवामानाच्या प्रदेशात स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांना रशियाचे सरकार विशेष भत्ते आणि जीवनावश्यक सुविधा देऊ करते. जगातील अनेक देश सध्या शहरांमधील गर्दी कमी करण्यासाठी विकेंद्रीकरणाच्या धोरणास प्रोत्साहन देत आहेत. अशा प्रकारच्या शासकीय धोरणांचा प्रभावही लोकसंख्या वितरणावर होतो.

भारत व चीन यांसारख्या देशांना त्यांच्या प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभला असल्यामुळे या देशांत फार पूर्वीपासून लोकवस्ती केंद्रित झालेली आढळते.

**2) उत्तर-**

वस्तूची देवाणघेवाण किंवा आदलाबदल करण्याचे माध्यम म्हणजे व्यापार होय. व्यापारावर खालील विविध घटकांचा परिणाम दिसून येतो.

**1) नैसर्गिक संसाधनाचे वितरण असमान** - मृदा, खनिजे, वने, भूमी, जल आणि मानवी संसाधने अशा सर्व संसाधनाचे वितरण असमान असते. मृदा संसाधन ज्या देशात विपुल व उच्च प्रतीचे असते, तेथे कृषी संबंधित व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. असे देश हे अन्नधान्य व इतर पिकांचे निर्यातदार बनू शकतात. याउलट ज्या देशात मोठ्या प्रमाणावर शेती केले जात नाही, अशा देशांना अन्नधान्य आयात करावे लागते. उदा: आखाती देश खनिज तेल निर्यात करतात. या देशात हे खनिजे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत, त्या बदल्यात ते अन्नधान्य आयात करतात.

**2) हवामानाचा परिणाम** - हवामानाचा परिणाम प्रदेशातील वनस्पती व प्राणी यांच्यावर होत असतो. देशातील उत्पादनाचे प्रकार हे देखील हवामानावर अवलंबून असतात. उदा: वर्षातील बराच काळ हिमाच्छादन असलेले देश प्रामुख्याने मांस व लोकर उत्पादनाची निर्यात करतात. तर उष्णकटिबंधीय देश केळी, तांदूळ, कोको, चहा यांचे उत्पादन घेतात, व ही उत्पादने निर्यात करतात. उदा: श्रीलंका हा चहा निर्यात करणारा प्रमुख देश आहे.

**3) लोकसंख्या प्रमाण** - लोकसंख्येचे प्रमाण, वितरण व विविधता यामध्ये वेगवेगळ्या देशात फरक दिसून येतो. त्यामुळे विविध उत्पादने देश निहाय घेतली जातात व व्यापार होतो. तसेच व्यापाराच्या प्रमाणावर हि त्याचा परिणाम होतो. दाट लोकवस्ती असलेल्या देशांना स्वतःच्या लोकसंख्येकरिता अन्नपुरवठा बाबत चिंता करावी लागते. विविध वस्तू आणि सेवांची मागणी ही राहणीमानाच्या दर्जावर अवलंबून असते. कारण कमी लोकसंख्येमुळे वस्तूचे उत्पादन कार्यात देखील कमी मनुष्यबळ गुंतलेले असते.

**4) विशिष्ट कला आणि हस्तकला** - जगातील काही प्रदेश त्यांची उत्पादने, विशिष्ट कला आणि हस्तकला यासाठी ओळखले जातात. त्यांचे जगभरात मूल्य अधिक असते. उदा: चिनी मातीची उत्पादने, इराणी गालिचे, इंडोनेशियातील बाटिक प्रिंट, भारतातील कश्मीरी शाल आणि रेशीम यांना जगभर मोठी मागणी आहे. यामुळे व्यापारास मोठी चालना मिळते.

**5) उत्पादनावरील खर्च** - हा उत्पादनातील मुख्य घटक आहे. काही उत्पादनांची देशात निर्मिती करण्यापेक्षा बाहेरून आयात करणे स्वस्त होत असल्यास ही व्यापार होतो. उदा: एखाद्या देशात चहाच्या उत्पादनासाठी हवामान आणि प्राकृतिक रचना अनुकूल नसेल तर त्याला चहा उत्पादक देशाकडून चहा आयात करणे सोयीस्कर जाईल.

**6) निपुणता** - काही देशांमध्ये विशेष वस्तू निर्मिती व सेवा आहेत. उदा: इज्राईल ने कोरडवाहू शेती आणि शेती अभियांत्रिकीमध्ये स्वतःला विकसित केले आहे. ते आपल्या सेवा वाळवंटी भागात शेती करू इच्छिणाऱ्या देशांना निर्यात करतात. तसेच अशा काही विशेष वस्तू व सेवांची आंतरराष्ट्रीय मागणी असते आणि त्यामुळे देशादरम्यान व्यापार होऊ शकतो.

**7) शासकीय धोरण** - आंतरराष्ट्रीय व्यापार चालणे किंवा बंद होणे हे शासन धोरणावरही अवलंबून असते. शासनाचे मुक्त व्यापार धोरण नागरिकांना दुसऱ्या देशात खरेदी किंवा विक्री करण्यापासून प्रतिबंधित करणार नाही. उदा: दुसऱ्या देशाचे चांगले संबंध राखण्यासाठी एखादा देश त्यांच्याबरोबर व्यापार करू शकतो.

# प्रकरण 1 लोकसंख्या भूगोल भाग- 1

**प्रश्न 1 अ ) साखळी पुर्ण करा.**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1) भूमी 30% व लोकसंख्या 60% | 1) भूमीक्षेत्र 9 % | 1) लोकसंख्येची घनता कमी |
| 2) अंटार्क्टिका खंड | 2) सागरी किनारी प्रदेश | 2) लोकसंख्या वाढीचादर स्थिर |
| 3) लोकसंखेच्या घनतेस कारणीभूत प्राकृतिक घटक | 3) आशिया | 3) भारतीय पश्चिम किनारपट्टी |
| 4) प्रतिकूल हवामान | 4) जन्म व मृत्युदर जास्त | 4) लोकसंख्येची घनता जास्त |
| 5) लोकसंख्या संक्रमण पहीला टप्पा | 5) उष्णकटिबंधीय प्रदेश | 5) स्थायिक लोकसंख्या नाही |

**उत्तर-**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1) भूमी 30% व लोकसंख्या 60% | 3) आशिया | 4) लोकसंख्येची घनता जास्त |
| 2) अंटार्क्टिका खंड | 1) भूमीक्षेत्र 9 % | 5) स्थायिक लोकसंख्या नाही |
| 3) लोकसंखेच्या घनतेस कारणीभूत प्राकृतिक घटक | 2) सागरी किनारी प्रदेश | 3) भारतीय पश्चिम किनारपट्टी |
| 4) प्रतिकूल हवामान | 5) उष्णकटिबंधीय प्रदेश | 1) लोकसंख्येची घनता कमी |
| 5) लोकसंख्या संक्रमण पहीला टप्पा | 4) जन्म व मृत्युदर जास्त | 2) लोकसंख्या वाढीचादर स्थिर |

**प्रश्न 1 ब) योग्य पर्याय निवडून योग्य विधाने पुन्हा लिहा.**

*** लोकसंख्या संक्रमणातील खालीलपैकी ऋणात्मक वाढीचा टप्पा कोणता**

अ) पहिला टप्पा  
ब) तिसरा टप्पा  
क) चौथा टप्पा  
ड) पाचवा टप्पा

**उत्तर - ड) पाचवा टप्पा**
**लोकसंख्या संक्रमण संक्रमणातील पाचवा टप्पा ऋणात्मक वाढीचा टप्पा आहे**

**⁕ लोकसंख्या संक्रमणाच्या कोणत्या टप्प्यात शेती व उद्योगातील उत्पन्न वाढलेले असते**

अ) अतिशय स्थिर टप्प्यात
ब) **आरंभीच्या काळात विस्तारणारा टप्प्यात**
क) कमी बदल दर्शवणाऱ्या टप्प्यात
ड) ऋणात्मक वाढीच्या टप्प्यात

**उत्तर-** ब) आरंभीच्या काळात विस्तारणारा टप्प्यात
आरंभीच्या काळात विस्तारणाऱ्या टप्प्यात शेती व उद्योगातील उत्पन्न वाढलेले असते

**⁕ स्थायी लोकसंख्या नसलेला खंड**

अ) ऑस्ट्रेलिया
ब) अंटार्क्टिका
क) ग्रिनलँड
ड) कांगो नदीचे खोरे

**उत्तर-** ब) अंटार्क्टिका
अंटार्टीका खडावर स्थायी लोकसंख्या नाही.

**⁕ लोकसंख्या संक्रमणातील पाचव्या टप्प्यातील देश-**

अ) नायजर
ब) चीन
क) स्वीडन
ड) संयुक्त संस्थाने

**उत्तर-** अ) स्वीडन
स्वीडन हा देश लोकसंख्या संक्रमणातील पाचव्या टप्प्यातील देश आहे.

**⁕ चीन हा देश लोकसंख्या संक्रमणाच्या कोणत्या टप्प्यात आढळतो.**

अ) अतिशय स्थिर
ब) आरंभिच्या काळात विस्तारणारा टप्पा
क) नंतरच्या काळात विस्तारणारा
ड) शुन्य वाढ दर्शविणारा

**उत्तर**- क) नंतरच्या काळात विस्तारणारा
चीन हा देश लोकसंख्या संक्रमणाच्या नंतरच्या काळात विस्तारणारा टप्प्यात आढळतो

**⁕ खालीलपैकी कोणते क्षेत्र कमी लोकसंख्येचे असावे**

अ) गंगा नदी खोरे
ब) मसिसीपी नदी खोरे
क) ॲमेझॉन नदीचे खोरे
ड) हो- यांग- हो नदी खोरे

उत्तर- क) **ॲमेझॉन नदीचे खोरे**

**ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात कमी लोकसंख्येचे क्षेत्र आहे**

**प्रश्न 1 क ) अयोग्य घटक ओळखा**

*** लोकसंख्या संक्रमण सिद्धांताचे टप्पे**

अ) अतिशय स्थिर | ब) शुन्य वाढ दर्शवणारा

क) अतितीव्र वाढ दर्शवणारा | ड) कमी बदल दर्शविणारा

**उत्तर-** क) अतितीव्र वाढ दर्शवणारा

*** खनिजांमुळे दाट लोकवस्ती असणारे देश प्रदेश**

अ) झांबियातील कंटगा | ब) पश्चिम युरोप

क) मांचूरिया | ड) गंगा नदी सुपिक खोरे

**उत्तर-** ड) गंगा नदी सुपिक खोरे

*** लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे प्राकृतिक घटक**

अ) हवामान | ब) प्राकृतिक रचना

क) शेती | ड) मृदा

**उत्तर**- क) शेती

*** जास्त लोकसंख्येसाठी अनुकूल परिस्थिती**

अ) सुपीक शेती योग्य मृदा | ब) सौम्य समशीतोष्ण हवामान

क) पाण्याची उपलब्धता | ड) अतिउष्ण हवामान

**उत्तर-** ड) अतिउष्ण हवामान

*** लोकसंख्या संक्रमण प्रतिमानातील दुसऱ्या टप्प्यातील देश**

अ) भारत | ब) कांगो

क) बांगलादेश | ड) नायजर

**उत्तर-** अ) भारत

*** लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे मानवी घटक**

अ) शेती | ब) खाणकाम

क) वाहतूक | ड) हवामान

**उत्तर-** ड) हवामान

**पश्न 1 ड) अचूक सहसंबध ओळखा. (A : विधान, R : कारण)**

* **A : लोकसंख्येचे सर्व गुणधर्म, जे मोजतात येतात त्यांना लोकसंख्येचे घटक म्हणतात.**
  **R : लिंग गुणोत्तर, वैवाहिक स्थिती, वय हे लोकसंख्येचे घटक आहेत**
  (अ) केवळ A बरोबर आहे (ब) केवळ **R** बरोबर आहे
  (क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.
  (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही

**उत्तर- पर्याय** (क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

* **A : लोकसंख्या संक्रमण सिध्दांतात पहील्या अतिशय स्थिर टप्प्यात लोकसंख्या जास्त असते.**
  **R : या टप्पयात जन्मदर व मृत्यूदर जास्त असतात. .**
  (अ) केवळ A बरोबर आहे (ब) केवळ **R** बरोबर आहे
  (क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.
  (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही

**उत्तर**- पर्याय (ब) केवळ **R** बरोबर आहे

* A : सुपीक मैदानी प्रदेशात दाट लोकवस्ती आढळते
  R : सुपीक मृदा हे शेतीसाठी उपयुक्त असते
  अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.
  क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.
  ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर- क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.**

* A : प्रदेशातील लोकसंख्येत बदल होत नाहीत
  R : जन्मदर, मृत्यूदर आणि स्थलांतराचा प्रदेशातील लोकसंख्या व लोकसंख्येवर परिणाम होतो
  अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.
  क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर- ब) केवळ R बरोबर आहे**.

**प्रश्न 1 इ) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

1) ऑस्ट्रेलिया खंडात कायम निवासी लोकसंख्या सर्वात कमी आहे-

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

2) आशिया खंडाची खंडांतर्गत भूमिची टक्केवारी सर्वात कमी आहे-

**उत्तर- हे विधान चूक आहे**

3) अंटार्टिका खंडावर लोकसंख्येची घनता दाट आहे

**उत्तर- हे विधान चूक आहे**

4) विषुववृत्तीय प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता अतिशय कमी आढळते

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

5) लोकसंख्या संक्रमणाच्या चौथ्या टप्प्यात देशाची प्रगती काहीशी कमी झालेली असते

**उत्तर- हे विधान चूक आहे**

6) स्विडन देशात प्रौढाचे प्रमाण जास्त आहे.

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

7) उत्तर अमेरिका खंडाचे भूमीक्षेत्र सर्वात जास्त आहे.

**उत्तर- हे विधान चूक आहे**

**प्रश्न 2 रा ) खालील विधांनाचे योग्य कारणे दया.**

**1) भारत लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातून जात आहे.**

**उत्तर-** ① लोकसंख्या संक्रमणांच्या तिसऱ्या टप्प्यात मृत्यूदर व जन्मदर दोन्ही कमी झालेले असतात त्यामुळे लोकसंख्यावाढीचा दर कमी झालेला असतो. परंतु लोकसंख्या वाढतच असते. लोकसंख्येच्या बाबतीत भारताशी अशीच स्थिती आहे. ② या टप्प्यात देशाच्या प्रगतीचा वेग वाढून देशातील नागरिकांचे उत्पन्न वाढलेले असते, भारताचा प्रगतीचा वेग वाढलेला असुन गेल्या काही दशकात नागरिकांचे उत्पन्न वाढलेले आहे. ③ तंत्रज्ञानाचा वापर, शैक्षणिक सोयी सुविधा, व्दितीयक व तृतीयक व्यवसांचा विस्तार हे

संक्रमणांच्या तिसऱ्या टप्प्यातील घटक भारतात सध्या आढळत आहेत. ④ कुटुंबनियोजनाचे महत्व पटल्याने भारतातील कुटुंबांचा आकार कमी होत आहे. ⑤ संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातील घटक भारतात आढळत असल्याने भारत लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातुन जात आहे असे म्हणता येईल.

**2) लोकसंख्या वितरण असमान असते.**

**उत्तर-** ① लोकसंख्या वितरणावर प्रामुख्याने प्राकृतिक घटकांचा प्रभाव असतो. ② प्राकृतिक रचना, अल्हाददायक हवामान, पाण्याची उपलब्धता, शेती योग्य सुपिक मृदा व मैदाने, या घटकांच्या उपलब्धतेच्या ठिकाणी लोकसंख्या जास्त असते परंतु हे प्राकृतिक घटक पृथ्वीवर समान प्रमाणावर वितरीत झालेले नाहीत. ③ मानवी जिवनास प्रतिकुल असलेले घनदाट अरण्ये, दलदलीचे प्रदेश, हवामान, पर्वत, वाळवंट, अति थंड व हिमाच्छादीत प्रदेश, असलेल्या प्रदेशात लोकसंख्या कमी आढळते यांचे प्राकृतिक घटकांच्या असमान वितरणामुळे लोकसंख्या वितरण असमान आहे.

3**) लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यात व्दितीयक व तृतीयक व्यवसायांची वाढ होते.**

**उत्तर-** ① लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यात मृत्यूदर व जन्म दर कमी झालेले असतात त्यामुळे लोकसंख्या वाढीचा दरही कमी झालेला असतो. ② लोकसंख्या वाढीचा दर कमी झालेला असतो. ③ या टप्प्यात लोकांचे उत्पन्न वाढते ते उदरनिर्वाहासाठी लागणाऱ्या उत्पनापेक्षा जास्त असते. ④ या टप्प्यात गरीबी कमी होवुन, नागरिक त्यांचे जास्तीचे उत्पन्न मुलभुत गरजांच्या व्यतिरीक्त राहणीमान उंचावण्यासाठी, तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी, अधिकच्या सोयी-सुविधा मिळविण्याठी खर्च करतात त्यामुळे आपोआप व्दितीयक व तृतीयक व्यवसायांना चालना मिळते व त्यातुनच या व्यवसायांची वाढ होते.

4**) जन्मदर कमी असुनसुध्दा लोकसंख्या वाढू शकते.**

**उत्तर-** ① जास्त लोकसंख्या असलेल्या प्रदेशात जन्मदर कमी झाला तरी बऱ्याचकाळ लोकसंख्या वाढत असते. ② यापुर्वीच वाढलेली लोकसंख्या व तसेच वैदयकीय तंत्रज्ञानाच्या वापरामुळे साथीच्या रोगांचा नायनाट झालेला असतो. ③ आरोग्या विषयी जागरुकता, शिक्षण, सामाजीक उन्नती यामुळे मृत्यूदरात झालेली घट झालेली असते ④ ही मृत्यूदरातील घट लोकसंख्या वाढीस उपयुक्तच असते. ⑤ प्रदेशातील शेती उत्पन्न, उदयोगातील इतर उत्पादने व स्थलांतर असे घटक मानवी गरजा पुर्ण करण्यास सक्षम असल्यास जन्मदर कमी असुनसुध्दा लोकसंख्या वाढू शकते.

5) **लोकंसख्या घनता ही लोकसंख्या आणि क्षेत्रफळावर अवलंबून असते.**

**उत्तर-** ① लोकसंख्येची घनता म्हणजे दर चौ. कि. मी. प्रदेशात राहणारी लोकांची संख्या होय. ② लोकसख्यंची घनता मावन व जमीन यांचे एखादया प्रदेशातील गुणोत्तर असते. ③ एखादया प्रदेशात कमी क्षेत्रफळावर जास्त लोकसख्या राहत असते तेव्हा तेथे लोकसंख्या जास्त आहे असे म्हटले जाते उदा. मुंबई ④ या उलट जास्त क्षेत्रफळावर कमी लोकसंख्या आढळते तेव्हा तेथे लोकसंख्या घनता कमी आहे असे

म्हटले जाते उदा. वाळंवटी प्रदेश किंवा महाराष्ट्रातील खेडे गाव म्हणजेच लोकसंख्येची घनता ही प्रदेशात राहणारी लोकसंख्या या घटका बरोबरच त्या प्रदेशाचे क्षेत्रफळ यावर अवलंबुन असते.

6) **लोकसंख्या शास्त्रीय संक्रमणाच्या पहील्या टप्प्यात लोकसख्या वाढ स्थिर असते.**

**उत्तर-** ① लोकसंख्या शास्त्रीय संक्रमणाच्या पहील्या टप्प्यात जन्मदर व मृत्युदर जास्त असतात. ② या टप्प्यात प्रजनन दर जास्त व कुटुंब मोठी, इतर सोयी-सुविधांचा अभाव असल्याने जन्माला येणाऱ्या चे प्रमाण जास्त असते. ③ परंतु विज्ञान व तंत्रज्ञानाचा, वैदयकीय सुविधांचा अभाव, संसर्गजन्य रोगांचा प्रार्दुभाव, गरीबी, कुपोषण यामुळे मृत्युपावणाऱ्या लोकांचे प्रमाणही जास्त असते. ④ त्यामुळे जवढे जन्माला येतात त्याच प्रमाणात इतरांचा मृत्यूही होत असतो अशा परीस्थितीमुळे लोकसंख्या वाढ स्थिर राहते.

**प्रश्न 3 रा) फरक स्पष्ट करा.**

- **लोकसंख्या संक्रमण : दुसरा टप्पा आणि लोकसंख्या संक्रमण: चौथा टप्पा**

| अक्र | **लोकसंख्या संक्रमण : दुसरा टप्पा** | **लोकसंख्या संक्रमण: चौथा टप्पा** |
|---|---|---|
| 1 | लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यास '**आरंभीच्या काळात विस्तारणारा**' टप्पा म्हणून संबोधले जाते. | लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यास '**कमी बदल दर्शविणारा**' टप्पा म्हणून संबोधले जाते. |
| 2 | या टप्प्यात मृत्युदरात घट झालेली असते, परंतु जन्मदर स्थिर असल्याने लोकसंख्या झापाटयाने वाढत असते. | या टप्प्यात जन्मदर व मृत्युदर कमी झालेले असतात. जन्मदर व मृत्युदर जवळजवळ सारखाच असतो त्यामुळे लोकसंख्या वाढ अत्यल्प असते. |
| 3 | या टप्प्यातील देशात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे वैदयकीय सुविधांचा विस्तार झालेला असतो. | या टप्प्यात उच्चतम वैदयकीय सुविधा उपलब्ध असतात पटकी, प्लेग सारख्या साथीच्या आजारांचा नायनाट झालेला असतो. |
| 4 | या टप्प्यातील देशात शेती व उदयोगधंदयातील उत्पादने वाढलेली असतात. | या टप्प्यातील देशात व्दितीय व तृतीय व्यवसायांचे प्रमाण प्राथमिक व्यवसायांपेक्षा खुप जास्त असते. |
| 5 | अधिक लोकसंख्या असणारेविकसनशील देश सध्या या टप्प्यातुन जात आहेत. उदा. कांगो, बांग्लादेश, नायजर व युगांडा | अमेरिकेची संयुक्त सस्थांने हाविकसीत देश या टप्प्यातुन जात आहे. |

- **लोकसंख्या संक्रमण : पहिला टप्पा आणि लोकसंख्या संक्रमण: पाचवा टप्पा**

| अक्र | **लोकसंख्या संक्रमण : पहिला टप्पा** | **लोकसंख्या संक्रमण: पाचवा टप्पा** |
|---|---|---|
| 1 | लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यास **'अतिशय स्थिर'** टप्पा म्हणून संबोधले जाते. | लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यास **'ऋणात्मक वाढीचा'** टप्पा म्हणून संबोधले जाते. |
| 2 | लोकसंख्या संक्रमणाच्या पहिल्या टप्प्यात जन्मदर व मृत्युदर दोन्ही जास्त असल्याने लोकसंख्या वाढ स्थिर असते. | लोकसंख्या संक्रमणाच्या पाचव्या टप्प्यात जन्मदर खुप कमी होवुन मृत्युदराशी समान झालेला असतो. त्यामुळे लोकसंख्या वाढ अत्यल्प असते. |
| 3 | जन्मदर जास्त असल्याने या टप्प्यातील प्रदेशात बालकांची संख्या जास्त असते. | या प्रदेशात जन्मदर कमी असल्याने बालकांची संख्या खुप कमी झालेली असते. |
| 4 | या टप्प्यातील देशात आर्थिक स्थिती विकसीत नसते. | या टप्प्यात नागरिकांची व देशाची आर्थिक स्थिती उत्तम असते. |
| 5 | या टप्प्यातील देशात शेती किंवा प्राथमिक व्यवसायांचे प्रमाण जास्त असते. | या टप्प्यातील देशात तृतीयक व्यवसायांचे प्रमाण सर्वाधिक असते. |
| 6 | या टप्प्यातील देशात शैक्षणिक संधी मर्यादीत असतात तर वैदयकीय सुविधांचा अभाव असतो. | या टप्याच्या प्रदेशात शैक्षणिक व वैदयकीय सेवा उच्च दर्जाच्या असतात. |
| 7 | स्वच्छतेचा अभाव, मोठी कुटुंबे, संसर्गजन्य रोंगाचा प्रादुर्भाव, कुपोषण अशा अनेक समस्या या प्रदेशातील लोकांना असतात. | उत्तम आरोग्य, चांगले पर्यावरण व आंनददायी जीवन या टप्प्यातील नागरीकांचे वैशिष्ट असते. |
| 8 | सदयस्थितीत एकही देश या टप्प्यात नाही. | स्वीडन व फिनलँड हे देश या टप्प्यात येतात. |

- **कमी लोकसंख्यचे प्रदेश आणि जास्त लोकसंख्येचे प्रदेश**

| **अक्र** | **विरळ लोकसंख्येचे प्रदेश** | **जास्त लोकसख्येचे प्रदेश** |
|---|---|---|
| **1** | पेक्षा कमी लोकसंख्येचे प्रमाण असणाऱ्या 150 क्षेत्रास विरळ लोकसंख्येचे .मी.प्रति चौरस कि .प्रदेश मानले जाते | पेक्षा जास्त लोकसंख्येचे प्रमाण 451 क्षेत्रास प्रदेश .मी.असणाऱ्या प्रति चौरस कि जास्त लोकसंख्येचे प्रदेश मानले जाते. |
| **2** | प्रतिकुल हवामान असणाऱ्या प्रदेशात | अनुकुल व सौम्य हवामानाच्या प्रदेशात |

| | | |
|---|---|---|
| | लोकसंख्या कमी आढळते. | लोकसंख्या जास्त आढळते. |
| **3** | वाळवंटी प्रदेशहिमाच्छादीत ,घनदाट वने , धृवीय प्रदेशात ,उंच पर्वतीय प्रदेश ,प्रदेश .लोकसंख्या विरळ आढळते | सौम्य व अल्हाददायक व मोसमी हवामान , पाण्याची ,नदयांचे सुपिक मैदानी खोरे समुद्र किनारी प्रदेशात लोकसंख्या ,उपलब्धता .जास्त आढळते |
| **4** | या प्रदेशात मानवी जीवन खडतर असल्याने लोकसंख्या कमी असते | या प्रदेशात मानवी जीवनास उपयुक्त अशी स्थिती उदयोगधंदयाचा विकास वाहतुक , .सुविधा यामुळे लोकसंख्या जास्त असते |

- **ढोबळ जन्मदर आणि ढोबळ मृत्युदर**

| अ क्र | **ढोबळ जन्मदर** | **ढोबळ मृत्युदर** |
|---|---|---|
| 1 | एका प्रदेशात एका वर्षात दर हजारी लोकसंख्येमागे जन्माला आलेल्या बालकांच्या (अर्भकांच्या) संख्येच्या दराला ढोबळ जन्मदर म्हणतात | एका प्रदेशात एका वर्षात दर हजारी लोकसंख्येमागे मृत्यु पावलेल्या आलेल्या बालकांच्या (अर्भकांच्या) संख्येच्या दराला ढोबळ जन्मदर म्हणतात |
| 2 | ढोबळ जन्मदर लोकसंख्येतील बदलात महत्वाची भूमीका बजावतो. | ढोबळ मृत्युदराची जन्मदराप्रमाणेच लोकसंख्येतील बदलात भूमीका असते. |
| 3 | ढोबळ जन्मदर हा वाढता असल्यास त्या प्रदेशातील लोकसंख्या वाढत असते. | जन्मदरापेक्षा मृत्यूदर कमी अथवा जास्त असल्यास त्या प्रदेशातील लोकसंख्या कमी अथवा जास्त होते. |
| 4 | ढोबळ जन्मदराचे प्रमाण कमी असलेले देश विकसीत असतात तर ढोबळ जन्मदराचे प्रमाण जास्त असलेले प्रदेश विकसनशील किंवा अविकसीत असतात. | अविकसतील देशात ढोबळ मृत्यूदर जास्त आढळतो. तर विकसीत देशात मृत्युदराचे प्रमाण कमी असते. |
| 5 | सन 2017 ची आकडेवारी नुसार ढोबळ जन्मदर जास्त असलेला देश नायजर (46.5) आहे. तर ढोबळ जन्मदर कमी असलेला प्रदेश ग्रीस (8.2) आहे | सन 2017 ची आकडेवारी नुसार ढोबळ मृत्युदर जास्त असलेला प्रदेश ग्रीस (11.6) आहे. तर मृत्युदर कमी असलेला प्रदेश भारत (7.2) आहे. |

*** प्रश्न 4 अ) जगाच्या नकाशात पुढील बाबी योग्य चिन्हाने दर्शवा.**

1 ऑस्ट्रेलियातील जास्त लोकसंख्येचा प्रदेश-पश्चिम ऑस्ट्रेलिया

2 भारतातील कमी लोकसंख्येचा प्रदेश हिमालय, थरचे वाळवंट


3 लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील दुसऱ्या टप्प्यातील दोन देश-कांगो, बांग्लादेश, युंगाडा, नायजर

4 लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील पाचव्या टप्प्यातील कोणतेही दोन देश स्वीडन, फिनलँड

5 लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातील एक देश-चीन

6 लोकसंख्या संक्रमणाच्या चौथ्या टप्प्यातील एक देश-अमेरिकेची संयुक्त संस्थाने


7 दक्षिण अमेरिका खंडातील कमी लोकसंख्येच्या घनतेचे प्रदेश-




| | चिन्ह/खुणा | विवरण |
|---|---|---|
| 1 | | ऑस्ट्रेलियातील जास्त लोकसंख्येचा प्रदेश-पश्चिम ऑस्ट्रेलिया |
| 2 | | भारतातील कमी लोकसंख्येचा प्रदेश- हिमालय, थरचे वाळवंट |
| 3 | | लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील दुसऱ्या टप्प्यातील दोन देश-कांगो, बांग्लादेश, युंगाडा,नायज |
| 4 | | लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील पाचव्या टप्प्यातील कोणतेही दोन देश-स्वीडन, फिनलँड |
| 5 | | लोकसंख्या संक्रमणाच्या तिसऱ्या टप्प्यातील एक देश-चीन |
| 6 | | लोकसंख्या संक्रमणाच्या चौथ्या टप्प्यातील एक देश-अमेरिकेची संयुक्त संस्थाने |
| 7 | | दक्षिण अमेरिका खंडातील कमी लोकसंख्येच्या घनतेचे प्रदेश- |

**प्रश्न 4 ब ) खालील आलेख / आकृत्यांचे निरीक्षण करुन त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1)**




**1) कोणत्या खंडात लोकसंख्या सर्वात कमी आहे ?**

**उत्तर -** ऑस्ट्रेलिया **खंडात लोकसंख्या सर्वात कमी आहे**

**2) भूमी व लोकसंख्येने या दोन्ही बाबतीत कमी असलेला खंड ?**

**उत्तर -** भूमी व लोकसंख्येने या दोन्ही बाबतीत कमी असलेला खंड ऑस्ट्रेलिया आहे

**3) भूमी व लोकसंख्येची टक्केवारी जास्त असलेला खंड कोणता ?**

**उत्तर -** भूमी व लोकसंख्येची टक्केवारी जास्त असलेला खंड आशिया आहे


**4) कोणत्या विभाजीत वर्तुळात एक खंड कमी आहे व का?**

**उत्तर -** लोकसंख्या वितरण दर्शविणाऱ्या खंडात अंटार्क्टिका खंड कमी असुन तेथे कायम (स्थायीक) वास्तव्य करणारी लोकसंख्या नाही.

**5) युरोप खंडाची भूमीची टक्केवारी किती?**

**उत्तर -** युरोप खंडाची भूमीची टक्केवारी 6.80% आहे.

**2) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा**



1. **आलेखातील निळी व काळी या रेषा काय दर्शवितात ?**

**उत्तर-** आलेखातील निळी रेषा जन्मदर व काळी रेषा मृत्यूदर दर्शविते.

**2. आलेखातील दाखविलेला हिरवा भाग काय दर्शवितो ?**

**उत्तर-** आलेखातील हिरवाभाग लोकसंख्येची नैसर्गिक वाढ दर्शवितो.

**3. आलेखात दाखविलेला निळा भाग काय दर्शवितो ?**

**उत्तर-** आलेखात निळा भाग लोकसंख्येची नैसर्गिक घट दर्शवितो.

**4. कोणकोणत्या टप्प्यात जन्मदर हा मृत्यूदरापेक्षा अधिक आहे.**

**उत्तर-** पहील्या व चौथ्या टप्प्यात जन्मदर अल्पप्रमाणातच जास्त आहे, परंतु दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यात जन्मदर मृत्यूदरापेक्षा अधिक आहे.

**5. कोणकोणत्या टप्प्यात जन्मदर हा मृत्यूदराएवढाच आहे ?**

**उत्तर-** आलेखात चौथ्या व पाचव्या टप्प्यात जन्मदर व मृत्यूदर दर्शविणाऱ्या रेषा एकमेकास स्पर्श करतांना दिसत आहेत. म्हणजेच चौथ्या व पाचव्या टप्प्यात जन्मदर व मृत्यूदरा ऐवढा आहे.

**6. कोणत्या टप्प्यात मृत्यूदर हा जन्मदरापेक्षा अधिक आहे ?**

**उत्तर-** आलेखात पाचव्या टप्प्यात मृत्यूदर दर्शविणारी रेषा ही जन्मदर दर्शविणाऱ्या रेषेच्या वर दिसत आहे. त्यामुळे पाचव्या टप्प्यात मृत्यूदर हा जन्मदरापेक्षा अधिक आहे असे म्हणता येईल.

**3) आकृतीचे निरीक्षण करा व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**




1) **आकृती काय दर्शविते**. -

**उत्तर**- आकृतीत जन्मदर व मृत्यूदरातील तुलना दर्शवीत आहे.

2) **जन्मदरापेक्षा मृत्युदर जास्त असल्यास लोकसंख्येवर काय परिणाम होईल**.

**उत्तर**- लोकसंख्या कमी होईल.

3) **मृत्यूदरापेक्षा जन्मदर जास्त असल्यास लोकसख्येवर काय परिणाम होईल**.

**उत्तर**- मृत्युदराच्या तुलनेत जन्मदर जास्त असल्यास लोकसंख्या वाढेल किंवा लोकसंख्या जास्त होईल

4) **दोन्ही दर समान असल्यास काय होईल?**

**उत्तर**- जन्मदर व मृत्युदर दोन्ही समान असल्यास लोकसंख्या स्थिर राहील

**5) दोन्ही दार समान राहू शकतात का तुमचे मत लिहा.**

**उत्तर**- दोन्ही दर अगदी समान असु शकत नाही असे वाटते. अपवादात्मक स्थितीत एखादया ठिकाणी अल्प काळासाठी अशी स्थिती येवु शकेल

**प्रश्न 5 वा. टीपा लिहा.**

**1 लोकसंख्येची घटक व रचना**

**उत्तर-** लोकसंख्येचे सर्व गुणधर्म, जे मोजता येतात त्यांना लोकसख्येचे घटक म्हणतात. उदा. ग्रामीण - नागरी निवास, वय, लिंग-गुणोत्तर, वैवाहिक स्थिती इ. या घटकांच्या आधारे लोकसख्येची वर्गवारी करता येते त्यामुळे प्रेदशातील लोकसंख्येची वैशिष्टे सुस्पष्ट होतात.

लोकसंख्येच्या घटाकांमुळे प्रदेशातील लोकसंख्येच्या रचनेचे सर्वसामान्य स्वरुप लक्षात येत असते. **उदा.** वयोरचनेच्या आधारे लोकसंख्येतील बाल, युवा, वृध्द यांची टक्केवारी कळते. लोकसंख्येच्या या रचनेमुळे आपल्याला अवलंबित्वाचे गुणोत्तर समजते. याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवसोवर कसा होईल हे लक्षात येतेकिंवा त्या बद्दल निष्कर्ष काढता येतो. लोकसंख्येच्या रचनेतील बदल हे सकारात्मक किंवा नकारात्मक असा असतो. रचनेतील बदल आर्थिक विकासाचा एक निर्देशक असतो.

**2 जागतिक लोकसंख्या वितरण**

**उत्तर-** आशिया खंडाची भूमी 30% तर त्यावर 60% लोकसंख्या राहते. आफ्रिका खंडाची भूमी 20% असुन तेथे जगाच्या तुलनेत 17% लोकसंख्या वास्तव्य करते. जगाच्या तुलनेत उत्तर व दक्षिण अमेरिका खंडमिळून 28% भूक्षेत्र आहे तर येथे केवळ 18% लोकसंख्या आहे. युरोप खंडाचे भूमीक्षेत्र जगाच्या तुलनेत 7% असुन तेथे जगातील 5% लोक राहतात. ऑस्ट्रेलिया खंडाची भूमी 6% असुन तेथे जगाच्या तुलनेत 1% सुध्दा लोकसख्या नाही. अंटार्क्टिका खंडाची भूमी 9% असुन तेथे स्थायिक लोकसंख्याच नाही.

पृथ्वीवर लोकसंख्या सारख्या प्रमाणात आढळत नाही. हवामान, खनिज संपत्ती उपलब्धता, सुपिक मृदा, पाण्याची उपलब्धता, या घटकांमुळे काही प्रदेशात लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळते तर काही प्रदेशात लोकसंख्या कमी आढळते या वरुन लोकसंख्या वितरण असमान आहे असे लक्षात येते.

**3 भूरचनेचा लोकसंख्या वितरणावर प्रभाव-**

**उत्तर-** ① मैदाने, पठारी प्रदेश व पर्वतीय प्रदेश अशा प्रकारची भूरचना लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करीत असते. ② मैदानी प्रदेश पाण्याची उपलब्धता व वैविध्यपुर्ण शेती करण्यास हे प्रदेश समर्थ असतात. शेती व औदयागीकरणामुळे अशा प्रदेशात जास्त लोकसंख्या समावुन घेण्याची क्षमता असते. ③ वाहतुक मार्गांची उपलब्धता यामुळे मैदानी प्रदेशात लोकसंख्या जास्त आढळते. उदा. यांगत्से, मिसिसिपी, गंगा नदी खोऱ्यांचा प्रदेश ④ पर्वतीय प्रदेशात उंची, पतिकूल हवामान, उतार, घनदाट अरण्ये, शेती अयोग्य जमीन यामुळे जिवन जगण्यास अनेक अडचणी असतात त्यामुळे पर्वतीय भागात लोकसंख्या विरळ आढळते. उदा. रॉकी, हिमालय अँडीज पर्वतांचे प्रदेश. ⑤ काही ठिकाणी मात्र आवश्यक पाण्याची सोय, जीवन जगण्यासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध असलेल्या पर्वतीय ठिकाणी काही प्रमाणात लोकसंख्या केंद्रीत झालेली आढळते. उदा. पर्वतीय पर्यटन स्थळे काही पठारी प्रदेशात जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध असलेल्या ठिकाणी व खाणकाम व्यवसायांच्या ठिकाणी मध्यम लोकसंख्या आढळते. ⑥ पठारांवर सुपिक मृदेच्या उपलब्धत असलेल्या प्रदेशात लोकसंख्या जास्त आढळते. समुद्रकिनारी प्रदेशातही अनुकुल हवामानामुळे खंडान्तर्गत भागा पेक्षा लोकसंख्या जास्त असते

**4 जन्मदर आणि मृत्यूदरातील सहसंबंध-**


**उत्तर-** - ① एका वर्षात दरहजार लोकसंख्येमागे जन्माला येणाऱ्या जिवंत बालकांची सख्या म्हणजे जन्मदर होय. तर मूत्युदर म्हणजे दरहजार लोकसंख्येमागे मृत्यु पावणाऱ्यांची संख्या होय. ② जन्मदर व मृत्यूदर लोकसंख्या वाढीवर परिणाम करीत असतात. ③ जन्मदर व मृत्यूदर लोकसंख्येतील बदलात महत्वाची भूमीका बजावतात. यांच्यामुळे लोकसंख्येत वाढ किंवा घट होते. ④ जन्मदर व मृत्यूदर हे दोन्ही जास्त असल्यास लोकसंख्या वाढ स्थिर असते. ⑤ जन्मदर जास्त व मृत्यूदर घटता राहील्यास लोकसंख्यावाढ झपाटयाने होते. ⑥ जन्मदर कमी व मृत्यूदर कमी असल्यास लोकसंख्या वाढ अत्यल्प असते. ⑦ परंतु जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी असल्यास लोकसंखेतील वाढ मध्यम स्वरुपाची पहावयास मिळते. जर जन्मदर कमी होत राहील्यास (घटता), त्याच बरोबर मृत्यूदर कमी परंतु जन्मदर मृत्यूदरापेक्षा कमी नसल्यास लोकसंख्यादरात वाढ अत्यंत कमी प्रमाणात असते ⑧ जन्मदर खुप कमी होऊन मृत्यूदरा ऐवढा होतो तेव्हा काही देशांमध्ये लोकसख्येत घट होते तर काही ठिकाणी लोकसंख्यावाढ अत्यंत कमी असते.

**5 लोकसंख्या संक्रमण सिध्दांताचा तिसरा टप्पा-**


**उत्तर-** ① लोकसंख्या संक्रमणाच्या या टप्प्यात मृत्युदर संक्रमणाच्या दुसऱ्या टप्प्या पेक्षा कमी झालेला असतो. तिसऱ्या टप्पयात जन्मदर सध्दा कमी होऊ लागतो, ② परंतु जन्मदर हा मृत्युदरापेक्षा जास्त असल्याने लोकसंख्या वाढीचा दर कमी असतो, परंतु लोकसंख्या वाढत असते. ③ देशाचा प्रगतीचा वेग या टप्प्यात वाढत असलयाने देशातील लोकांचे उत्पन्न वाढलेले असते ते साधारणपण उदरनिर्वाहासाठी लागणाऱ्या उत्पन्नापेक्षा अधिक असते. ④ देशातील गरिबी कमी होवुन नागरिकांचे राहणीमान या टप्प्यात उंचावलेले जाणवते. ⑤ या टप्प्यात तंत्रज्ञानाचा विस्तार आणि उपयोग वाढलेला असतो. तसेच देशातील नागरिकांची उंचावलेल्या सामाजिक व आर्थिक स्थितीमुळे व्दितीयक व ततीयक व्यवसायांचा या ठिकाणी विस्तार झालेला पहावयास मिळतो. ⑦ देशातील नागरिकांची शैक्षणिक पातळी या टप्प्यात उंचावलेली असते तर कुटुंब नियोजनाचे महत्व लोकांचा पटल्यामुळे जन्मदर कमी झालेला होवुन कुटुंबांचा आकार कमी झालेला आढळतो. ⑧ जे विकसनशील देश विकसित टप्प्याकडे जात आहेत असे देश प्रामुख्याने याटप्पयात येतात **उदा. चीन**

**प्रश्न 6 वा) आकृत्या काढून योग्य ठिकाणी भागांना नावे दया.**

**खंडनिहाय जागतिक लोकसंख्या वितरणाची टक्केवारी दर्शविणारा विभाजीत वर्तुळ-**




**2 लोकसंख्या संक्रमण सिध्दांत-**



**प्रश्न 7 सविस्तर उत्तरे लिहा.**

**1) चौथ्या व पाचव्या टप्प्यातील देशांच्या समस्या कोणत्या असू शकतील?**

उत्तर- ① **पौढ लोकांचे जास्त प्रमाण-** या टप्प्यात जन्मदर व मृत्युदर दोन्ही कमी असल्याने लोकसंख्या कमी असली तरी नागरिकांचे आयुर्मान दीर्घ असते त्यामुळे प्रौढ लोकांचे प्रमाण या टप्प्यात जास्त असते. युरोप खंडातील अनेक देशात प्रौए लोकांचे प्रमाण 66% आहे. तर 65 पेक्षा जास्त वयाच्या लोकांचे प्रमाण 20% आहे.

② **बालकांचे कमी प्रमाण-** जन्मदर कमी झाल्याने जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी असते.

③ **नैसर्गिक लोकसंख्या वाढ थांबणे-** या टप्पयातील काही देशात अनेक ठिकाणी जन्मदर मृत्यूदरापेक्षा कमी झाल्याने नंतर लोकसंख्या नैसर्गिक लोकसंख्या वाढ थांबलेली आहे. 1990 नंतर युरोपातील अनेक देशात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा स्थितीत देशातील वृध्दांचे प्रमाण वाढते.

④ **शिक्षण क्षेत्रावरील परीणाम-** जन्मदर कमी झाल्याने काही भागात बालवाडया, शिशुविहार बंद होत आहेत तर मागणीत कायमची घट झाल्याने महाविदयाये व विदयापीठेही आपले काही भाग/कोर्स कमी करीत आहेत.

④ **श्रमशक्तींचा मर्यादीत वापर-** या टप्प्यात शिक्षणांचा दर्जा सुधारलेल्या असल्याने युवकांचे दिर्घकाळ शिक्षण घेण्यात वेळ जास्त गेल्याने देशाच्या श्रमपुरवठयात युवक उशिरा भाग घेतात, त्यामुळे देशाच्या औदयोगिक व आर्थिक क्षेत्राला आवश्यक श्रमपुरवठा मंद गतिने होतो

⑤ **अवलबिंत्वाचे प्रमाण जास्त -** साधारण पणे वृध्द हे दुसऱ्यांवर अवलंबुन असतात वृध्दांचे प्रमाण जास्त असल्याने अशा देशांत दुसऱ्यांवर अवलंबुन असणाऱ्या नांगरिकांचे प्रमाण जास्त असते.

⑥ **ग्रामीण भागात समस्या प्रमाण जास्त-** शहरीभागात महाविदयालये, विदयापिठे, दवाखाने, बँका आणि करमणूक केंद्रे इ. सुविधांमुळे ग्रामीण युवक शहरी भागात स्थलांतरीत होतो त्यातुन ग्रामीण रहिवासात वृध्दांचे जास्त प्रमाण वाढते. ग्रामीण शेती, इतर उदयोगावर त्याचा परीणाम होवून ग्रामीण भागात अनेक समस्याना तोंड दयावे लागते.

⑦ **शहरी भागातील समस्या-** शहरी भागांचा औदयोगिकरण व इतर घटकांमुळे चांगला विकास झाला असल्याने विकासाबरोबर प्रदृषण, वाहतूक कोंडी, अतिक्रमण, मानसिक ताणतणाव, सामाजिक व पर्यावरणीय समस्यांना या देशातील नागरिकांना तोंड दयावे लागते.

⑧ **युवकांचे प्रमाण कमी-** जन्मदर कमी असल्याने बालकांचे प्रमाण कमी असतेच नैसर्गिकरित्या युवकांचे प्रमाण कमीच असते त्यामुळे उत्पादीत घटक हा कमी असतो. युरोपातील अनेक देशांचा जन्मदर 0.5% पेक्षा कमी आहे. त्या तुलनेत जागतिक दर 1.4% आहे.

# प्रकरण – 2 लोकसंख्या भूगोल भाग- 2

**प्रश्न 1 अ) साखळी पुर्ण् करा.**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1 विस्तारणारा वय मनोरा | 1 जन्म - मृत्यू दर कमी | 1 वैद्यकीय खर्च जास्त |
| 2 संकोचनारा वय मनोरा | 2 मानवी भांडवल | 2 अनिच्छा |
| 3 स्थिरावलेला वय मनोरा | 3 वृद्ध लोकांची संख्या कमी | 3 लोकसंख्येचा लाभांश |
| 4 कार्यशील लोकसंख्येचे जास्त प्रमाण | 4 उदरनिर्वाहाचा प्रश्न | 4 विकसित देश |
| 5 दुष्काळामुळे स्थलांतर | 5 वृद्ध लोकांची संख्या जास्त | 5 आर्थिक दृष्ट्या विकसित |

**उत्तर-**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1 विस्तारणारा वय मनोरा | 3 वृद्ध लोकांची संख्या कमी | 5 आर्थिक दृष्ट्या विकसित |
| 2 संकोचनारा वय मनोरा | 5 वृद्ध लोकांची संख्या जास्त | 1 वैदयकीय खर्च जास्त |
| 3 स्थिरावलेला वय मनोरा | 1 जन्म- मृत्यू दर कमी | 4 विकसित देश |
| 4 कार्यशील लोकसंख्येचे जास्त प्रमाण | 2 मानवी भांडवल | 3 लोकसंख्येचा लाभांश |
| 5 दुष्काळामुळे स्थलांतर | 4 उदरनिर्वाहाचा प्रश्न | 2 अनिच्छा |

**प्रश्न 1 ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुर्ण करा.**

*** लिंग गुणोत्तर सर्वात कमी असलेला देश**

अ) लाटविया  ब) संयुक्त अरब अमिरात

क) रशिया  ड) इस्टोनिया

**संयुक्त अरब अमिराती देशाचे लिंग गुणोत्तर सर्वात कमी आहे**

*** यापैकी कोणत्या मनोऱ्यात वृद्धांची संख्या जास्त असते**

अ) विस्तारणारा मनोरा  ब) संकोचणारा मनोरा

क) स्थिरावलेला मनोरा  ड) यापैकी एकही नाही

**संकोचनाऱ्या मनात वृद्धांची संख्या जास्त असते**

*** साक्षरतेचे प्रमाण कमी असलेला प्रदेश**

अ) पूर्व व आग्नेय आशिया  ब) उत्तर अमेरिका

क) दक्षिण आशिया  ड) युरोप

| |
|---|
| **दक्षिण आशिया प्रदेशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे** |

*** लोकसंख्या वयोरचना मनोऱ्याचा तळ विस्तारत जाणारा असून शिर्षाकडे तो निमुळता होत आहे याचा अर्थ.....**

अ) जन्मदर आणि मृत्युदर हे दोन्ही अगदी कमी

ब) जन्मदर कमी तर मृत्यूदर अगदी कमी

क) जन्मदर जास्त व मृत्यूदर कमी

ड) जन्मदर व मृत्युदर दोन्ही जास्त

| |
|---|
| लोकसंख्या वयोरचना मनोऱ्याचा तळ विस्तारत जाणारा असून शिष्याकडे तो निमुळता होत जातो याचा अर्थ जन्म व मृत्यू दोन्ही दर जास्त आहेत असा होतो |

*** स्त्री व पुरुषांचे लोकसंख्येतील प्रमाण म्हणजे**

अ) लिंग-गुणोत्तर  ब) वयोरचना

क) साक्षरता  ड) व्यवसायिक संरचना

| |
|---|
| स्त्री व पुरुषांचे लोकसंख्येतील प्रमाण म्हणजे **लिंग गुणोत्तर** होय |

*** देशात ज्या व्यक्तीस लिहिता - वाचता आणि गणिती प्रक्रिया समजून करता येतात त्या व्यक्तीस काय संबोधतात**.

अ) निरक्षर  ब) साक्षर

क) तज्ज्ञ  ड) अडाणी

| |
|---|
| देशात ज्या व्यक्तीस लिहिता-वाचता आणि गणिती प्रक्रिया समजून करता येतात त्या व्यक्तीस **साक्षर** म्हणतात |

**प्रश्न 1 क ) अयोग्य घटक ओळखा**

*** लोकसंख्या मनोऱ्याचे प्रकार-**

अ) विस्तारणारा  ब) उंचावणारा

क) संकोचणारा  ड) स्थिरावलेला

**उत्तर-** ब) उंचावणारा

*** एकहजार पेक्षा जास्त लिंगरचना असणारे प्रदेश-**

अ) लाटविया          ब) संयुक्त अरब अमिराती

क) इस्टोनिया          ड) युक्रेन

**उत्तर-** ब) संयुक्त अरब अमिराती

*** जवळ 80 टक्क्यांपेक्षा कमी एकूण साक्षरता असणारे देश प्रदेश-**

अ) कॅरेबियन बेटे          ब) उत्तर अमेरिका

क) पश्चिम आशियाई देश          ड) दक्षिण अमेरिका

**उत्तर-** अ) कॅरेबियन बेटे

*** स्थलांतराची सामाजिक कारणे-**

अ) भेदभाव          ब) विवाह

क) भूकंप          ड) वैद्यकीय सुविधांचा अभाव

**उत्तर-** क) भूकंप

*** संकोचणाऱ्या मनोऱ्याचे वैशिष्ट्ये-**

अ) तरुणांची संख्या जास्त          ब) शीर्षाकडे विस्तारलेला

क) वृद्धांची संख्या जास्त          ड) जन्मदर मृत्युदर अगदी कमी

**उत्तर-** अ) तरुणांची संख्या जास्त

*** स्थलांतराचे अपकर्षण घटक-**

अ) दुष्काळ          ब) युद्ध

क) प्रदूषित पाणी          ड) शिक्षणाची संधी

**उत्तर-** ड) शिक्षणाची संधी

*** साक्षरतेचा थेट संबंध असणारे घटक -**

अ) लोकांचे राहणीमान          ब) खनिज संपत्तीचे साठे

क) स्त्रियांचा समाजातील दर्जा          ड) शैक्षणिक सुविधा

**उत्तर-** ब) खनिज संपत्तीचे साठे

* **स्थलांतराची प्राकृतिक कारणे-**

अ) ज्वालामुखी उद्रेक
ब) वादळे
क) रोजगाराचा शोध
ड) भूकंप

**उत्तर-** क) रोजगाराचा शोध

* **स्थलांतराचे आकर्षक घटक-**

अ) रोजगाराच्या संधी
ब) शिक्षणाची सोय
क) प्रदूषित हवा
ड) अल्हाददायक हवामान

**उत्तर-** क) प्रदूषित हवा

**प्रश्न 1 ड) अचूक सहसंबंध ओळखा.**

(A: विधान, R: कारण)

**1) A : लोकसंख्येच्या मनोऱ्यात रुंद तळ बालकांची संख्या अधिक असल्याचे दाखवते**

**R : लोकसंख्या मनोऱ्याचे रुंद शीर्ष वृद्धांची संख्या अधिक असल्याचे व्दयोतक आहे**

अ) केवळ A बरोबर आहे.
ब) केवळ R बरोबर आहे.
क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.
ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर- ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.**

2) **A : कार्यशील लोकसंख्येची विविध व्यवसायातील वर्गवारी म्हणजे लोकसंख्येची व्यवसायिक संरचना होय**

**R : व्यवसायिक संरचनेवरुन देशाच्या आर्थिक विकासाचा दर ठरतो**

अ) केवळ A बरोबर आहे.
ब) केवळ R बरोबर आहे.
क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.
ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर- क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.**

3) **A : लाभांश म्हणजे भागधारकांना प्राप्त झालेल्या नफ्यातील लाभ होय3**

**R : लोकसंख्या लाभांशाचे फायदे सर्वांना समान पध्दतीने आपोआप मिळतात**.

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर- ड)** अ) केवळ A बरोबर आहे.

**प्रश्न 1 ड) चुक की बरोबर ते सांगा.**

1) स्थलांतरामुळे शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

2) जगात सर्वच देशात साक्षरतेची व्याख्या सारखी आहे.

**उत्तर- हे विधान चुक आहे**

3) नागरी भागाकडे लोकसंख्येच्या स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळते

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

4) लोकसंख्येतील साक्षरता प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते

**उत्तर- हे विधान बरोबर आहे.**

**5**) संकोचणाऱ्या मनोऱ्याचा तळ विस्तारलेला असतो.

**उत्तर- हे विधान चुक आहे**

**प्रश्न 2 रा) पुढील विधानाचे भौगोलिक कारणे लिहा.**

**1) विकसित राष्ट्रांमध्ये शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या कमी आहे.**

**उत्तर-** ① प्रत्येक देशातील कार्यशील लोकसंख्या कोणत्या गटात, किती टक्के गुंतलेली आहे त्यावरून देशाच्या आर्थिक विकासाचा स्तर ठरवता येतो. या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक विकासाचा मापदंड असतो.

② विकसित राष्ट्रांमध्ये तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणावर वापर, औद्योगिक सुविधा, पायाभूत सुविधा, मोठया प्रमाणात झालेले नागरीकीकरणामुळे विविध प्रकारचे रोजगार उपलब्ध असतात.

③ विकसीत देशात तंत्रज्ञानामुळे कमी मनुष्यबळावर देखील शेती व्यवसाय चांगल्या प्रकारे होत असतो व शेती उत्पादनावर अनेक उदयोगही कार्यरत असतात.

④ तंत्रज्ञानाच्या आधारे शेतीतील मिळणारे भरपुर उत्पन्न व रोजगाराच्या इतर संधीची सहज उपलब्धता यामुळे विकसित राष्ट्रांमध्ये शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या कमी आहे.

**2) लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते.**

**उत्तर-** ① साक्षरतेचा सबंध हा देशातील लोकांचे राहणीमाण, स्त्रियांचा समाजातील दर्जा, उपलब्ध शैक्षणिक सुविधा व शासनाचे धोरणावर अवलंबुन असतो.

② साक्षरतेमुळे लोकांची बौध्दीक, व्यवसायीक क्षमता वाढण्यास मदत होत असते. साक्षरतेचे प्रमाण जेवढे जास्त तेवढे देशात विविध व्यवसायाचे व रोजगारांचे प्रमाण जास्त असते.

③ देशात जेवढे व्यवसाय, रोजगार जास्त त्याप्रमाणात देशाचा आर्थिक विकास होत असतो.

④ आर्थिक विकासामुळे व शिक्षणामुळे लोकांचे राहणीमान उंचावते, पायाभुत सोयीसुविधा वाढतात व स्त्रियांचा समाजातील दर्जा देखील वाढत असतो, म्हणजेच सामाजिक दुष्ट्रया देखिल देशाचा विकास होत असतो. ⑤ साक्षरतेच्या वाढत्या प्रमाणामुळे त्या देशाचा आर्थिक व सामाजिक विकास होत असतो म्हणुन साक्षरता देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते

**3) जेव्हा कार्यशील लोकसंख्येत वाढ होते तेव्हा लोकसंख्या लाभांशातही वाढ होते.**

**उत्तर-** ① एखादया देशाच्या वयोरचनेत होणाऱ्या बदलामुळे त्याच्या अर्थव्यवस्थेत झालेली वाढ म्हणजे लोकसंख्या लाभांश होय.

② देशातील 15 ते 59 वयोगटातील लोकसंख्येला त्या देशाचा कार्यशिल लोकसंख्येचा गट मानला जातो.

③ देशाची कार्यशील लोकसंख्या वाढल्याने अतिरीक्त मुनष्यबळ देशाच्या आर्थिक क्षेत्रात सर्वत्र हातभार लावत असते त्यामुळे देशाचा आर्थिक विकासाचा दर वाढतो.

④ त्यातुनच देशाचे दरडोई उत्पन्न वाढत असते.

⑤ याचा परिणाम विकासाचे लाभ देशातील लोकांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे मिळतात. उदा. लोकांचे उत्पन्न वाढते, राहणीमान सुधारते, वाहतुक, शिक्षण, आरोग्य सुविधा, निवृत्ती वेतन, संशोधन क्षेत्रांत वाढ होते. सामाजिक धोरणाची अंमलबजावणी करता येते.

⑥ म्हणजेच कार्यशील लोकसंख्येमुळे वाढलेला आर्थिक फायदा लाभांशाच्या (सर्व प्रकारच्या सेवा) रुपाने सर्वांनाच होत असतो म्हणजे लाभांश वाढत असतो.

**प्रश्न 3 रा फरक स्पष्ट करा.**

**1) विस्तारणारा मनोरा आणि संकोचणारा मनोरा**

| विस्तारणारा मनोरा | संकोचणारा मनोरा |
|---|---|
| 1)विस्तारणाऱ्या मनोऱ्याचा तळ विस्तारत जाणारा असतो तर शीर्षाकडे तो निमुळता होत जातो. | 1)संकोचणाऱ्या मनोऱ्याचा तळ संकुचित असतो, तर शीर्षाकडे ते विस्तारलेला असतो. |
| 2) या मनोऱ्यानुसार वाढत्या वयोगटानुसार मृत्युदरही वाढतो असा अर्थ होतो. | 2) या मनोऱ्यानुसार वृध्दांची संख्या जास्त तर तरुणांची संख्या कमी आहे असा अर्थ होतो. |
| 3) हा मनोरा जन्मदर व मृत्युदर जास्त आहे सांगतो. | 3) हा मनोरा जन्मदर व मृत्युदर अगदी कमी दर्शवतो |
| 4) या मनोऱ्यानुसार 0 ते 15 वयोगटातील बालकांचे प्रमाण जास्त व वध्दांचे प्रमाण कमी आहे दर्शवीतो | 4) या मनोऱ्यानुसार बालकांचे प्रमाण कमी व वृध्दांचे प्रमाण जास्त आहे असे समजते. |

**2) अल्पकालीन स्थलांतर आणि दिर्घ कालीन स्थलांतर**

| अल्पकालीन स्थलांतर | दिर्घकालीन स्थलांतर |
|---|---|
| 1) अल्पकालीन स्थलांतर हे ठराविक कालावधीसाठी किंवा हंगामी स्वरुपाचे असते. उदा. | 1) दीर्घकालीन स्थलांतरात लोक आपले राहते ठिकाण दीर्घकाळासाठी किंवा कायमस्वरुपी सोडून जातात |
| 2) हे स्थलांतर गुराखी चाऱ्याच्या शोधात ऋतूनुसार करतांना आढळते. | 2) हे स्थलांतर उच्च शिक्षित तरुण चांगल्या नोकरीच्या शोधात बाहेरच्या देशात करतांना आढळते. |
| 3) या प्रकारचे स्थलांतर कमी अंतराचे व कमी कालावधीसाठी असते | 3) या प्रकारचे स्थलांतर जास्त अंतराचे असु शकते व जास्त कालावधी साठी देखिल असते. |
| 4) हे स्थलांतर ग्रामिण ते ग्रामिण, ग्रामिण ते शहरी, एका शहरी ते शहरी, शहरी ते ग्रामिण असे असते. | 4) या स्थलांतरात लोक एका देशातुन दुसऱ्या देशातही जातात. |

**प्रश्न 4 अ) दिलेल्याजगाच्या नकाशात खालील घटक योग्य चिन्ह व खुणांच्या सहाय्याने दर्शवा.**


1) भारतातील लिंगगुणोत्तर अधिक असणारे राज्य – केरळ
2) पुरुषांचे प्रमाण अधिक असणारे महाराष्ट्रातील प्रमुख शहर-मुंबई
3) ग्रेट ब्रिटन
4) साक्षरता अधिक असणारा मध्य आशियातील प्रदेश
5) आफ्रिकेतील साक्षरता कमी असणारा प्रदेश
6) ब्राझील
7) जर्मनी
8) सर्वात कमी लिंग गुणोत्तराचा देश- संयुक्त अरब अमिरात




| | चिन्ह | विवरण |
|---|---|---|
| 1 | | भारतातील लिंगगुणोत्तर अधिक असणारे राज्य –केरळ |
| 2 | | पुरुषांचे प्रमाण अधिक असणारे महाराष्ट्रातील प्रमुख शहर–मुंबई |
| 3 | | ग्रेट ब्रिटन |
| 4 | | साक्षरता अधिक असणारा मध्य आशियातील प्रदेश |
| 5 | | आफ्रिकेतील साक्षरता कमी असणारा प्रदेश |
| 6 | | ब्राझील |
| 7 | | जर्मनी |
| 8 | | सर्वात कमी लिंग गुणोत्तराचा देश– संयुक्त अरब अमिरात |

**प्रश्न 4 ब )दिलेल्या आलेख / आकृत्यांचे निरीक्षण करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**1)**



लोकसंख्या मनोऱ्याचे तीन प्रमुख प्रकार

**1) कोणता मनोरा वैद्यकीय खर्च जास्त असणाऱ्या देशांचे प्रतिनिधित्व करतो**

**उत्तर-** ‘आ’ मनोरा वैद्यकीय खर्च जास्त असणाऱ्या देशांचे प्रतिनिधित्व करतो

**2) कोणत्या मनोऱ्यात कार्यशील लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळते**

**उत्तर-** ‘इ’ मनोऱ्यात कार्यशील लोकसंख्येचे प्रमाण जास्त आढळते

**3) कोणता मनोरा वृद्धांचा देश असल्याचे दर्शवितो**

**उत्तर-** ‘आ’ मनोरा वृद्धांचा देश असल्याचे दर्शवतो

**4) ‘अ’ मनोऱ्याचा तळ रुंद असल्याचे कारण कोणते**


**उत्तर-** या ठिकाणी जन्मदर जास्त असल्याने बालकांचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्याच बरोबर येथे वाढत्या वयाबरोबर मृत्यूदरही वाढलेला असल्याने या मनोऱ्याचा तळ रुंद आहे

**5) ‘इ’ मनोरा स्तंभासारखा उभा का दिसतो**

**उत्तर-** या ठिकाणी जन्मदरात आणि मृत्युदरात स्थिरता आलेली असल्याने, दोघांमधील फरक नगण्य आहे आणि वयोगटातील प्रत्येक गटाची लोकसंख्येची टक्केवारी जवळजवळ समान आहे म्हणून हा मनोरा संभा सारखा उभा दिसतो.

--------------------------------

**2)**




**1) कोणत्या प्रदेशाचा साक्षरता दर सर्वात जास्त आहे**

**उत्तर-** मध्य आशिया, युरोप, उत्तर अमेरिका व पूर्व आणि आग्नेय आशिया या प्रदेशात साक्षरतेचा दर सर्वात जास्त आहे

**2) कोणत्या प्रदेशाचा साक्षरता दर सर्वात कमी आहे**

**उत्तर-** उत्तर आफ्रिका, पश्चिम आशिया, दक्षिण आशिया आणि सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकी देश या प्रदेशांमध्ये साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी आहे

**3) स्त्री साक्षरतेचे प्रमाण कोणत्या प्रदेशात पुरुषांपेक्षा जास्त आहे**

**उत्तर-** स्त्री साक्षरतेचे प्रमाण मध्य आशिया, युरोप व उत्तर अमेरिका या ठिकाणी जास्त आहे

**4) आलेखा बाबतचे तुमचे निष्कर्ष लिहा**

**उत्तर-** I) जगात साक्षरतेचे प्रमाण असमान आहे, साक्षरता जास्त असलेले प्रदेश विकसीत व विकसनशिल आढळतात, साक्षरता कमी असलेले देश सामाजिक दृष्टया मागासलेले आहेत, स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण जास्त असलेले युरोप व उत्तर अमेरीका हे प्रदेश विकसीत आढळतात.


**प्रश्न 5) टीपा लिहा.**

**1) लोकसंख्येची ग्रामीण - शहरी रचना :**

लोकसंख्येच्या वास्तव्याच्या ठिकाधावरून ग्रामीण व शहरी असे दोन वर्ग केले जातात. या दोन्ही ठिकाणी राहणीमान व्यवसाय सामाजिक रचना हे वेगवेगळे दिसून येतात. शहरी व ग्रामीण भागात लोकसंख्येचे वय व्यावसायिक संरचना लिंग गुणोत्त्र लोकसंख्येची घनता आणि विकासाचा स्त्र यामध्ये आपनास तफावत दिसून येते.ग्रामीण व नागरी भागाचे मापदंड वेगवेगळया देशात वेगवेगळे असतात.

सर्वसाधारण स्वरूपात पाहिल्यास जेथे प्राथमिक व्यवसाय चालतात तो भाग ग्रामीण भाग म्हणून ओळखला जातो. तर जेथे प्राथमिक व्यवसायाशिवाय इतर (दवितीयक,तृतीयक) व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण जास्त् असते अशा भाग शहरी म्हणून मानला जातो.

**2) लोकसंख्या मनोरा व लिंग गुणोत्तर-**




लोकसंख्या अभ्यासक अभ्यासक लोकसंख्येचे वय व लिंगानुसार वितरण दाखविण्यसाठी लोकसंख्या मनो-याचा वापर करतात. लोकसंख्येचा वयोगट दर्शविण्यासाठी अर्भक, बालक, कुमार, युवक, प्रौठ, वृदध् असे गट केले जातात. लोकसंख्या मनाऱ्याच्या आलेखात मध्यभागी 'य' अक्ष हा वयोगट दाखवितो व स्तंभाची लांबी ही त्या त्या वयोगटातील लोकसंख्येची टक्केवारी दाखवतो. आलेखाचा डाव्या बाजूस पुरूषांची संख्या तर उजव्या बाजूस स्त्रियांची संख्या

वयोगटानुसार दाखतात. आलेखाचा तळाकडे बाल वयोगटाला सुरवात करून शीर्षकडे वृदधांचे वयोगटाचे क्रमवार वितरण दाखवतात. लोकसंख्या मनोऱ्यात वयोगटानुसार खालील गोष्टींचा विचार केलेला असतो

| गट | वयोगट | निदर्शक | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| बाल वयोगट | 0 ते 15 | अवलंबित्व गट | या गटातील लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास ती लोकसंख्या दुसऱ्यांवर अवलंबून असते. |
| प्रौढ वयोगट | 15 ते 59 | कार्यशील गट | या वयोगटातील लोकसंख्या उत्पादक व गतिशील असते, हा वयोगट कार्यशील लोकसंख्या जास्त असण्याचे निदर्शक असते. |
| वृध्द वयोगट | 60 पेक्षा जास्त | अवलंबित्व गट | या वयाचे प्रमाण जास्त असलेल्या देशात अवलंबित्वाचे प्रमाण वाढतेच, परंतु वैदयकीय, आरोग्य सुविधेवर खर्च वाढणारा असतो. |

**लिंग-गुणोत्तर-** स्त्री व पुरुषांच्या लोकसंख्येतील प्रमाणाला लिंग गुणोत्तर म्हणतात. ते दर हजार पुरूषांमागे स्त्रियांचे असलेले प्रमाण या वरुन ठरवीले जाते भारतात लिंगगुणोत्तर खालील सूत्राच्या सहारूय्याने काढले जाते.

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{स्त्रियांची एकुण संख्या}}{\text{पुरुषांची एकुण संख्या!}} X\,1000$$

लिंग गुणोत्तराच्या आधारे देशातील किंवा प्रदेशातील स्त्रियांचे पुरुषांच्या तुलनेतील प्रमाण काढता येते. जगाचे सर्वसाधारण लिंग गुणोत्तराचे प्रमाण दरहजारी 990 स्त्रिया आहे. म्हणजेच जागतिक स्तरावर 1000 पुरुषांमागे 990 स्त्रिया आहेत.

* **जास्त लिंग गुणोत्तर असलेले देश-** लाटविया, इस्टोनिया, रशिया व युक्रेन या देशांचे लिंग गुणोत्तर 1162 आहे.
* **कमी लिंग गुणोत्तर असलेले देश-** संयुक्त अरब अमिरात **(667)**, चीन, भारत, भूतान, पाकिस्तान, अफगणिस्तान. थोडक्यात आशिया खंडाचे लिंग गुणोत्तर प्रमाण कमी आहे.

**3) लोकसंख्येची व्यावसायिक संरचना-**

व्यवसायिक संरचनेत प्राथमिक, व्दितीयक, तृतीयक व चतुर्थक अशा प्रकारची व्यवसायांची रचना आहे. त्यात देशातील कार्यशील लोकसंख्या कोणत्या प्रकारच्या व्यवसायात गुतंलली आहे. त्यावरुन देशाचा

आर्थिक स्तर ठरतो. विकसीत राष्ट्रांमध्ये औदयोगिक आणि पायाभूत सुविधा प्रामुख्याने उपलब्ध असल्याने तेथील लोकसंख्या व्दितीयक, तृतीयक, व चतुर्थक व्यवसायात मोठया प्रमाणात गुंतलेली असते. त्यामुळे शेती या प्राथमिक व्यवसायामध्ये या देशातील लोक कमी प्रमाणात आढळतात.

ज्या देशात प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकांचे प्रमाण जास्त असे देश कृषी प्रधान असतात. तेथील विकास कमी प्रमाणात असल्याने ते अविकसीत किंवा विकसनशील म्हणून ओळखले जातात.

**4) साक्षरतेचे प्रमाण-**

लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे दयोतक असते. भारतात ज्या व्यक्तीस लिहिता, वाचता आणि गणिती क्रिया समजून करता येतात ती व्य्क्ती साक्षर मानली जाते. भारतात सात वर्षावरील व्यक्तीस साक्षरतेच्या गणनेसाठी विचारात घेतले जाते. देशांनुसार साक्षरतेची व्याख्या बदलते.

साक्षरतेमुळे समाजातील विविध घटकांची विचार प्रक्रिया व वैज्ञानिक दृष्ट्रीकोन यात सकारात्मक बदल होतात. त्यामुळे व्दितीय, तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या व्यवसायांना चालना मिळते. साक्षरतेमुळे अनेक आर्थिक व सामाजिक सुधारणा घडून येतात.

जगाच्या सरासरीच्या तुलनेत युरोप, उत्तर अमेरिका आणि पूर्व व आग्नेय आशियातील साक्षरता प्रमाण अधिक आहे. उत्तर आफ्रिका व पश्चिम आशिया, दक्षिण आशिया, सहाराच्या दक्षिणेकडील देश येथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. मध्य आशिया, युरोप आणि उत्तर अमेरिका येथे 100% साक्षरता आहे. जगात कोणत्याही खंडात किंवा उपखंडात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त नाही. जगात सर्वांत कमी साक्षरता दर सहाराच्या दक्षिणेकडील देशांमध्ये आहे.

**प्रश्न 6 अ) खाली दिलेल्या नकाशाचे वाचन करुन त्यावर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाला अपरिचित प्रदेशात स्थलांतर करणे भाग पडले व त्याची विविध प्रदेशातील भटकंती वाढली. या काळात मानव नद्यांच्या खोऱ्यातील सखल भागाकडे आकृष्ट झाला. हा प्रदेश सुलभतेने पादाक्रांत करण्याजोगा, पोषक वातावरणाचा व भरपूर पाणीपुरवठा करणारा असल्याने मानव येथे जास्त कालावधीसाठी राहू लागला. स्त्रिया व लहान मुले एकाच ठिकाणी राहात असत व पुरूष अन्न गोळा करणे, शिकार व मासेमारी इ. साठी बाहेर जात असे. यामुळे या प्रदेशात स्थायी वसाहती निर्माण होण्यास वाव मिळाला. याच काळात निसर्गाच्या निरीक्षणातून मानवाने बी पेरण्यास सुरुवात केली. व यातूनच शेतीचा उदय झाला.

यासमयी वसाहतींमधूनच नागरी संस्कृतींचा विकास झाला व भटक्या जमाती हळूहळू स्थायी वसाहतीत राहू लागल्या. अशा वसाहतींसाठी कायम निवाऱ्याची गरज भासू लागली व त्यातून माणसाने उपलब्ध सामग्रीतून घरे बांधण्याची कला विकसित केली. अशा या स्थायी वसाहतींमधून समाज व्यवस्थेची निर्मिती झाली व समाजाचा सामाजिक व सांस्कृतिक विकास झाला.

**1) मानवाने अपरिचित प्रदेशात स्थलांतर का केले असावे?**

**उत्तर-** वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाने अपरिचित प्रदेशात स्थलांतर केले असावे.

**2) प्राचिन काळातील मानव नदयांच्या खोऱ्यांकडे कशामुळे आकर्षीक झाला?**

**उत्तर-** नदयांच्या खोऱ्यांचा प्रदेश सुलभतेने पादाक्रांत करण्याजोगा, पोषक वातावरणाचा व भरपूर पाणीपुरवठा करणारा असल्याने मानव तेथे आकर्षीत झाला.

**3) प्राचिन मानवाची स्त्रि व पुरूषांची कामकाज पध्दत कशी होती?**


**उत्तर-** प्राचिन मानवाची स्त्रिया व लहान मुले एकाच ठिकाणी राहात असत व पुरूष अन्न गोळा करणे, शिकार व मासेमारी इ. साठी बाहेर जाणे अशी कामकाज पध्दत होती.

**4) समाज व्यवस्थेची निर्मीती कशी झाली ?**

**उत्तर-** मानवास वसाहतींसाठी कायम निवाऱ्याची गरज भासू लागली व त्यातून माणसाने उपलब्ध सामग्रीतून घरे बांधण्याची कला विकसित केली. अशा या स्थायी वसाहतींमधून समाज व्यवस्थेची निर्मिती झाली

**प्रश्न 6 ब) खालील आकृत्या काढा**

1) संकोचणारा मनोरा




संकोचणारा मनोरा

**प्रश्न 7) सविस्तर उत्तरे लिहा.**

**1) स्थलांतराचे वर्गीकरण करण करुन, स्थलांतराचे कारणे स्पष्ट करा.**

**उत्तर-**

**व्याख्या -** " व्यक्ती आणि व्यक्ती समूह जेव्हा एका स्थानाकडून दुस-या स्थानाकडे एका राजकीय सीमेतून दुस-या राजकीय सीमेत कमी किंवा अधीक कालावधीसाठी किंवा कायमचे जातात तेव्हा या हालचालीस स्थलांतर असे म्हणतात."

स्थ्लांतरामूळे प्रदेशात लोकसंख्या संरचनेत बदल होतो. ज्या प्रदेशात लोक स्थ्लांतर करतात त्या प्रदेशात लोकसंख्या वाढते व ज्या प्रदेशातून ते जातात तेथे लोकसंख्या कमी होते. त्यामुळे या दोन्ही प्रदेशातील लोकसंख्येचे वितरण, घनता, प्रारूप व रचना यांत बदल होतो.

स्थलांतराचे प्रदेशानुसार, कालावधीनुसार, उददिष्टानुसार, हेतूनुसार व अंतरानुसार वर्गीकरण केले जाते.

**(1) प्रदेशानुसार वर्गीकरण -** या प्रकारच्या सस्थलांतराचे दोन प्रकार करता येतील.

**अ) अंतर्गत स्थलांतर -** हे स्थलांतर देशातर्गत स्थलांतर असून ते जिल्हयांतर्गत आंतरजिल्हा व आंतरराज्य् या स्वरूपात दिसून येते. उदा. बिहार राज्यातून मुंबई येथे होणारे स्थलांतर.

**ब) बाहय स्थलांतर -** या स्थलांतरचा प्रकारात लोक आपला देश सोडून दुस-या देशात जातात. उदा. भारतातून उच्च् शिक्षणासाठी परदेशात जाणे.

**(2) कालावधीनुसार वर्गीकरण. -**

**अ) अल्पकालीन स्थलांतर -** या प्रकारचे स्थलांतर हे कमी कालावधीसाठी किंवा विशिष्ट हंगामासाठी असते. काही जमीती गुरांच्या चा-याच्या शोधात ऋतूनूसार ठिकाण बदलतात याला <u>ऋतूनुसार होणारे स्थलांतर</u> असे म्हणतात. उदा. उस तोड कामगार.


**ब) दीर्घकालीन स्थलांतर-** एका देशातून दुस-या देशात दीर्घकाळासाठी लोक शिक्षण, आकर्षक पगाराची नोकरी या साठभ् स्थलांतर करतात. हे व्यक्ती परत येईल याची खात्री नसते. उदा. भारतातुन युरोप खंडात जाणे.

एखादा व्यक्ती ब-याच कालावधीनंतर (दीर्घकालीन) तो मुळ ठिकाणी परत आला तर ते दीर्घकालीन स्थलांतर होते आणि ती व्यक्ती मुळ ठिकाणी परत आला नाही तर ते कायम स्वरूपी स्थलांतर होते.
या शिवाय स्थलांतराचे ऐच्छीक किंवा अनैच्छिक असेही वर्गीकरण होउ शकते

**स्थलांतराची कारणे-**

स्थलांतर करण्यासाठी आकर्षक व अपकर्षक घटक महत्वाची भूमीचा बजावतात.

① **प्राकृतिक कारणे.-** प्राकृतीक कारणांमध्ये  नैसर्गीक आपत्ती (पूर, दुष्काळ, भूकंप, ज्वालामुखी उद्रेक वादळे ) या कारणांमुळे स्थलांतर घडून येत असते. येथे मनुष्य इच्छेविरुध्द स्थलांतर करीत असतो. हे अपकर्षक कारण आहे. हे स्थलांतर काही काळापुरते असु शकते बऱ्याच वेळ परिस्थिती सुधारल्यावर लोक आपल्यामुळ स्थानी परत जातात.




② **आर्थिक कारणे -** मनुष्य रोजगाराच्या शोधात, राहणीमान उंचावण्यासाठी तसेच रोजगार प्राप्तीसाठी लोक स्थलांतर करतात. या प्रकारचे स्थलांतर उद्दीष्टनुसार देखिल असते विशिष्ट हेतु ठेवुन असे स्थलांतर केले जाते.  आकर्षक घटक अशा प्रकारच्या स्थलांतरास प्रेरणा देतात. या प्रकारात लोक कायमस्वरुपी देखिल स्थलांतरीत होत असतात.

④ **सामाजिक कारणे** - सामाजिक दृष्टया असुरक्षित प्रदेशात कोणीही राहणे पंसद करीत नाही.  त्यामुळे सुरक्षेच्या दुष्ट्रीने असे स्थलांतर होत असते. एखादया प्रदेशात एखादा समाज प्रबल असेल तर त्याठिकाणी इतर समाजावर अन्याय केला जाते त्यामुळे लोक ती जागा सोडून दुसरीकडे स्थलांतर करतो. काहीवेळा शिक्षण आरोग्य् वैदयकिय सुविधा विवाह या कारणांसाठी देखील स्थलांतर केले जाते.

⑤ **राजकिय कारणे -** कधी कधी एखादया देशात युदध् किंवा राजकियदृष्टया समस्या निर्माण झाल्यावर तो प्रदेश लोकांना सोडावा लागतो.( इराण-सिरीया ) भारत -पाकिस्थान फाळणी. विविध देशांच्या सिमावर्ती भागात अशा प्रकारचे स्थलांतरा होतांना आढळते.

**2) लोकसंख्या वाढ व स्थलांतर यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.**

**उत्तर-** ① एखादया प्रदेशात जेव्हा मृत्युदरापेक्षा जन्मदर जास्त असतो, तेव्हा त्या प्रदेशाची लोकसंख्या वाढत असते. ② लोकसंख्या वाढीसाठी वाढलेला जन्मदर हाच एकच मुद्दा असतो असे नाही. एखादया प्रदेशाच्या लोकसंख्या वाढीत त्यात प्रदेशात स्थलांतरित होवुन आलेली लोकसंख्या हा घटकही या महत्वाचा असतो.

③ स्थलांतरास प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक व या सारखे घटक कारणीभुत असतात. स्थलांतरा आकर्षक व अपकर्षक घटक महत्वाची भूमीका बजावत असतात.

③ रोजगाराच्या संधी, उच्च् राहणीमान, चांगले हवामान, नागरी सुविधा या सारख्या आकर्षक घटकांमुळे एखादया प्रदेशाची लोकसंख्या वाढते उदा. मुबंई शहर.

④ दुष्काळ, नैसर्गीक आपत्ती, युध्दजन्य परिस्थिती, सामाजिक असुरक्षितता, राजकीय असुरक्षितता, नोकरीतील असुरक्षीतता या सारख्या अपकर्षक कारणांमुळे देखिल स्थलांतर होत असते.

⑤ शहरी भागात नोकरीच्या संधी, शिक्षण, आरोग्य सुविधा अशा आकर्षक घटकांमुळे अनेक युवक किंवा कुटुंब शहरी भागात स्थलांतरीत होत असतात त्यामुळे शहरांतील लोकसंख्या वाढत आहे.

⑥ विकसीत देशांत देखिल अशाच कारणांमुळे विकसनशील देश किंवा अप्रगत भागातील अनेक लोकांचे स्थलांतर होत असते त्यामुळे अशा देशात परकीय लोकसंख्येची वाढ होत असल्याचे लक्षात येत आहे.

⑦ स्थलांतरामुळे घेणाऱ्या प्रदेशात लोकसंख्येची वाढ होत असते तेथे पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन, निवास अशा विविध सोयी सुविधांवर ताण पडत असतो, याचा परिणाम घेणाऱ्या प्रदेशाच्या सभोवतालच्या शेतीवर होत असतो.

⑧ स्थलांतरामुळे घेणाऱ्या प्रदेशात पुरूषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा जास्त असते उदा. मुंबई चेलिंग गुणोत्तर 832 आहे. स्थलांतरामुळे वाढलेल्या लोकसंख्यामुळे प्रदेशात मोठया प्रमाणात नवनवीन कल्पनांची, विचारांची देवाणघेवाण होत असते. त्यातुन त्या प्रदेशात नवनवीन शोध, सर्जनशीलतेत वाढ, तंत्रज्ञानाचा उदय व वापर होतांना दिसतो त्यानुच मोठया प्रमाणावर या प्रदेशाचा आर्थिक विकास घडून येतो.

# 3 मानवी वस्ती व भूमी उपयोजन

**प्रश्न 1) योग्य सहसंबध लक्षात घेउन साखळी पुर्ण करा.**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1 ग्रामिण भूमीउपयोजन | 1 लोकसंख्या 5000 | 1 मुंबई |
| 2 वर्ग-III | 2 वने | 2 चराऊ जमिन |
| 3 वर्ग-VI | 3 दशलक्षी शहर | 3 वाई |
| 4 बाह्यवाढ नगर | 4 लोकसंख्या 20,000 ते 50,000 | 4 मुंबईचे उपनगर |
| 5 महानगर | 5 महानगरांचा सीमावर्ती भाग | 5 अगदी छोटे शहर |

उत्तर-

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1 ग्रामिण भूमीउपयोजन | 2 वने | 2 चराउ जमिन |
| 2 वर्ग-III | 4 लोकसंख्या 20,000 ते 50,000 | 3 वाई |
| 3 वर्ग-VI | 2 लोकसंख्या पाच हजार | 5 अगदी छोटे शहर |
| 4 बाह्यवाढ नगर | 1 महानगरांच्या सीमावर्ती भाग | 4 मुंबईचे उपनगर |
| 5 महानगर | 3 दशलक्षी शहर | 1 मुंबई |

**प्रश्न 1 ब ) अचूक घटक ओळखा विधान पुर्ण करा.**

**1)** एखाद्या कालव्याला लागुन, रस्त्यालगत किंवा रेल्वे लाईनला लागून ही वस्ती आढळते.

अ) आयताकृती वस्ती

ब) आकारहीन वस्ती

क) वर्तुळाकार वस्ती

ड) रेषीय वस्ती

**उत्तर - ड) रेषीय वस्ती**

**एखाद्या कालव्याला लागुन, रस्त्यालगत किंवा रेल्वे लाईनला लागून रेषीय वस्त्या आढळतात.**

2) दोन नद्यांच्या किंवा रस्त्यांच्या संगमावर किंवा समुद्रकाठी अशा वस्त्या आढळतात.

अ) आकारहीन वस्ती

ब) त्रिकोणी वस्ती

क) रेषीय वस्ती

ड) आयताकृती वस्ती

**उत्तर- ब) त्रिकोणी वस्ती**

**दोन नद्यांच्या किंवा रस्त्यांच्या संगमावर किंवा समुद्राकाठी त्रिकोणी वस्त्या आढळतात.**

3) अशी जमीन जेथे कोणत्या न कोणत्या वस्तू निर्मितीचे कार्य चालते, जेथे लोक स्वतःच्या उपजीविकेसाठी काम करतात.

अ) संस्थात्मक क्षेत्र

ब) निवासी क्षेत्र

**क) औद्योगिक क्षेत्र**

ड) मनोरंजना खालील क्षेत्र

**उत्तर- क) औद्योगिक क्षेत्र**

**अशी जमीन जेथे कोणत्या ना कोणत्या वस्तू निर्मितीचे कार्य चालते, जेथे लोक स्वतःच्या उपजिविकेसाठी काम करतात अशा क्षेत्रास औद्योगिक क्षेत्र म्हणतात**

**प्रश्न 1 क ) योग्य सहसंबंध ओळखा**

( A : विधान R : कारण )

1) A : वस्तीचे विविध प्रकार असतात.

R : प्राकृतिक घटकांचा वस्तीच्या वितरणावर परिणाम होतो..

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर - क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे..**

2) A : नगरे वाढतात त्याचबरोबर त्यांची कार्यही वाढतात.

R : एका नगराला केवळ एकच कार्य असते.

अ) केवळ A बरोबर आहे. ब) केवळ R बरोबर आहे.

क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

ड) A आणि R दोन्ही बरोबर आहेत आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर - अ) केवळ A बरोबर आहे..**

**प्रश्न 2) भोगोलिक कारणे लिहा.**

**1. सर्व ग्रामीण वस्तीचे रूपांतर नागरी वस्तीत होतेच असे नाही.**

**उत्तर-**

1. नागरी वस्तीच्या जवळ किंवा प्रभावक्षेत्रात असणाऱ्या ग्रामीण वस्ती चे रूपांतर काही कालावधीनंतर हे नागरी वस्तीत होते.

2. पण काही ग्रामीण वस्ती या नागरी वस्तीपासून दूर असतात नागरी वस्तीचा प्रभाव अशा ग्रामीण वस्तीवर खूपच कमी पडतो अशा वस्त्या आपले ग्रामीण स्वरूप टिकून ठेवतात.

3. तसेच नागरी वस्तीच्या जवळ असणाऱ्या काही ग्रामीण व त्यांचा वापर नागरी क्षेत्रातील लोक केवळ निवासासाठी करतात.

4. अशा ग्रामीण वस्तीवर नागरी वस्ती चे निवास सोडून इतर घटकांचा प्रभाव खूपच कमी पडत असतो अशाही काही वस्ती आपले ग्रामीण वस्ती चे स्वरूप टिकून ठेवतात यावरून असे म्हणता येते की सर्वच ग्रामीण वस्ती चे रूपांतर नागरी वस्तीत होतेच असे नाही.

**2. ग्रामीण वस्ती मध्ये भूमी उपयोजन हे शेतीशी निगडित असते.**

**उत्तर-**

1.ग्रामीण वस्ती चे नागरी वस्ती हे वर्गीकरण सर्वसाधारणपणे कोणत्या व्यवसायात अधिकांश लोक गुंतलेले आहेत यावरून केले जाते.

2. प्राथमिक व्यवसायात अधिक लोक गुंतलेले असतील तर तो ग्रामीण भाग व प्राथमिक व्यवसाय सोडून इतर व्यवसायात अधिक लोक गुंतलेले असतील तर तो शहरी भाग असतो.

3. ग्रामीण वस्ती मधील बहुतांशी लोक हे शेती या प्राथमिक व्यवसायात गुंतलेले असतात त्यामुळे ग्रामीण भागात शेतीचे प्रमाण हे इतर व्यवसाय पेक्षा अधिक असते.

4. शेती व शेतीसाठी लागणारे विविध अवजारे तयार करण्याचा व्यवसाय हे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर चालतात.

5. तसेच भूमी अभिलेख कार्यालयाने ग्रामीण भूमी उपयोजनाचे जे विविध क्षेत्रात वर्गीकरण केले आहे ते वर्गीकरण हे प्रामुख्याने शेतीत केली जाणाऱ्या पीक लागवडीचा कालावधी हंगाम दोन पिकांच्या लागवडी

दरम्यान चा ठेवलेल्या जमिनीचा कालावधी यावर आधारित आहे यावरून ग्रामीण भागात शेती संबंधित भूमी उपयोजन हे अधिक असलेले दिसून येते.

**3. झालर क्षेत्रांमध्ये ग्रामीण आणि नागरी दोन्ही वस्त्यांची वैशिष्ट्ये आढळतात**.

**उत्तर-**

1. ग्रामीण व नागरी झालर क्षेत्रांमधील भूमीला ग्रामीण नागरी झालर क्षेत्र असे म्हणतात.हे क्षेत्र ग्रामीण व नागरी संक्रमण क्षेत्र असते.

2. झालर क्षेत्राची रचना ही गुंतागुंतीची असते.ह्या झालर क्षेत्रात ग्रामीण व नागरी दोन्ही प्रकारचे भूमी उपयोजन कमी अधिक प्रमाणात दिसून येते.

3. या झालर क्षेत्रावर ग्रामीण व नागरी दोन्ही भागाचा प्रभाव असतो.या भागात दोन्ही प्रकारच्या प्रशासकीय सेवा आढळून येतात.

4. नागरी भागातील पक्के घरे तसेच ग्रामीण भागातील कच्ची घरे व दोन्ही प्रकारचे भूमी उपयोजन या भागात आढळून येतात. त्यामुळे झालर क्षेत्रांमध्ये ग्रामीण आणि नागरी दोन्ही वस्त्यांची वैशिष्ट्ये आढळतात.

**4. नगरांची वाढही भूमी उपयोजनाशी निगडीत आहे.**

**उत्तर-**

1. नागरी भागाच्या विकासाबरोबरच त्याचा विस्तारही होत असतो.

2. नगरातील भूमी ही विस्तारासाठी मर्यादित पडू लागली की नगरातील उद्योग निवासी क्षेत्र इत्यादी हे नगराच्या सभोवताली असणाऱ्या ग्रामीण भागात असतात पसरतात.

3. काही कालावधीनंतर त्या ग्रामीण भागात नागरी भूमी उपयोजनाचे प्रमाण हे ग्रामीण भूमी उपयोजन यापेक्षा अधिक वाढते व ग्रामीण भाग स्वतःची ओळख गमावून बसतो आणि तो त्या नगराचाच एक भाग बनतो.

4. अशाप्रकारे नगरांची वाढ होते म्हणून नगराची वाढही भूमी उपयोजनाशी निगडित आहे.

**प्रश्न 3. फरक स्पष्ट करा**

**1. ओसाड जमिन आणि बिगर शेती जमिन**

**उत्तर-**

| **ओसाड जमिन** | **बिगर शेती जमिन** |
|---|---|
| 1.उंच-सखल डोंगराळ भूमी, ओसाड वाळवंटी युक्त भूमी यांचा समावेश ओसाड किंवा अनुत्पादक क्षेत्रात होतो. | 1.वस्ती (ग्रामीण/नागरी), पायाभूत सुविधा (रस्ते, कालवे इ.) उद्योग, दुकाने इत्यादींचा समावेश हा बिगर शेती क्षेत्रात होतो. |
| 2.जी भूमी कृषी व्यवसाय खाली कोणत्याही प्रकारचे तंत्र वापरून आणता येत नाही अशी भूमी या प्रकारात येते. | 2.द्वितीय व तृतीय व्यवसायात होणाऱ्या वृद्धिनुसार या क्षेत्रातील उपयोजनात वाढ होते. |
| 3.अनियोजित शेती तंत्राचा वापर, रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे शेतीयोग्य जमीन अनुत्पादक होऊन ओसाड बनत आहे. | 3.नगरांचा वाढणारा विस्तार यामुळे निवास व उद्योगधंद्यासाठी शेतीयोग्य जमीन बिगरशेती जमिनीत रुपांतर होत आहे. यामुळे याचे प्रमाण वाढत आहे. |

**2. केंद्रोत्सारी वस्ती आणि वर्तुळाकार वस्ती**

**उत्तर-**

| **केंद्रोत्सारी वस्ती** | **वर्तुळाकार वस्ती** |
|---|---|
| 1.एका केंद्राच्या भोवती या  वस्त्यांचा विकास होतो. | 1.एखाद्या सरोवराच्या किंवा तळ्याच्या आजूबाजूला या वस्त्या आकार घेतात |
| 2.केंद्रापासून बाहेरील बाजूस वस्तीची निर्मिती होते | 2.केंद्राच्या आसपास गोलाकार स्वरूपात वस्तीची निर्मिती होते |
| 3.केंद्रबिंदू वस्तीच्या विकासातील महत्त्वपूर्ण भाग असतो | 3.या प्रकारात पाण्याच्या उपलब्धतेमुळे घरे जवळजवळ असतात. |
| 4. हे केंद्र एखाद्या धार्मिक ठिकाण किंवा ऐतिहासिक वास्तू ,जुना राजवाडा असू शकतो. त्याभोवती वस्तीची निर्मिती होते | 4.या प्रकारची वस्ती संरक्षणासाठी किंवा अन्य सोयीसाठी उपयोगी असते. |
| 5. भारतात उत्तरेकडील मैदानी प्रदेशात या प्रकारच्या वस्ती जास्त आढळून येतात. | 5.महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर सभोवताली असलेली वस्ती तसेच आफ्रिकेतील मसाई जमातीची वसाहत क्रोल ही अशा प्रकारची वस्ती आढळते. |

**3. केंद्रित आणि विखुरलेली वस्ती**

| **केंद्रित वस्ती** | **विखुरलेली वस्ती** |
|---|---|
| 1.केंद्रित वस्ती मध्ये घरे परस्परांच्या जवळजवळ अंतरावर असतात. घरे दाटीवाटीने अधिक संख्येने असतात. | 1.या वस्तीमधील घरे हे परस्परांपासून दूर दूर अंतरावर असतात |
| 2.यामध्ये काही ठिकाणी थोडी जागा शिल्लक असते व त्या ठिकाणी वस्ती होऊन वस्तीचे क्षेत्र वाढत जाते व त्या जाळ्याच्या आकारासारखा दिसतात. | 2.विखुरलेल्या वस्तीमध्ये कालांतराने घरांची संख्या वाढत जाऊन त्या अर्धकेंद्रित स्वरूपात रूपांतरित होतात |
| 3.जेथे मैदानी प्रदेश, पाण्याची उपलब्धता, योग्य हवामान, मानवी वस्तीसाठी पोषक घटक अधिक उपलब्ध असतात. त्या प्रदेशात केंद्रित वस्ती निर्माण होते. | 3.विषम हवामान, डोंगराळ प्रदेश, दाट जंगले, वाळवंटी प्रदेश अशा प्रदेशात विखुरलेल्या वस्ती आढळतात. |
| 4.संरक्षणाच्या दृष्टीने ही वस्ती योग्य असते. संकटाच्या वेळी लोक एकमेकांना मदत करतात. उदा: भारताच्या गंगेच्या मैदानी प्रदेशात केंद्रित वस्ती आढळून येते. | 4.उदा: भारतातील वाळवंटी प्रदेशात राजस्थान मध्ये या प्रकारच्या विखुरलेल्या वस्ती आढळून येतात. |

.**प्रश्न 4 ) टीपा लिहा.**

**1) ग्रामीण व नागरी वस्त्यांमधील आंतरक्रिया**.

**उत्तर-**

ग्रामीण व नागरी वस्त्यांमध्ये अनेक आंतरक्रिया चालत असतात. ग्रामीण भागात प्राथमिक व्यवसाय अधिक चालतो, तर नागरी भागात दितियक, तृतीयक, व चतुर्थक व्यवसाय अधिक चालतो. या नागरी वस्त्यांमध्ये चालणारे अनेक उद्योग हे कच्च्या मालासाठी ग्रामीण भागातील प्राथमिक व्यवसायावर अवलंबून असतात. नागरी वस्त्यांमधील अन्नधान्याची गरज ही ग्रामीण वस्त्यांमधून भागवली जाते. तर नागरी भागातून पक्का माल व विविध सेवा या ग्रामीण वस्त्यांना पुरवल्या जातात. ग्रामीण भागातील लोक विविध कार्यासाठी, व्यापार करण्यासाठी नागरी वस्तीवर अवलंबून असतात. अशाप्रकारे ग्रामीण व नागरी वस्त्यांमध्ये आंतरक्रिया चालतात.

**2) नागरी वस्तीच्या समस्या.**

**उत्तर-**

नागरी वस्तीच्या वाढीबरोबरच नागरी वस्तीच्या समस्या मध्ये ही दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. त्या समस्या खालील प्रमाणे आहेत.

**A) पायाभूत सोयी सुविधांची कमतरता** - वाढत्या लोकसंख्येमुळे नागरी वस्तीच्या पायाभूत सोयी-सुविधांवर ताण निर्माण होतो. नागरी वस्तीत पाणीपुरवठा वाहतूक इत्यादी पायाभूत सुविधांची कमतरता जाणवते.

**B) आर्थिक समस्या** - अधिक लोकसंख्येमुळे सर्वांनाच काम मिळते असे नाही. त्यामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण होते. त्याचा परिणाम आर्थिक समस्या वरती होतो.

**C) सामाजिक समस्या** - येणारे स्थलांतराचे लोंढे, जागेच्या वाढत्या किमती त्यामुळे झोपडपट्टीची समस्या निर्माण होते. गुन्हेगारी व इतर अवैध प्रकारच्या कार्यात वाढ होऊन सामाजिक आरोग्य धोक्यात येते.

**D) सांस्कृतिक समस्या** - नागरी वस्त्यांमध्ये वेगवेगळ्या प्रदेशातून येणाऱ्या लोकांमुळे संस्कृतीक भिन्नता, भाषावाद, प्रांतवाद व धार्मिक वाद निर्माण होतो.

**E) पर्यावरणीय समस्या वाढते** - नागरीकरण यामुळे नागरी वस्त्यांमध्ये जल, वायू  व ध्वनी इत्यादी प्रकारचे प्रदूषण वाढत आहे.

**F) प्रशासकीय समस्या** - नागरी भागातील वाढत्या लोकसंख्येला प्रशासकीय सेवा सुविधा पुरविण्यात अडचणी येतात भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढते.

**3) उपनगरे-**

**उत्तर-**

महानगरांच्या सीमा वर लहान आकाराची नगरे, लहान शहरे किंवा मोठी नगरे असतात. अशा नागरी क्षेत्रात उपनगरे म्हणतात. उदाहरणार्थ भांडूप, कल्याण, विरार इ. मुंबई महानगराची उपनगरे मानले जातात. ही सर्व लहान मोठी नगरे मुंबई शहराच्या विकासाच्या परिणामाने वाढलेले आहेत. ही उपनगरे आर्थिक व इतर कार्यासाठी या मुख्य महानगर यावरच अवलंबून असतात. याच प्रमाणे वाकड, हिंजवाडी ही पुण्याची उपनगरे आहेत..

**4) संमिश्र भूमी उपयोजन क्षेत्र**.

**उत्तर-**

एखाद्या क्षेत्रात जेव्हा संमिश्र भूमी उपयोजन होत असते तेव्हा विभिन्न प्रकारचे भूमी उपयोजन या क्षेत्रात एकत्रित पहावयास मिळते. निवासी, व्यावसायिक, औद्योगिक या प्रकारचे भूमी उपयोजन एकाच क्षेत्रात एकत्रितपणे आढळून येते. अशा क्षेत्रांमध्ये घरे, व्यवसाय, दुकाने, शाळा, दवाखाने, मोकळ्या जागी एकाच ठिकाणी असू शकते. या भागात सर्व प्रकारचे सेवा व कार्य एकत्र आढळतात.

**प्रश्न 5 वा खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

विविध प्रकारच्या मानवी वस्ती मध्ये पाडे, खेडी, छोटी शहरे, मोठी शहरे, सर्व दूर ठिकाणे, नगरे आणि नगरांचे समूह समाविष्ट आहेत. काही प्रणाली मध्ये मानवी वस्तीचे शहरी, उपनगरे आणि ग्रामीण असे प्रकार केले जातात. उदाहरणार्थ अमेरिकेतील संयुक्त संस्थानाचा जनगणना विभाग वस्तीचे वर्गीकरण निर्धारित व्याख्याच्या आधारे शहरी किंवा ग्रामीण भागांमध्ये करतो. लहान वस्त्या, जसे की पाडे आणि खेड्यांमध्ये, कमी लोकसंख्या आणि सेवांमध्ये प्रवेश मर्यादित आहे. मोठ्या प्रकारच्या वस्ती, जसे शहरे, जास्त लोकसंख्या, उच्च घनता आणि सेवांमध्ये अधिक प्रवेश आहे. उदाहरणार्थ खेड्यात फक्त एक किंवा दोन सामान्य स्टोअर असू शकतात, तर मोठ्या महानगरात अनेक विशिष्ट स्टोअर आणि स्टोअर असू शकतात. हे फरक निम्न - ऑर्डर सेवा सेटलमेंट आणि उच्च ऑर्डर सर्विस सेटलमेंट म्हणून ओळखले जातात. मानवी वस्तीची कार्यदेखील भिन्न आहेत. कारण बंदरे, बाजारपेठा आणि रिसॉर्ट म्हणून सेटलमेंट स्थापित केले जाऊ शकतात. ग्रामीण वस्तीच्या प्रकारांना शेती, मासेमारी आणि खाणकाम यांच्या निकतेसारख्या कार्याद्वारे देखील वर्गीकृत केले जाऊ शकते. एका आर्थिक क्रियाकलापावर लक्ष केंद्रित केलेल्या सेटलमेंटस एकल कार्यशील सेटलमेंट म्हणतात.

मानवी वस्ती कायम किंवा तात्पुरते असू शकते. उदाहरणार्थ निर्वासित छावणी ही तात्पुरती वस्ती असते, तर शहर कायमस्वरूपी वस्ती असते.

**1) दिलेल्या उताऱ्यात कोणकोणत्या मानवी वस्तीचा उल्लेख केलेला आहे.**

**उत्तर** - दिलेल्या उताऱ्यात पाडे, खेडी, छोटी शहरे, मोठी शहरे, सर्व दूर ठिकाणे, नगरे आणि नगरांचे समूह या विविध प्रकारच्या मानवी वस्तीचा उल्लेख केलेला आहे.

**2) शहरी आणि ग्रामीण भागांचे वर्गीकरण कशाच्या आधारे केले आहे.**

**उत्तर** - शहरी आणि ग्रामीण भागाचे वर्गीकरण अमेरिकेतील संयुक्त संस्थाने जनगणना विभागाने या वस्तीचे वर्गीकरण निर्धारित व्याख्यानाच्या आधारे शहरी किंवा ग्रामीण भागांमध्ये केलेले आहे.

**3) ग्रामीण वस्तीत कोणती कार्य केले जातात.**

**उत्तर** - ग्रामीण वस्तीत शेती, मासेमारी, खाणकाम यासारखी प्राथमिक स्वरूपाची कार्य केले जातात.


**4) निम्न क्रम सेवा आणि उच्च क्रम सेवा वस्तीतील फरक सांगा.**

**उत्तर** - निम्न क्रम सेवा आणि उच्च क्रम सेवा वस्तीतील महत्त्वाचा फरक म्हणजे खेड्यात फक्त एक किंवा दोन सामान्य स्टोअर असू शकतात तर महानगरात अनेक विशिष्ट स्टोअर आणि चेन स्टोअर असू


शकतात हे फरक निम्न ऑर्डर सेवा सेटलमेंट आणि उच्च ऑर्डर सर्विस सेटलमेंट म्हणून ओळखले जातात.

**प्रश्न 6. सुबक आकृत्या काढून नावे द्या**


1. रेषीय वस्ती




2. केंद्रोत्सारी वस्ती




3. केंद्रित वस्ती



4. विखुरलेली वस्ती




**प्रश्न 7) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा**

**1. ग्रामीण वसाहतीची वैशिष्ट्ये सांगा.**

**उत्तर** -

मानवी वस्तीचे प्रामुख्याने ग्रामीण वस्ती व नागरी वस्ती असे दोन प्रकार पाडले जातात. हे प्रकार सर्वसाधारणपणे लोकसंख्या व त्या वस्तीमध्ये चालणाऱ्या व्यवसायवर आधारित असतात. या दोन्ही वस्त्यांमध्ये बऱ्याच प्रमाणात भिन्नता आढळून येते. तसेच त्यांची वैशिष्ट्ये देखील भिन्न भिन्न असल्याचे आढळून येतात. यापैकी ग्रामीण वस्तीची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**i) वस्तीचा आकार** - ग्रामीण वस्तीचा आकार हा नागरी वस्तीच्या आकारापेक्षा लहान असतो.

**ii) घरामधील अधिक अंतर** - जागेची उपलब्धता अधिक असल्याने ग्रामीण वस्ती मध्ये दोन घरांमधील अंतर अधिक असते. यामुळे ग्रामीण वस्ती या विरळ व विखुरलेल्या स्वरूपात असल्याचे दिसून येते.

**iii) लोकसंख्येची घनता कमी** - ग्रामीण भागामध्ये लोकसंख्येचे प्रमाण हे कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे लोकसंख्येची घनता आपणास शहरी भागाच्या तुलनेत कमी आढळते.

**iv) प्राथमिक व्यवसायांचे प्रमाण अधिक** - ग्रामीण वस्तीमध्ये प्रामुख्याने शेती, खाणकाम, मासेमारी, फळे व कंदमुळे गोळा करणे या प्रकारचे प्राथमिक व्यवसाय असतात.

**v) शेतीवर आधारित अर्थव्यवस्था** - शेती व शेतीसाठी लागणारे विविध अवजारे तयार करण्याचा व्यवसाय हे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर चालतात. त्यामुळे ग्रामीण भागातील अर्थकारण हे संपूर्णपणे शेतीवर आधारित असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात उद्योगधंदे, सेवाक्षेत्र यांचा विकास खूपच कमी झालेला दिसून येतो.

**vi) पायाभूत सोयी सुविधांची कमतरता -** ग्रामीण भागामध्ये शहरी भागाच्या तुलनेत पायाभूत सोयीसुविधांची कमतरता आढळून येते. कच्चे रस्ते व इतर पायाभूत सेवा सुविधा यांचे प्रमाण खूपच कमी असल्याचे आपणास दिसून येते.

**vii) घराच्या रचनेत नियोजनाचा अभाव -** ग्रामीण वस्ती मधील घरांची रचना, त्यांचा आकार यामध्ये नियोजनाचा अभाव दिसून येतो.

**vii) स्थानिक साहित्याचा घराच्या बांधकामासाठी वापरून वापर -** ग्रामीण वस्तीतील घरांचे बांधकामासाठी स्थानिक साहित्याचा वापर केला जातो. यामध्ये माती, दगड, लाकूड, गवत इत्यादी. या साहित्याचा प्रामुख्याने ग्रामीण घराच्या बांधकामासाठी वापर केला जातो.

**viii) ग्रामीण वस्तीची निर्मितीही प्रामुख्याने शेताजवळ असते -** कारण ग्रामीण जीवनाचा आधार हा शेती आहे. शेतीवर लक्ष ठेवण्यासाठी ग्रामीण वस्ती शेताजवळ आढळून येते.

**ix) ग्रामीण वस्ती मध्ये सामाजिक व धार्मिक व्यवस्था प्रतिबिंबित होते -** ग्रामीण वस्ती मध्ये सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचा पगडा शहरी भागापेक्षा अधिक दिसून येतो.

**x) ग्रामीण वस्ती मधील स्वच्छ व प्रदूषण रहित वातावरण -** नागरी वस्तीच्या तुलनेत ग्रामीण वस्त्यांमधील वातावरणही स्वच्छ व प्रदूषणरहित असल्याचे आढळून येते.

वरील प्रमाणे ग्रामीण वस्तीची वैशिष्ट्ये आढळून येतात.

**2. वस्त्यांचा आकृतिबंध निर्माण होण्यासाठी कोणकोणते घटक कारणीभूत ठरतात ते सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर -**

मानवाने आपली निवाऱ्याची, संरक्षणाची व सामाजिक गरज भागवण्यासाठी वस्त्यांची निर्मिती केली. या वस्त्यांच्या निर्मितीमध्ये व आकृतिबंध यामध्ये विविधता आढळून येते. या आकृतिबंधावर अनेक घटकांचा परिणाम होत असतो. या घटकांच्या परिणामातून वस्त्यांचे अनेक आकृतिबंध निर्माण झालेले आहेत. ते घटक खालील प्रमाणे आहेत.

**1. भौगोलिक घटक -** जमिनीचा चढ-उतार, नद्यांचे प्रवाह, जलाशय, मृदेचे प्रकार वनस्पतीचे आच्छादन, शेतीक्षेत्राचा आकार इत्यादी भौगोलिक घटक मानवी वस्तीचे आकृतिबंध निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरतात. या भोगोलिक घटकांना अनुसरून मानवी वस्त्यांचे विविध आकृतिबंध तयार होतात. यामध्ये नदीच्या दोन्ही काठावर रेषाकृती वस्ती तयार होते.तर तलाव, विहिरी यांच्या सभोवती वर्तुळाकार व शेती क्षेत्रात आयताकृती वस्ती तयार होते.

**2. आर्थिक घटक -** शेती व्यवसाय, पशूपालन, बाजारपेठा व संकलन, मासेमारी, खाणकाम, कारखानदारी इत्यादी घटकांचा परिणाम वस्त्यांच्या आकृतिबंधावर झालेला दिसून येतो. यामध्ये खाणकाम क्षेत्रातील वर्तुळाकार वस्तीचा समावेश होतो.

**3. ऐतिहासिक घटक -** यामध्ये किल्ले, राजवाडे, छावण्या, गडी इत्यादी घटकांचा प्रभाव मानवी वस्तीच्या आकृतिबंधावर पडतो.यामध्ये मुख्य राजवाड्याभोवती केंद्रत्सारी वस्तीची निर्मिती होते.

**4. सामाजिक व सांस्कृतिक घटक -** धर्मस्थाने, सामाजिक वैशिष्ट्ये, आवडी – निवडी, परंपरा, रूढी इत्यादींचा वस्त्यांच्या आकृतिबंधावर परिणाम होत असतो. यामध्ये धार्मिक ठिकाणे निर्माण होणाऱ्या केंद्रीय वस्ती यांचा समावेश होतो.

**5. संरक्षण -** संरक्षणाच्या दृष्टीने वस्त्या उंचावर तसेच केंद्रित प्रकारचा निर्माण होताना आढळून येतात. यामध्ये पूर्वीच्या काळी शत्रूपासून संरक्षण होण्यासाठी वस्त्यांची निर्मिती किल्ल्यावर किंवा किल्ल्याच्या पायथ्याशी केंद्रीत स्वरूपात निर्माण झालेली आढळून येते.

याच प्रमाणे मानवी वस्त्यांच्या आकृतिबंधावर राजकीय परिस्थिती, प्रशासकीय व शासनाची ध्येयधोरणे, लोकसंख्याशास्त्रीय घटक या घटकांचा देखील परिणाम होताना आढळून येतो. हे घटक देखील वस्त्यांचा आकृतिबंध निर्माण होण्यासाठी कारणीभूत ठरतात.

**3 लोणार शहराच्या भूमी उपयोजन आत कालानुरूप झालेले बदल तुमच्या शब्दात मांडा.**

उत्तर- बुलढाणा जिल्ह्यातील लोणार शहराचा 2005 – 06 ते 2015 – 16 या काळातील भूमी उपयोजन नकाशा दिलेला आहे. या नकाशात लोणार सरोवराच्या आसपासचे मुख्य शहर व आजूबाजूचे क्षेत्र पहावयास मिळते. नकाशामध्ये वेगवेगळ्या रंगांनी भूमी अच्छादन व भूमी उपयोजन दाखवले आहे.

लोणार शहराच्या 2005 – 06 ते 2015 – 16 या दोन्ही नकाशाचे निरीक्षण केले असता भूमी उपयोजनात कालानुरूप झालेल्या बदल खालील प्रमाणे दिसून येतो.

1. लोणार सरोवराच्या स्वभोवतालील भागात कृषी क्षेत्राचे प्रमाण कमी होऊन वनक्षेत्राचे प्रमाण वाढले आहे. तसेच 2005 - 06 च्या तुलनेत कचरा क्षेत्राचे प्रमाण वाढलेले आढळते.
2. निवास विरळ बांधलेले क्षेत्र कमी होऊन निवास दाट बांधलेले क्षेत्र वाढलेले दिसून येते.
3. 2005 – 06 च्या तुलनेत 2015 - 16 या दहा वर्षाच्या कालावधीत शहराचा विस्तार वाढला असून विविध सार्वजनिक बांधलेले क्षेत्राचा विकास झाला आहे. यामध्ये केंद्रीय पब्लिक स्कूल, न्यायालय, तहसील कार्यालय, वस्तीग्रह, ग्रामीण रुग्णालय इत्यादींची निर्मिती झाली आहे.

4. काळानुरूप शहरातील मोकळ्या जागा कमी झाले असून तेथे निवासी दाट बांधलेल्या क्षेत्रांची उभारणी झाले आहे.

5. या नकाशात गडत निळ्या रंगाने लोणार सरोवर तर काळ्या रंगाने मुख्य रस्ते दिसून येतात. या शहराचा विस्तार 2005 – 06 ते 2015 – 16 या दहा वर्षाच्या कालावधीत वाढला असून शहराच्या नागरीकरणाबरोबरच शहराचा विस्तार हा लोणार सरोवर व रस्त्याच्या बाजूने होताना दिसत आहे.

# 4. प्राथमिक आर्थिक क्रिया

**प्रश्न 1 अ) योग्य सांगड घालुन साखळी पुर्ण करा.**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1.सखोल उदरनिर्वाहक शेती | 1.डॉगर बँक | 1.शेत आकार लहान |
| 2.पंपाज गवताळ प्रदेश | 2.किनाऱ्यापासून दूर खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे उत्पादन | 2.प्रतिकूल परिस्थिती |
| 3.मत्स्यक्षेत्र | 3.तांदूळ | 3.बॉम्बे हाय |
| 4.फळे, कंदमुळे गोळा करणे | 4.घनदाट वने | 4.ईशान्य अटलांटिक महासागर |
| 5.खाणकाम | 5.व्यापारी पशुपालन | 5.दक्षिण अमेरिका |

**उत्तर-**

| **अ** | **ब** | **क** |
|---|---|---|
| 1.सखोल उदरनिर्वाहक शेती | 3. तांदूळ | 1.शेत आकार लहान |
| 2.पंपाज गवताळ प्रदेश | 5. व्यापारी पशुपालन | 5. दक्षिण अमेरिका |
| 3.मत्स्यक्षेत्र | 1. डॉगर बँक | 4. ईशान्य अटलांटिक महासागर |
| 4.फळे, कंदमुळे गोळा करणे | 4.घनदाट वने | 2. प्रतिकूल परिस्थिती |
| 5.खाणकाम | 2. किनाऱ्यापासून दूर खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचे उत्पादन | 3. बॉम्बे हाय |

**प्रश्न 1 ब). योग्य पर्याय निवडा.**

**1. उपजीविकेसाठी मुख्यतः वनातून पदार्थ गोळा करणे**

अ) समशीतोष्ण सूचिपर्णी वनी वने आ) समशीतोष्ण पानझडी वने

इ) उष्णकटिबंधीय पानझडी वने ई) विषुववृत्तीय सदाहरित वने

**उत्तर - इ) उष्णकटिबंधीय पानझडी वने**

**2. मासेमारी क्षेत्रासाठी सर्वोत्तम स्थिती**

अ) दंतुर किनारे, उथळ समुद्र,उष्ण हवामान, प्लवंकांची वाढ.

आ) उथळ समुद्र, उष्ण –थंडसागरी प्रवाहांचा संगम, प्लवंकांची वाढ,थंड हवामान

इ) भूखंड मंच, प्लवंकांची वाढ, मासेमारीचे उत्तम कौशल्य, थंड हवामान.

ई) भूखंड मंच,दंतुर किनारे,प्लवंकांची वाढ, थंड हवामान.

**उत्तर - आ) उथळ समुद्र, उष्ण – थंड सागरी प्रवाहांचा संगम, प्लवंकांची वाढ, थंड हवामान**

3. अक्षांशाशी थेट संबंध नसलेला प्राथमिक व्यवसाय

अ) लाकूडतोड आ) मासेमारी

इ) खाणकाम ई) शेती

**उत्तर - इ) खाणकाम**

4. विस्तृत व्यापारी शेतीची वैशिष्ट्ये

अ) एक पिक पद्धती, पाण्याचा वापर, उष्णकटिबंध, धान्य उत्पादन.

आ) एक पिक पद्धती, यंत्राचा वापर, उष्णकटिबंध, धान्य उत्पादन.

इ) एक पिक पद्धती, मानवी श्रमाचा वापर, विषुववृत्त थायलँड, उद्यान शेती.

ई) एक पिक पद्धती, शास्त्रीय ज्ञानाचा वापर, उपोष्ण कटिबंध, कडधान्य उत्पादन.

**उत्तर - आ) एक पिक पद्धती, यंत्राचा वापर, उष्ण कटिबंध, धान्य उत्पादन.**

**प्रश्न 2 ) भोगोलिक कारणे लिहा.**

**1) भारतात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो.**

**उत्तर-**

1 भारतामधील सर्वसाधारण 70 टक्के लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते.

2 ग्रामीण भागात शेती हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो.

3 भारतात द्वितीय, तृतीय व चतुर्थ व्यवसायाच्या प्रमाणात शेती या प्राथमिक व्यवसायाचाविकास कमी झालेला आहे.

4 देशातील बहुतांश लोक हे आपल्या उदरनिर्वाहासाठी शेतीशी संबंधित व्यवसायांमध्ये गुंतलेले आहेत. त्यामुळे भारतात शेती हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो..

**2. विस्तृत शेती हा व्यापारी शेतीचा प्रकार आहे.**

**उत्तर-**

1) विस्तृत शेती 30 अंश ते 55 अंश उत्तर व दक्षिण अक्षवृत्ताच्या दरम्यानच्या प्रदेशात केली जाते.

2) या प्रदेशात विरळ लोकसंख्या व शेतजमिनीचा आकार मोठा असल्यामुळे दरडोई शेतीचे प्रमाण अधिक आहे.

3) लोकसंख्या कमी असल्यामुळे या शेतीमध्ये शेतीची कामे यांत्रिक साधनांच्या साह्याने केली जातात.

4) या शेतीमध्ये एकाच प्रकारचे धान्य पिक उदा: गहू, मका इत्यादी व्यापारी दृष्टिकोनातून उत्पादन घेतले जाते.

5) शेतकरी हा सुशिक्षित व प्रगत असल्याने ही शेती आधुनिक पद्धत, नवनवीन संशोधन, व्यवस्थापन व नियोजन यावर आधारलेले आहे.

6) यासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा, खते, पाणीपुरवठ्याचा, साधनांचा व बियाणांचा वापर केला जातो.

7) यामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक केली जात असल्यामुळे दरडोई उत्पादन खूपच अधिक निघते हे अधिक निघालेले धान्य उत्पादन दुसऱ्या देशांना निर्यात केले जाते.

8) या शेतीतून निघणाऱ्या उत्पादनाचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चालतो.

त्यामुळे विस्तृत शेती हा व्यापारी शेतीचा एक प्रकार आहे..

**3 उष्ण कटिबंधीय प्रदेशापेक्षा समशीतोष्ण कटिबंधात लाकूडतोड व्यवसाय मोठ्या प्रमाणात का चालत असावा.**

**उत्तर-**

1. उष्णकटिबंधीय सदाहरित वनांमधील वृक्षांचे लाकूड अतिशय टणक असते.
2. येथील वने अधिक घनदाट, रोगट हवामान, हिंस्र, वन्य पशूंचे प्रमाण अधिक आहे.
3. त्यामुळे तेथे व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसाय विकसित होऊ शकला नाही.
4. परंतु समशीतोष्ण कटिबंधातील एकाच प्रकारचे वृक्ष विस्तृत प्रदेशात आढळतात.
5. हे वृक्ष उंच वाढतात तसेच यांचे लाकूड हे मऊ असल्यामुळे या लाकडाला अधिक मागणी आहे.

त्यामुळे उष्ण कटिबंधीय प्रदेशापेक्षा समशीतोष्ण कटिबंधातलाकूडतोड व्यवसाय मोठ्या प्रमाणात

**प्रश्न 3 रा फरक स्पष्ट करा.**

**1.विषुववृत्तीय वनातील लाकूडतोड व समशीतोष्ण वनातील लाकूडतोड**

| विषुववृत्तीय वनातील लाकूडतोड | समशीतोष्ण वनातील लाकूडतोड |
|---|---|
| 1. सर्वसाधारणपणे विषुववृत्ताच्या ० अंश ते 1० अंश उत्तर व दक्षिण अक्षवृत्ता दरम्यान या वनांचे प्रदेश आढळतात. | 1. समशीतोष्ण वने ही 55 अंश उत्तर ते 65 अंश उत्तर अक्षवृत्त दरम्यान आढळतात. |
| 2. ही वने घनदाट असून ती दुर्गम आहेत. विविध प्रकारच्या हिंस्र, वन्य पशु तसेच रोगट हवामान, वृक्षाखाली वाढलेल्या वेलींची जाळे, झुडपे व गवतातील असंख्य कीटकांचे वास्तव्य आहे. | 2. ही वने फारशी घनदाट नसतात. एकाच प्रकारचे विस्तृत वृक्ष आढळून येतात. |
| 3. तेथे वर्षभर जोरदार पाऊस पडतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर जमिनीची झीज होते व सर्वत्र दलदल माजते. | 3.वृक्षांची समानता वृक्षांची मुबलकता व लाकडांचा मऊपणा यामुळे या प्रदेशातील लाकूडतोड यंत्राद्वारे केली जाते. |
| 4. या वनातील लाकूड कठीण असते. त्यामुळे मागणी कमी असते. यामुळे या व्यवसायाचा विकास मर्यादित झाला आहे. | 4.या प्रदेशात लाकूडतोड हा मोसमी व्यवसाय आहे. हिवाळ्यात जमीन बर्फाच्छादित असते. त्यावेळी वृक्षतोड करून त्यांचे ओंडके जमिनीवरील बर्फावरून घसरत नद्यांच्या गोठलेल्या पात्रात सहज व सुलभतेणे आणले जातात.जेव्हा उन्हाळ्यात गोठलेल्या नद्या वितळतात. तेव्हा नद्यावर पसरलेले ओंडके प्रवाहाच्या दिशेने पुढे ढकलले जातात. |
| 5. तेथे लोक वस्ती अतिशय विरळ आहे. म्हणून विषुववृत्तीय प्रदेशात लाकूडतोड करणे कष्टाचे आणि खर्चाचे झालेले आहे. | 5.वनातील लाकूड मऊ असल्यामुळे त्यांना मागणी जास्त असते. योग्य हवामान व वाहतुकीच्या सोयीमुळे लाकूडतोड व्यवसायाचा विकास अधिक झाला आहे. |
| 6.एका छोट्या क्षेत्रात विविध प्रकारचे वृक्ष आढळून येतात.त्यामुळे या वनातील वृक्षतोड करणे फार कठीण आहे. | 6. सूचीपर्णी वृक्षांना लाकडावर प्रक्रिया करून त्यापासून कागदाचा लगदा, कागद कृत्रिम सुत, टरपेंटाईन, रंग इत्यादी पदार्थ बनवले जातात. त्यामुळे येथील लाकडाला खूप मागणी आहे. |
| 7. व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसायाचा विकास झालेला नाही. ॲमेझॉन व कांगो नदीचे खोरे | 7. या प्रदेशात लाकूडतोड व्यवसाय व्यापारी तत्वावर विकसित झालेला दिसून येतो. उत्तर अमेरिका, |

| | |
|---|---|
| व आफ्रिकेच्या पश्चिम किनारा इ. प्रदेशात विषुवृत्तीय वने आढळतात. | कॅनडा, रशिया इ. प्रदेशात हा व्यवसाय व्यापारी तत्वावर चालतो. |

**2. मळ्याची शेती आणि विस्तृत व्यापारी शेती**

| मळ्याची शेती | विस्तृत व्यापारी शेती |
|---|---|
| 1. या प्रकारची शेती उष्णकटिबंधात केली जाते. | 1.या प्रकारची शेती समशीतोष्ण कटिबंधात 30 अंश ते 55 अंश उत्तर व दक्षिण अक्षवृत्त च्या दरम्यान केले जाते. |
| 2.या प्रकारच्या शेतीत चहा, कॉफी, कोको, केळी इत्यादीचे उत्पन्न घेतले जाते. | 2.या प्रकारच्या शेतीत गहू हे प्रमुख पीक घेतले जाते. |
| 3.कुशल व अकुशल कामगारांचा मोठ्या प्रमाणात वापर करून आधुनिक तत्त्वावर पिकांचे उत्पादन घेतले जाते. | 3. याशिवाय मका, तेलबिया यांचे उत्पादन घेतले जाते. |
| 4. शेतीबरोबर कोणताही जोड व्यवसाय केला जात नाही. | 4. शेतीची सर्व कामे यंत्राद्वारे केली जातात. म्हणून या शेतीस यांत्रिक शेती असेही म्हणतात. |
| 5.या प्रकारची शेती अधिक लोकसंख्येच्या प्रदेशात केली जाते. | 5. शेतीबरोबरच पशुपालन व्यवसाय ही केला जातो. या प्रकारची शेती लोकसंख्येच्या प्रदेशात केले जाते. |
| 6. भारत, मलेशिया, श्रीलंका, इंडोनेशिया, फिलिपाइन्स, थायलंड, म्यानमार, ब्राझील इत्यादी देशात या प्रकारची शेती केली जाते. | 6. संयुक्त संस्थानातील रशियातील स्टेप अर्जेंटिनातील पंपास, ऑस्ट्रेलियातील डाऊन्स, आफ्रिकेतील व्हेल्ड व न्यूझीलंडमध्ये कॅंटबरी या प्रदेशात व्यापारी शेती केली जाते. |


**3.खाणकाम आणि मासेमारी**

| खाणकाम | मासेमारी |
|---|---|
| 1. खाणकाम हा व्यवसाय भूमी व जल या दोन्ही ठिकाणी करता येतो . | 1. मासेमारी व्यवसाय हा फक्त जल विभागातील करता येतो. |
| 2. या व्यवसायावर अक्षवृत्तांची परिणाम होत नाही. | 2.मासेमारी व्यवसायावर अक्षवृत्त वितरणाचा परिणाम होतो. |
| 3. देशाच्या औद्योगिक विकासासाठी हा व्यवसाय गरजेचा आहे. | 3. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागविण्यासाठी हा व्यवसाय गरजेचा आहे. |
| 4. खाणकाम व्यवसायावर खनिज साठे यांचे वितरण, मजुरांची उपलब्धता, खनिज शुद्धीकरण | 4. मासेमारी व्यवसायावर भूखंडमंच, समुद्रप्रवाह, आधुनिक बोटी व जाळी इत्यादी घटक परिणाम |


| | |
|---|---|
| यंत्रणा इत्यादी घटक परिणाम करतात. | करतात. |
| 5. उदा: भारतातील छोट्या नागपूरचे पठार, बॉम्बे हाय इत्यादी | 5. उदा: डॉगर बँक, जॉर्जेस बँक इत्यादी. |

प्रश्न 4 अ) जगाच्या नकाशा आराखड्यात मध्ये पुढील भावी बाबी योग्य चिन्हाच्या साहयाने दाखवून सूची तयार करा.

1. डॉगर बँक मत्स्य क्षेत्र.
2. आशिया खंडातील वन कटाईचे क्षेत्र.
3. ऑस्ट्रेलियातील पशुपालन क्षेत्र.
4. युरोपमधील शेतीखालील क्षेत्र.
5. अरबी समुद्रातील खाणकाम क्षेत्र.
6. नैऋत्य अटलांटिक मधील मासेमारी क्षेत्र.



**प्रश्न 4 ब) दिलेल्या आलेखाचे निरीक्षण करुन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**




**1.कोणत्या खंडात 10 टक्के पेक्षा कमी लोकसंख्या शेती व्यवसायामध्ये कार्यरत आहे**

**उत्तर** - युरोप

**2.कोणत्या खंडात 40 टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या शेती व्यवसायामध्ये कार्यरत आहे.**

**उत्तर** - आफ्रिका

**3.दिलेल्या आकडेवारीकडे बघतात या खंडांना तिथल्या आर्थिक विकासाच्या स्तरानुसार चढत्या क्रमाने लावता येईल काय.**

**उत्तर** - होय. युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आशिया, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका.

**4 आशिया खंडात प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी किती आहे.**

**उत्तर- 24.49%**

**5 प्राथमिक व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येचे प्रमाण कोणत्या खंडात जास्त आहे.**

**उत्तर-** आफ्रिका खंडात

**प्रश्न 5. टीपा लिहा.**

**1. मासेमारी व प्राकृतिक घटक**

**उत्तर-**

मासेमारी हा प्राथमिक व्यवसाय अन्न या मुख्य उत्पादनासाठी आणि खते, तेले, वंगणे इत्यादी दुय्यम उत्पादनासाठी केला जातो. प्रामुख्याने नद्या, सर्व तळी,कालवे, धरणे यामुळे तयार झालेली जलाशय

इत्यादीमध्ये अंतर्गत मासेमारी चालते आणि खुल्या समुद्रातील मासेमारी असे दोन प्रकारे मासेमारी केली जाते.मासेमारीसाठी प्राकृतिक घटक अनुकूल असणे आवश्यक आहे. प्राकृतिक घटक व मासेमारी यांचा निकटचा संबध कसा आहे. ते खालील प्रमाणे घटकांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

• **भूखंड मंच व प्लवंक** - समुद्राच्या जवळ सर्वसाधारणपणे दोनशे मीटर खोलीपर्यंत उथळ भागास भूखंड मंच असे संबोधले जाते.या भागाचा उतार मंद असतो व त्यावर गाळाचे, चिखलाचे प्रमाण जास्त असते.या उथळ सागरी प्रदेशात सूर्यकिरणे सागरतळापर्यंत जातात व सागरतळावर सूक्ष्म जीवजंतूंची निर्मिती होते. त्यात वनस्पती व प्राणी जीवन असू शकते. या असंख्य लहान सजीवांना प्लवंक म्हणतात.प्लवंक हे माशाचे महत्त्वाचे खाद्य व मूलभूत अन्न आहे.या भूखंडमंचावर जगात सर्वाधिक मासेमारी केली जाते.

• **किनाऱ्याचे व पाण्याचे स्वरूप** - मोठ्या प्रमाणात मासेमारी हे प्रामुख्याने दंतुर किनारा असणाऱ्या सागर भागातून केले जाते. मासेमारी करणाऱ्या होड्या व बोटींना दंतुर सागर किनारा मुळे प्रचंड वादळाच्या वेळी संरक्षण मिळते. किनाऱ्यावर समुद्र शांत असतो. मासे पकडण्याची आदर्श स्थिती असते. शिवाय दंतुर किनाऱ्यावर बंदरांचा विकास होऊन मासळीची आयात - निर्यात सुलभ होते. दंतुर किनाऱ्यामुळे खाड्यांमधून व नद्यांच्या मुखाजवळ माशांचे अनेक प्रकार उपलब्ध होतात. किनारपट्टीच्या भूप्रदेशात अरण्य असतील तर मासेमारीसाठी उपयुक्त बोटि व जहाजे तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लाकडाचा पुरवठा होतो. जर किनारपट्टीचा प्रदेश डोंगराळ, शेतीस निरुपयोगी असेल तर आपोआपच अशा भागातील लोक मासेमारीकडे वळतात. त्यामुळे मासेमारी करणारे प्रदेश हे सुचीपरणी व मध्य कटिबंधीय मिश्रित टनक लाकडाच्या अरण्याच्या क्षेत्रात येतात.

• **सागरी प्रवाह** -समुद्र पृष्ठभागावरून उष्ण व थंड सागरी प्रवाह वाहत असतात. त्याचबरोबर विविध प्रकारचे मासे ही वाहत येतात. जेथे उष्ण व थंड सागरी प्रवाह एकत्र येऊन मिळतात. तेथील पाणी उबदार होउन तेथे माशांची प्लवंक ही खाद्य वनस्पती उगवते. त्यामुळे हे प्रदेश प्रमुख मत्स्य क्षेत्रे व प्रमुख व्यापारी मासेमारीची केंद्र बनलेले आहेत. तसेच भूभागावरुन अनेक नद्या समुद्रात गोडे पाणी व नत्रयुक्त पदार्थांची भर टाकतात. नत्रयुक्त पदार्थ माशांना आवश्यक असतात. अशा भागातही माशांचे उत्पादन जास्त होते.

• **थंड हवामान**- सागर जलाचे तापमान 20 डिग्री सेल्सियस पेक्षा कमी असल्यास जलचर प्राण्यांची वाढ चांगल्या प्रकारे होते. मध्य कटिबंधीय हवामानातील सागर जल थंड असल्याने तेथे माशांचे महत्त्वाचे प्रकार आढळतात. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील उष्ण हवामानामुळे मासे जास्त काळ टिकत नाहीत, तर ते लवकर नाश पावतात. व या कटिबंधातील अतिशय उबदार सागर भागात आढळणारे मासे व्यापारी दृष्ट्या

कमी महत्त्वाचे असतात. मध्य कटिबंधात हिवाळ्यातील नैसर्गिक बर्फाच्या पुरवठ्यामुळे मासे दीर्घकाळ टिकविता येतात.

• **अक्षवृत्तीय स्थान** -अक्षवृत्तीय स्थानाचा प्रभाव मासेमारीवर मोठ्या प्रमाणात पडत असतो. मासेमारीचा प्रदेश कोणत्या अक्षवृत्तात आहे. यावर तेथील हवामान, आढळून येणारे समुद्रप्रवाह ठरत असतात. जे मासेमारीला प्रभावित करतात.

**3. व्यापारी तत्त्वावरील लाकूडतोड व्यवसाय**

जगामध्ये व्यापारी तत्त्वावरील लाकूडतोड व्यवसायाचा विकास हा समशीतोष्ण सुचीपर्णी वनांच्या प्रदेशात अधिक झालेला दिसून येतो. विषुववृत्तीय प्रदेशात असणारे घनदाट वने, रोगट हवामान, हिंस्र प्राणी यामुळे या भागात व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसायाचा विकास झाला नाही. मात्र समशीतोष्ण व सूचिपर्णी वनाच्या प्रदेशातील एकाच प्रकारच्या वृक्षांचे प्रमाण अधिक, वृक्ष हे सरळ, उंच वाढतात या वृक्षांचे लाकूड असल्याने या लाकडाला अधिक मागणी आहे. या प्रदेशात यांत्रिक साधनांच्या साहयाने मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते. तसेच लाकुड वाहतूक करण्यासाठी वाहतूक साधनांचाही विकास झाला आहे. जगात व्यापारी तत्त्वावरील लाकूडतोड व्यवसाय हा उत्तर अमेरिका खंडाच्या उत्तरेकडील प्रदेश, रशियातील सूचीपर्णी वनांचा प्रदेश या भागात अधिक विकसित झालेला आहे.

**4. शिकार व परिसंस्थेचा ऱ्हास**

पर्यावरणामध्ये असणाऱ्या जैविक व अजैविक घटकांमधील व जैविक घटकात मानव, विविध प्राणी व पक्षी यांचा समावेश होतो. पर्यावरणाच्या अस्तित्वासाठी मानव, प्राणी व पक्षी यांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. मात्र मानवाने आपल्या अन्नाची गरज, मनोरंजन व विविध वस्तूंची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्राण्यांची व पक्ष्यांची शिकार केली आहे. व चोरट्या मार्गाने आजही करत आहे. या अधिक शिकारीमुळे पक्ष्यांचे व प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. अनेक प्रजाती या नष्ट झालेले आहेत व काही प्रजाती या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे परीसंस्थेमधील अन्नजाळे व अन्नसाखळी हे नष्ट होऊ लागल्या आहेत. परिसंस्थेला धोका निर्माण झालेला आहे व परिसंस्थेचा ऱ्हास होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ वन्य परिसंस्थेतील मांसभक्षक प्राण्यांची अधिक शिकार केली तर अन्नसाखळी व अन्नजाळे नष्ट होऊन परिसंस्थेला धोका निर्माण होतो व काही कालावधीनंतर ती परिसंस्था नष्ट होईल.

**प्रश्न 6). खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**1. व्यापारी मासेमारीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**उत्तर -**

मासेमारी व्यवसाय मुख्य प्राथमिक व्यवसाय आहे वाढती लोकसंख्या व अन्नाची गरज या म्हणून हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर विकसित झालेला आहे आधुनिक यंत्र मासेमारी कौशल्य अनुकूल हवामान यामुळे हा व्यवसाय व्यापारी तत्त्वावर केला जातो या व्यापारी मासेमारीवर प्राकृतिक व मानवी घटकांचा परिणाम होत असतो तो पुढील प्रमाणे.

**अ) प्राकृतिक घटक**

1. अक्षवृत्तीय स्थान - अक्षवृत्तीय स्थानाचा प्रभाव मासेमारीवर मोठ्या प्रमाणावर पडत असतो. मासेमारीचा प्रदेश कोणत्या अक्षवृत्त आहे. यावर तेथील हवामान, आढळून येणारे समुद्रप्रवाह ठरत असतात, जे मासेमारीला प्रभावित करतात.

2. हवामान - उष्ण हवामानापेक्षा थंड हवामानाच्या प्रदेशात अधिक मासेमारी क्षेत्र आढळून येतात. शीत हवामानात मासे अधिक काळ टिकून राहण्यास मदत होते.

3. समुद्र प्रवाह - उष्ण व थंड समुद्रप्रवाह यांचे जेथे मिलन होत असते, त्या भागात प्लवंकाची अधिक निर्मिती होते. प्लवंक हे माशांचे खाद्य आहे. त्यामुळे या भागात माशांची पैदास मोठ्या प्रमाणात होते.

4. भूखंडमंच - समुद्राच्या सर्वसाधारणपणे 200 मीटर खोलीपर्यंतच्या उधळ भागास भूखंडमंच असे म्हणतात. या उथळ भागात सूर्याची किरणे पोचू शकतात. त्यामुळे या भागात प्लवंकाची अधिक निर्मिती होते. या भूखंडमंच्यावर जगातील सर्वाधिक मासेमारी केली जाते.

5. दंतुर किनारे - दंतुर किनाऱ्यावर अधिक चांगल्या नैसर्गिक बंधाऱ्यांची निर्मिती होते. ही बंदरे मासेमारी करणाऱ्या बोटींना सुरक्षित ठिकाण उपलब्ध करून देतात. ज्यांच्या आधाराने बोटी खोल समुद्रात मासेमारी करू शकतो करू शकतात.

6. किनारी भागातील वनांचे प्रमाण - किनारी भागात वनांचे प्रमाण अधिक असल्यास मासेमारीच्या बोटींच्या निर्मितीसाठी लाकूड सहज उपलब्ध होते. त्यामुळे मासेमारीला आर्थिक चालना मिळते.

**आ) मानवी घटक**

**1. आधुनिक जाळे व यांत्रिक बोटी** - मासेमारीसाठी पारंपारिक बोटी व जाळी यापेक्षा आधुनिक बोटिंग वजाळे यामुळे या व्यवसायाचा विकास होण्यास मदत होते.

**2. मासेमारी कौशल्य** - मासेमारीचे कौशल्य ज्या प्रदेशातील लोकांना अधिक चांगले विकसित झालेले असते. त्या भागात मासेमारी अधिक मोठ्या प्रमाणात केले जाते. उदा: जपान आणि चीन सारख्या काही देशांमध्ये मासेमारीचे पारंपारिक कौशल्या उच्च दर्जाचे आहे. त्यामुळे तेथे हा व्यवसाय जास्त वृद्धिंगत झाला आहे.

**3. साठवण किंवा शीतगृहाची सोय** - मासे हे नाशवंत असतात. उच्च अक्षवृत्तीय प्रदेशांमध्ये मासे हा नाशवंत पदार्थ सहज साठवता येतो. पण उष्णकटिबंधात मात्र त्यासाठी शीतगृहाची सोय करावी लागते.

**4. वाहतूक व्यवस्था** - मासे हे नाशवंत असल्यामुळे त्यांना बाजारपेठेपर्यंत लवकरात लवकर पोचविण्यासाठी आधुनिक वाहतूक व्यवस्थेची गरज असते.

**5. बाजारपेठ** - मासेमारी होण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध असणे गरजेचे आहे. ज्याद्वारे माशांची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री चालेल व या व्यवसायाचा विकास होईल.

**6. शासनाचे धोरण** - शासनाचे मासेमारी संबंधातील विविध नियम, कायदे तसेच माशांच्या आयात - निर्यात बद्दलचे धोरण याचाही परिणाम व्यवसायावर होत असतो.

अशाप्रकारे मासेमारी व्यवसायावर प्राकृतिक व मानवी घटकांचा परिणाम होत असतो.

**2) मंडई बागायती शेतीची वैशिष्ट्ये लिहा.**

उत्तर - मंडई बागायती शेती ही व्यवसायातील आधुनिक संकल्पना असून शहरीकरणामुळे या विशिष्ट प्रकारच्या शेतीची सुरुवात झाली. औद्योगिक क्रांतीनंतर शहरीकरण जसजसे वाढत गेले, तसतसे शहराच्या सोबतच्या परिसरातील शेती उत्पादनात क्रांतिकारक बदल होत गेले. शहरी भागातील दाट लोकसंख्येला रोजच्या आहारात आवश्यक असलेला भाजीपाला, फळभाज्या, फळे, फुले, दुध, अंडी, मासे, तसेच मांस यांची गरज असते. या पिकांची शहराच्या आसपासच्या प्रदेशात लागवड करतात, व ही उत्पादने ताबडतोब जलद वाहतूक साधनाच्या सहाय्याने शहरी बाजारपेठेत पाठवतात. बाजारपेठेतील मागणीनुसार पिकांचा प्रकार व प्रमाण ठरते. अशा पिकांच्या शेतीस मंडई बागायती शेती असे संबोधले जाते.

**वैशिष्ट्ये –**

**1. दाट लोकवस्तीची केंद्रे** - औद्योगिक क्रांतीनंतर सर्वच देशात झपाट्याने शहरे विकसित झाली. दाट लोकसंख्येतीची केंद्रे निर्माण झाली. येथील बहुसंख्य लोकसंख्या बिगर शेती व्यवसायात गुंतलेले असल्याने त्यांचे राहणीमान उच्च असते.

**2. ताज्या स्वरूपात मालाची मागणी-** शहरी भागातील लोकसंख्येची भाजीपाला, फळभाज्या, फळे, दूध, अंडी, मासे व मांस इत्यादी उत्पादनना ताज्या स्वरूपात दैनंदिन मागणी असते. त्यामुळे ही मागणी पूर्ण करण्यासाठी शेतकरी शहरालगत जवळच्या प्रदेशात भाजीपाला व इतर उत्पादन घेतात.या मालाची मागणी मोठ्या प्रमाणावर असते.

**3. उपलब्ध बाजारपेठ** - शेतकऱ्यांना शहरे ही एक निश्चित जवळची दररोज व रोख रक्कम मिळवून देणारे महत्त्वाची बाजारपेठ उपलब्ध झाली.सर्वसाधारणपणे ताज्या उत्पादनांचा पुरवठा बाजारपेठेत होण्याकरिता शहरापासून ट्रकद्वारे एका रात्रीचा प्रवास इतक्या दूर अंतरावर या प्रकारची शेती केली जाते. त्यामुळे या शेतीला ट्रक फार्मिंग असे म्हणतात.

**4. मंडई बागायती हे शहरीकरणाचे अपत्य** - शेतकरी परंपरागत शेती पद्धतीत हळूहळू बदल करून, मंडई बागायतीची निर्मिती झाली. त्यामुळे मंडई बागायती हे शहरीकरणाचे अपत्य आहे असे म्हटले जाते.

**5. जलद व कार्यक्षम वाहतूक** - या शेतीतील माल नाशवंत असल्याने अशा भागात जलद व कार्यक्षम वाहतूक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

**6. दर हेक्टरी जास्तीत जास्त उत्पादन-** या शेतीत मोठी भांडवल गुंतवणूक, खतांचा वापर व तंत्रज्ञानाचा विकास यांना प्राधान्य दिलेले असते. एकंदरीत अति सखोल पद्धतीचा अवलंब करून दर हेक्टरी जास्तीत जास्त उत्पादन मिळवावे लागते.

शेतीचा आकार लहान, सखोल शेती पद्धत,जलसिंचनाचा वापर, सेंद्रिय व रासायनिक खतांचा मुक्त वापर, मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणूक, शास्त्रीय ज्ञानाचा अधिक वापर इत्यादी मंडई बागायती शेतीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

**प्रदेश** - जगातील औद्योगिकरण झालेल्या व दाट घनतेच्या शहरी भागात केली जाते. यातील प्रमुख विभागात वायव्य युरोपमधील ब्रिटन, डेन्मार्क, बेल्जियम, जर्मनी आणि नेदरलँड, संयुक्त संस्थानातील ईशान्य कडील लेक पेनिंसुला, आग्नेय कडील किनारपट्टीचा प्रदेश या औद्योगिक पट्टा बरोबरच जगातील बहुतांशी मोठ्या शहरांच्या आजूबाजूच्या प्रदेशात या प्रकारची शेती केली जाते.

**4) जगात पशुपालन होणाऱ्या प्रदेशाबद्दल टीप लिहा.**

**उत्तर** - पशुपालन व्यवसायाचे जागतिक वितरण हे 30 अंश ते 60 अंश उत्तर व 30 अंश ते 55 अंश दक्षिण अक्षवृत्त दरम्यान झालेले दिसते. या व्यवसायावर हवामानाचा प्रभाव दिसून येतो. उत्तर गोलार्ध मध्ये या व्यवसायाचा विकास जास्त झालेला आढळतो. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण व उत्तर अमेरिकाखंडातील पशूपालन अत्याधुनिक तंत्र, बाजारपेठ आणि विस्तीर्ण गवताळ कुरणे यांनी प्रभावित

झालेले आहे. दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिकेतील पशुपालन उच्च तंत्रज्ञानावर आधारित असून येथे या व्यवसायाचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले आहे.

घनदाट वने, रोगट हवामान, निकृष्ट चारा असणाऱ्या विषुववृत्तीय प्रदेशात या व्यवसायाचा विकास फारसा झाला नाही. शेतीखालील प्रदेश आणि पशुपालन यांचे वितरण बऱ्याच प्रदेशात एकत्र आढळून येते. त्यामुळे हे व्यवसाय एकमेकांना पूरक असल्याचे लक्षात येते .

**5) खाणकाम व्यवसाय हा खनिजांच्या नैसर्गिक उपलब्धतेवर अवलंबून असतो हे स्पष्ट करा.**

**उत्तर -** मानवास उपयोगी असणारे सर्व खनिजे, खडक व धातुके पृथ्वीच्या अगदी वरच्या भागात म्हणजेच भूकवच्याचा खडकात सापडतात. हे पदार्थ जेव्हा एखाद्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात एकत्रित स्वरूपात आढळतात. तेव्हा त्यांना साठे असे म्हणतात. बहुतेक सर्व साठे हे कठीण खडकात असतात, असे साठे ज्या ठिकाणी भू कवच फोडून खडकापासून खणून काढले जातात त्यास खाणी असे म्हणतात.

खाणकाम व्यवसाय हा खनिजांचा नैसर्गिक उपलब्धतेवर अवलंबून असतो

1. भूकवचात सापडणारे खनिज मानव निर्माण करू शकत नाही.
2. खनिज पूर्णतः निसर्गनिर्मित असते.
3. पृथ्वीवर खनिजांचे वितरण असमान आहे.
4. पृथ्वीवर बहुतेक सर्व प्रदेशात खनिजांचे साठे कमी-अधिक प्रमाणात आढळून येतात.
5. खाणकाम व्यवसाय हा त्या प्रदेशाची भूगर्भ रचना, खनिजांचे मूल्य, हवामान इत्यादी नैसर्गिक घटकावर अवलंबून असते.
6. ज्या प्रदेशात खनिजांचे साठे अधिक प्रमाणात आढळून येतात. त्या प्रदेशात खाणकाम व्यवसायाचा विकास होतो.

**6) प्राथमिक आर्थिक व्यवसायांची वैशिष्ट्ये विस्ताराने लिहा.**

उत्तर – जे व्यवसाय थेट निसर्गाशी संबंधित असतात त्या व्यवसायांना प्राथमिक व्यवसाय असे संबोधतात. उदा: शेती, मासेमारी इ. प्राथमिक व्यवसाय हे नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून असतात. या नैसर्गिक साधन संपत्तीवर तेथील नैसर्गिक घटक व नैसर्गिक आपत्तीचा परिणाम होत असतो. त्यामुळे विविध प्रदेशात वेगवेगळे प्राथमिक आर्थिक व्यवसाय आढळून येतात.

प्राथमिक आर्थिक व्यवसायाची वैशिष्ट्ये–

**1. निसर्गावर अवलंबून -** जे व्यवसाय थेट निसर्गाशी संबंधित असतात, त्या व्यवसायांना प्राथमिक व्यवसाय असे संबोधले जाते. म्हणजेच प्राथमिक व्यवसाय हे पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असतात. उदा: समुद्र किनारी प्रदेशात मासेमारी मासेमारी व्यवसाय विकसित होतो. तर वनांच्या प्रदेशात फळे, कंदमुळे गोळा करणे, लाकूडतोड या प्रकारचे वनावर आधारित प्राथमिक व्यवसाय आढळून येतात.

**2. मनुष्य बळांचा अधिक वापर -** प्राथमिक व्यवसायात द्वितीयक, तृतीय व्यवसायाच्या तुलनेत अधिक श्रमाचा व बळाचा वापर केला जातो. उदा: शेती, मासेमारी, फळे कंदमुळे गोळा करणे, लाकूडतोड या व्यवसायात अधिक कष्ट करावे लागतात .

**3. केवळ केवळ उदरनिर्वाह चालविणे हा उद्देश -** प्राथमिक व्यवसाय व्यवसायाचा मुख्य उद्देश हा केवळ मानवाचा उदरनिर्वाह चालविणे एवढाच असतो.उदा: सखोल उदरनिर्वाह शेती.

**4.आर्थिक मोबदला कमी -**श्रमाच्या व बळाच्या मानाने खूपच कमी आर्थिक मोबदला मिळतो.

**5.यांत्रिकीकरणाचा कमी वापर -**प्राथमिक व्यवसायामध्ये द्वितीय, तृतीय व्यवसायाच्या तुलनेने कमी आधुनिक यंत्राचा व साधनांचा वापर केला जातो. बहुतेक कामे हि हाताने व पारंपारिक साधनानीच केली जातात.

**6.द्वितीय तृतीय व्यवसायांना कच्च्या मालाचा पुरवठा -**प्राथमिक व्यवसाय मधून येणारे उत्पादन हे द्वितीय, तृतीय व्यवसायांना कच्चामाल म्हणून पुरवला जातो. उदा: पशुपालन व्यवसायातून मिळणारे दूध हे दुग्ध प्रक्रिया उद्योगांना कच्चामाल म्हणून पुरवले जाते.

**7.अविकसित अविकसित व विकसनशील राष्ट्रांत अधिक प्रमाण -**प्राथमिक व्यवसायाचे प्रमाण हे अविकसित व विकसनशील राष्ट्रात अधिक आहे. अविकसित व विकसनशील राष्ट्रातील बहुतांशी लोकसंख्याही प्राथमिक व्यवसायात गुंतलेले आहे. उदा: दक्षिण आशियाई देश व आफ्रिकी देश इ.

# 5 व्दितीयक आर्थिक क्रिया

**प्रश्न 1 अ) योग्य पर्याय निवडा.**

1. कापूस हा ...................स्वरूपाचा कच्चा माल आहे.

अ) शुद्ध, ब) अशुद्ध, क) जड, ड) नाशवंत

**उत्तर- शुध्द**

2. लोह-पोलाद उद्योगचंदे स्थापन ...................होतात.

अ) पाणीपुरवठा प्रदेशांजवळ, ब) कोळसा उत्पादक प्रदेशांजवळ, क) बाजारपेठांजवळ, ड) बंदरांजवळ

**उत्तर- कोळसा उत्पादक प्रदेशांजवळ**

**प्रश्न 1 ब) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

1. उद्योगाचे वितरण सर्वत्र एकसमान असते.

**उत्तर : चूक**

2. कोकणात फळ प्रक्रिया उद्योग स्थापित झालेले आढळतात.

**उत्तर : बरोबर**

3. अन्न प्रक्रिया उद्योग हा कृषीवर आधारित उद्योग आहे.

**उत्तर : बरोबर**

**प्रश्न 1 क) विधानामधील अचूक सहसंबंध ओळखा.**

(1) A : मुंबई येथील दमट हवामान सुती वस्त्रोददयोगास पूरक आहे.

R : उद्योगास मोठ्या प्रमाणात पाणी आवश्यक असते.

(अ) केवळ A हे बरोबर आहे. (ब) केवळ R हे बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर : (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही**

(2) A : भारतात औद्योगिक उत्पादनांमध्ये विविधता आहे.

R : भारत हा कृषिप्रधान देश आहे.

(अ) केवळ A हे बरोबर आहे.

(ब) केवळ 2 हे बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर: (ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.**

**प्रश्न 1 ड) चुकीचा घटक ओळखा.**

**1. स्थानमुक्त उद्योग**

(अ) घड्याळ निर्मिती उदद्योग | (ब) मद्य निर्मिती उद्योग

(क) सिमेंट उदद्योग | (ड) हिरे तासणी उदघोग

**उत्तर- (क) सिमेंट उदद्योग**

**2. खनिजांवर आधारित उद्योग**

(अ) सुगंधी द्रव्य उदयोग | (क) पेट्रोरसायन उद्योग

(ब) ॲल्युमिनिअम उदद्योग | (ड) लोह-पोलाद उद्योग

**उत्तर- (अ) सुगंधी द्रव्य उदयोग**

**3. खनिज आधारित उद्योग**

(अ) कागद निर्मिती उद्योग | (ब) सिमेंट उद्योग

(क) लोह-पोलाद उदद्योग | (ड) ॲल्युमिनिअम उद्योग

**उत्तर- (अ) कागद निर्मिती उद्योग**

**4 मुंबई येथील सुती वस्त्रोद्योगास अनुकूल घटक**

(अ) खनिज | (ब) दमट हवामान

(क) बाजारपेठ | (ड) मजूर पुरवठा

**उत्तर- (अ) खनिज**

**प्रश्न 1 इ) विधाने पूर्ण करा.**

1. लोह-पोलाद उदयोग हे कच्चा माल क्षेत्रात स्थापन केले जातात; कारण

**(अ) हा अवजड, वजन घटणारा कच्चा माल आहे.**

(ब) लोह-पोलाद उद्योगाला भरपूर पाण्याची गरज असते.

(क) कोळसा हा वजन घटणारा कच्चा माल आहे.

(ड) कच्चा माल वाहतुकीस खूप खर्च येतो.

**उत्तर-** लोह-पोलाद उदयोग हे कच्चा माल क्षेत्रात स्थापन केले जातात; कारण **हा अवजड, वजन घटणारा कच्चा माल आहे.**

2. संयुक्त संस्थानांचे औदयोगिक विभाग देशाच्या ईशान्य भागात स्थापन झाले आहेत; कारण

(अ) तेथे लोकवस्ती दाट आहे.

(ब) तेथे मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध होऊ शकते.

**(क) तेथे कोळसा व लोह ही खनिजे भरपूर प्रमाणात उपलब्ध होतात.**

(ड) तेथे वाहतूक मार्गांचे केंद्रीकरण झालेले आहे.

**उत्तर-** संयुक्त संस्थानांचे औदयोगिक विभाग देशाच्या ईशान्य भागात स्थापन झाले आहेत; कारण (अ) तेथे लोकवस्ती दाट आहे. कारण **तेथे कोळसा व लोह ही खनिजे भरपूर प्रमाणात उपलब्ध होतात**

3. वस्त्रोद्योग बाजारपेठेजवळ आढळतात; कारण

(अ) कापूस हा अंतिम प्रक्रियेत वजन घटणारा कच्चा माल आहे.

(ब) कापूस हा नाशवंत कच्चा माल आहे.

(क) तेथे स्वस्त मजुरांचा पुरवठा होतो.

**(ड) कापूस हा अंतिम प्रक्रियेत वजन न घटणारा कच्चा माल असल्यामुळे दूरवरून वाहून आणता येतो.**

**उत्तर-** वस्त्रोद्योग बाजारपेठेजवळ आढळतात; कारण **कापूस हा अंतिम प्रक्रियेत वजन न घटणारा कच्चा माल असल्यामुळे दूरवरून वाहून आणता येतो.**

4.साखर कारखाने ऊस उत्पादक परिसरात आढळतात; कारण

(अ) ऊस हा वजन न घटणारा कच्चा माल आहे.

**(ब) ऊस हा नाशवंत व वजनघटीत कच्चा माल आहे.**

(क) उसाच्या वाहतुकीचा खर्च कमी येतो.

(ड) साखर कारखान्यास भरपूर पाण्याची गरज असते.

**उत्तर**- साखर कारखाने ऊस उत्पादक परिसरात आढळतात; कारण **ऊस हा नाशवंत व वजनघटीत कच्चा माल आहे.**

**प्रश्न 2 भौगोलिक कारणे लिहा.**

**1. सुती वस्त्रोददयोगाच्या स्थानिकीकरणावर हवामान व बाजारपेठ हे घटक प्रभावी आहेत.**

**उत्तर :अ)** सुती वस्त्रोद्योगात सरकी काढणे, कापूस पिंजणे, सूत कातणे व सूत विणणे या प्रमुख क्रिया आहेत.

**ब)** त्यांपैकी सूत कातणे व वस्त्र विणणे या दोन प्रमुख क्रियांसाठी दमट हवामान लागते. कोरड्या हवामानात धागा वारंवार तुटतो, मात्र दमट हवामानात सूत कातणे व वस्त्र विणणे सोपे जाते. म्हणूनच बहुतांशी सुती वस्त्रोदयोग है पूर्वी किनारपट्टीच्या दमट हवामानाच्या प्रदेशात केंद्रित झालेले आढळतात.

**क)** मात्र सध्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे यंत्रांच्या साहाय्याने कारखान्याच्या अंतर्गत भागात कृत्रिम स्वरूपात दमट हवामान निर्माण करता येते.

**ड)** परंतु कापड उद्योगात मोठ्या प्रमाणात कुशल व अकुशल मजुरांची आवश्यकता असते. असे मजूर व कापडास मागणी हे दोन्ही घटक मोठ्या शहरात उपलब्ध होतात. म्हणूनच सुती वस्त्रोदयोग हा शहरात किंवा बाजारपेठेतच केंद्रित झालेला दिसतो.

**2. उद्योगांच्या स्थानिकीकरणावर नाशवंत कच्च्या मालाचा प्रभाव पडतो.**

**उत्तर : अ)** उद्योगांचे स्थान कच्च्या मालाच्या स्वरूपावर व गुणधर्मावर अवलंबून असते.

**ब)** काही उद्योगधंदयांना लागणारा कच्चा माल हा नाशवंत असतो. नाशवंत कच्च्या मालावर ठरावीक कालावधीत प्रक्रिया होणे जरुरीचे असते.

**क)** त्यामुळेच अशा नाशवंत कच्च्या मालावर आधारलेले उद्योगधंदे कच्च्या मालाच्या उत्पादन क्षेत्रातच उभारले जातात. उदा., साखर कारखाने तसेच दुधावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे.

**ड)** त्याचप्रमाणे फळांवर प्रक्रिया करणारे अन्नप्रक्रिया उद्योगही फळनिर्मिती आणि उत्पादन क्षेत्रात केंद्रित झालेले दिसतात.

**3. साखर कारखाने ऊस क्षेत्राच्या परिसरातच उभारले जातात.**

**उत्तर : अ)** ऊस हा वजन घटणारा कच्चा माल आहे.

**ब)** उसाची तोडणी झाल्यानंतर त्यातील शर्करेचे प्रमाण कमी होत जाते. त्यामुळे ऊस तोडल्यानंतर 24 तासांच्या आत तो कारखान्यात गाळणे आवश्यक असते.


**क)** उसाच्या वजनापैकी फक्त 1० टक्के वजनाचे साखरेत रूपांतर होते.

**ड)** त्यामुळे उसाची वाहतूक ही साखरेच्या वाहतुकीपेक्षा अधिक खर्चाची असते. हे टाळण्यासाठी साखर कारखाने ऊस क्षेत्राच्या परिसरातच उभारले जातात.

**प्रश्न 3 फरक स्पष्ट करा.**

| प्राथमिक व्यवसाय | द्वितीयक व्यवसाय |
|---|---|
| 1 प्राथमिक व्यवसाय हे द्वितीयक व्यवसायासाठी आवश्यक असा कच्चा माल पुरवतात. | 1 द्वितीयक व्यवसायात कच्च्या मालावर प्रक्रिया करून त्याची उपयुक्तता वाढवितात. |
| 2 यातून मिळणाऱ्या कच्च्या मालाचे बाजार मूल्य तुलनेने कमी असते. | 2.यातून मिळणाऱ्या कच्च्या मालाचे बाजार मूल्य तुलनेने जास्त असते. |
| 3 ज्या देशात प्राथमिक व्यवसाय जास्त प्रमाणात केले जातात, त्या देशाची आर्थिक विकासाची पातळी कमी असते. | 3.ज्या देशात प्राथमिक व्यवसाय जास्त प्रमाणात केले जातात, त्या देशाची आर्थिक विकासाची पातळी कमी असते. |
| 4 उदा. शेती, पशुपालन, मासेमारी खाणकाम इ. | 4. उदा. लोहपोलाद उद्योग, साखर उद्योग इ. |

**प्रश्न 4 ) दिलेल्या नकाशाचे निरीक्षण करुन विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा**
**(संदर्भ- पाठय पुस्तक पान क्र 48)**




**1 नकाशा काय दर्शवतो**

**उत्तर-** नकाशा औद्योगिक प्रदेशांचे खंड निहाय वितरण दर्शवितो किंवा जगातील प्रमुख औद्योगिक प्रदेश दर्शवितो.

**2 कोणत्या खंडात औद्योगिक प्रदेश जास्त आहे**

उत्तर- आशिया खंडात औद्योगिक प्रदेश जास्त आहे

**3 कोणत्या खंडात औद्योगिक प्रदेश कमी आहेत**

**उत्तर-** आफ्रिका खंडात औद्योगिक प्रदेश कमी आहेत

**4 ऑस्ट्रेलिया खंडातील औद्योगिक प्रदेशांची नावे लिहा**

**उत्तर-** सिडनी, पर्थ, ॲडिलेड, मेलबर्न, ऑकलंड आणि वाइकाटो, कॅन्टरबरी

**5 भारतातील औद्योगिक प्रदेशांची नावे लिहा**

उत्तर- छोटा नागपूरचे पठार, मुंबई पुणे कॅरिडॉर, दिल्ली क्षेत्र, कोईमतूर-बंगळुरू, अहमदाबाद वडोदरा

**प्रश्न 5. टीपा लिहा**

**1. स्थानमुक्त उद्योग**

उत्तर: **अ)** उद्योगाच्या स्थानिकीकरणावर कच्च्या मालाची उपलब्धता व त्याचे स्वरूप, पक्क्या मालाचे स्वरूप, बाजारपेठ, हवामान, पाण्याची उपलब्धता इ. प्राकृतिक घटक, तसेच भांडवल, तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ उपलब्धता इ. आर्थिक घटक आणि शासनाचे प्रोत्साहनपर शासकीय धोरण या घटकांचा परिणाम होतो.

**ब)** त्यामुळेच उद्योग हे अनुकूल परिस्थिती असलेल्या प्रदेशात उभारले जातात. उदा., लोह-पोलाद उदयोग हा खनिज उत्पादक प्रदेशाजवळ उभारले जातात.

**क**) पण सद्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे काही उद्योगांना मात्र स्थाननिवडीचे स्वातंत्र्य असते, अशा उद्योगांना स्थानमुक्त उद्योग असे म्हणतात. काही प्रमाणात कच्च्या मालाच्या स्वरूपावरही स्थानमुक्त उद्योग ठरतात. उदा. कापड उद्योग हा कापूस या कच्च्या मालावर अवलंबून असलेला एक स्थानमुक्त उद्योग आहे. कारण कापसाचे वजन आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या वस्त्रांचे वजन यांत फारसा फरक पडत नाही.

**ड)** तसेच या उद्योगातून तयार होणारा पक्का माल हा खूप मूल्यवान किंवा आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित असतात उदा., हिऱ्यांना पैलू पाडणे, जडजवाहिऱ्यांचे दागिने तयार करणे, माहिती तंत्रज्ञानसंदर्भात विविध वस्तूंचे उत्पादन आणि जुळवणी करणे हे सर्व स्थानमुक्त उद्योग आहेत.

**2. वाहतुकीची उद्योगाच्या विकासातील भूमिका**


**उत्तर** : **अ**) प्रामुख्याने कच्चा माल उद्योगधंद्यांच्या ठिकाणी आणण्यासाठी व तयार झालेल्य पक्का माल बाजारपेठेत नेण्यासाठी वाहतूकाची आवश्यक असते.

**ब)** वाहतुकीच्या खर्चाचा उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरणावर व विकासावर परिणाम होतो. वाहतुकीचे रस्ते, लोहमार्ग, जलमार्ग आणि हवाईमार्ग हे प्रमुख मार्ग आहेत. या सर्व मार्गामध्ये जलमार्गानी केली जाणारी वाहतूक कमी खर्चाची असते. म्हणूनच धातू, खनिजे, कोळसा, कच्चे खनिज तेल इ. अवजड कच्च्या मालाची वाहतूक प्रामुख्याने जलमार्गाद्वारे केली जाते. त्यामुळे अनेक उद्योग हे नैसर्गिक बंदरांजवळ स्थायिक झालेले आहेत.

**क)** तसेच दोन किंवा अधिक रेल्वेमार्ग एकत्र येतात अशा रेल्वेजंक्शनजवळ उदयोग स्थायिक झालेले आढळतात. कारण त्या उदद्योगांना लागणारा सर्व प्रकारचा कच्चा माल, मनुष्यबळ, यंत्रसामग्री सहजतेने त्या ठिकाणी पोहोचविता येते.

**ड)** उदयोगातून तयार झालेला पक्का माल बाजारपेठेपर्यंत लवकरात लवकर पाठविण्यासाठी वाहतुकीची आवश्यकता असते.

**प्रश्न 6) सुबक आकृती काढुन भागांना नावे दया.**




**प्रश्न: 7 सविस्तर उत्तरे लिहा.**

**प्रश्न 1. उद्योगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक उदाहरणांसह स्पष्ट करा.**

उत्तर : **अ) प्रस्तावना:** उद्धोगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणाऱ्या घटकामध्ये प्राकृतिक घटक, मानवी घटक, आर्थिक घटक आणि राजकीय घटकांचा परिणाम होतो.ज्या प्रदेशात हे सर्व घटक उद्योगाच्या स्थानिकीकरणासाठी अनुकूल आहेत,अशाच प्रदेशात उद्योगाची उभारणी केली जाते.

**ब) प्राकृतिक घटक :** प्राकृतिक घटकांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**(1) कच्चा माल:** कोणत्याही उदद्योगधंद्याला कच्च्या मालाची आवश्यकता असते. काही उद्योगधंदयांना लागणारा कच्चा माल हा शुद्ध व वजन न घटणारा असतो. उदा., कापूस. असे उद्योगधंदे कच्च्या मालाच्या क्षेत्रात किंवा बाजारपेठ प्रदेशात उभारले जातात. काही उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल हा अवजड व वजन घटणारा असतो, असे उद्योग कच्च्या मालाच्या क्षेत्रातच उभारले जातात. उदा., लोह-पोलाद उद्योग, सिमेंट उद्योग. काही

उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल हा नाशवंत असतो. त्यामुळे असे उदयोगधंदे कच्च्या मालाच्या उत्पादन क्षेत्रातच उभारले जातात. उदा., फुले व फळे प्रक्रिया उद्योग.

**(2) हवामान:** काही उद्योगांना विशिष्ट प्रकारच्या हवामानाची गरज असते. उदा., वस्त्रोद्योग हे दमट हवामानाच्या प्रदेशात स्थायिक झालेले आढळतात. मात्र,सद्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे हवामान हा घटक तितकासा प्रभावी ठरत नाही.

**(3) पाणीपुरवठा:** ज्या उद्योगांना भरपूर प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते, असे उद्योग नदीकिनारी स्थायिक झालेले आढळतात. उदा., लोह-पोलाद, कागदनिर्मिती.

**(4) ऊर्जा साधने:** सर्वच उद्योगधंद्यांना मुबलक प्रमाणात ऊर्जा साधनांची आवश्यकता असते. ज्या प्रदेशात स्वस्त व मुबलक ऊर्जा साधने सहजरीत्या उपलब्ध होतात, त्या प्रदेशात उद्योगधंद्याची स्थापना करणे सोयीचे असते व फायद्याचे ठरते. म्हणूनच कोळसा उर्जा साधने उपलब्ध असलेल्या प्रदेशात लोह-पोलाद उदयोगाचे स्थानिकीकरण होते.

**(5) जमिनीची उपलब्धता:** सर्वच उद्योगांना जमिनीची आवश्यकता असते. त्यामुळेच ज्या प्रदेशात सपाट जमीन सहजरीत्या उपलब्ध होते, अशा प्रदेशात उदयोगांचे केंद्रीकरण होताना दिसते. उदा., साखर उद्योग, लोह-पोलाद उदयोग.

**(क) आर्थिक घटक:** उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरणावर आर्थिक घटकाचा परिणाम पुढीलप्रमाणे होतो.

**(1) मजूरपुरवठा:** उद्योगधंद्यासाठी कुशल व अर्धकुशल मजुरांची आवश्यकता असते, ज्या प्रदेशात लोकसंख्या दाट असते त्या प्रदेशात मजूरपुरवठा सहज होतो. उदा., मुंबईला कोकण व उत्तर महाराष्ट्रातून मुबलक प्रमाणात मजुरांची उपलब्धता होते.

**(2) वाहतूक सेवा:** कच्चा माल उदयोगचंदांच्या ठिकाणी आणणे व तयार केलेला पक्का माल बाजारपेठेपर्यंत पोहोचवण्यासाठी उत्तम प्रकारची वाहतूक व्यवस्था आवश्यक असते. स्वस्त व जलद वाहतुकीची उपलब्धता असलेल्या प्रसेशात उदघोगाचे स्थानिकीकरण होते. उदा. लोहमार्ग व जलमार्ग

**(3) बाजारपेठेचे सान्निध्य:** निरनिराळ्या उद्योगधंदयांत तयार झालेल्या पक्क्या मालासाठी बाजारपेठेची आवश्यकता असते. बाजारपेठेचा परिणाम उद्योगांच्या स्थानिकीकरणावर होत असतो. काही उद्योगांत तयार होणारा पक्का माल हा नाशवंत स्वरूपाचा असतो. उदा., बेकरी व्यवसाय हा उद्योगही बाजारपेठेजवळच होतो.

**(4) भांडवलाची उपलब्धता:** उदयोगांना भरपूर प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. त्यामुळे भांडवल उपलब्ध करून देणाऱ्या बँका व तत्सम सेवा-सुविधा जेथे सहजतेने उपलब्ध होतात, अशा ठिकाणी उद्योगांचे केंद्रीकरण झालेले दिसते.

**(ड) राजकीय घटक:** यामध्ये पुढील काही घटकांचा परिणाम होतो.

**(1) शासकीय धोरण:** उद्योगधंद्यांच्या स्थानिकीकरणासाठी सरकारी धोरणे ही अनुकूल असावी लागतात. शासन उद्योगधंद्यांना स्वस्त जमीन, पाणी व वीज या पायाभूत सोयी-सुविधा पुरवते, कमी व्याजदराने भांडवल पुरवठा करते; तसेच करांमध्ये सवलती देते.

**(2) पर्यावरणीय धोरण:** प्रदेशातील पर्यावरणाची गुणवत्ता राखण्यासाठी एखादया प्रदेशात उद्योगांना प्रोत्साहन देणे किंवा विशिष्ट प्रकारच्या उद्योगांना प्रवेश नाकारणे हाही शासकीय धोरणाचाच एक भाग असतो.

**(3) केंद्रीकरणाचे किंवा विकेंद्रीकरणाचे धोरण:** काही वेळेस प्रादेशिक व आर्थिक असमतोल दूर करण्यासाठी औद्योगिक विकेंद्रीकरणाचे धोरणही राबवले जाते.

**(इ) समारोप:** वरीलप्रमाणे अनेक घटकांचा परिणाम कमी-जास्त प्रमाणात उद्योगधंद्याच्या स्थानिकीकरणावर होतो.

# 6 तृतीयक आर्थिक क्रिया

**प्रश्न 1 अ) साखळी पुर्ण करा.**

| अ | ब | क |
|---|---|---|
| 1 माथेरान | 1 चहा | 1 संदेश वहन |
| 2 भौगोलिक स्थान निश्चिती | 2 अटलांटिक महासागर | 2 तृतीयक व्यवसाय |
| 3 श्रीलंका | 3 कृत्रिम उपग्रह | 3 निर्यात |
| 4 पनामा कालवा | 4 पर्यटन | 4 पॅसिफिक महासागर |

**उत्तर-**

| उत्तर अ | ब | क |
|---|---|---|
| 1 माथेरान | 4 पर्यटन | 2 तृतीय व्यवसाय |
| 2 भौगोलिक स्थान निश्चिती | 3 कृत्रिम उपग्रह | 1 संदेश वहन |
| 3 श्रीलंका | 1 चहा | 3 निर्यात |
| 4 पनामा कालवा | 2 अटलांटिक महासागर | 4 पॅसिफिक महासागर |

**प्रश्न 1 ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(1) विकसित देशात सर्वाधिक लोक -------------------- व्यवसायांत गुंतलेले असतात.

(प्राथमिक, चतुर्थक, **तृतीयक,** द्‌वितीयक)

**उत्तर- तृतीयक**

(2) व्यापार व वाहतूक हे -----------व्यवसाय आहेत.

(प्राथमिक, चतुर्थक, **तृतीयक,** द्‌वितीयक)

**उत्तर-** तृतीयक

(3) चतुर्थक व्यवसाय हे------------- प्रामुख्याने आधारित असतात.

(गुंतवणुकीवर, निसर्गावर, **ज्ञानावर,** शेतीवर)

**उत्तर-** ज्ञानावर

(4) पर्यटन हा ------------ व्यवसाय आहे.

(प्राथमिक, चतुर्थक, **तृतीयक**, द्वितीयक)

**उत्तर-** तृतीयक

(5) ------------------व्यवसायात कोणतेही उत्पादन घेतले जात नाही.

(**शेती संशोधन**, बेकरी, लोह, पोलाद)

**उत्तर**- शेती संशोधन

**प्रश्न 1 क) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

(1) तृतीयक व्यवसाय ------------

(अ) संसाधनांचा वापर (ब) पक्का माल

(क) कच्चा माल **(ड) मालवाहतूक**

उत्तर- **(ड) मालवाहतूक**

(2) नैसर्गिक बंदर---------------

(अ) कोची (ब) **जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट**

(क) दिल्ली इंटरनॅशनल कार्गो टर्मिनल (ड) नागपूर कार्गो हब (मिहान प्रकल्प)

उत्तर- (ब) **जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट**

**प्रश्न 1 ड) योग्य क्रम लावा.**

(1) संदेशवहन साधने (कालमापीप्रमाणे).

(अ) टेलिग्राम (ब) उपग्रहीय दूरध्वनी

(क) दूरदर्शन (ड) सांडणीस्वार

**उत्तर : सांडणीस्वार - टेलिग्राम - दूरदर्शन - उपग्रहीय दूरध्वनी**.

(2) व्यवसाय क्रम (उतरत्या क्रमाने).

(अ) ग्राहक सेवा (ब) कच्चा माल उत्पादन

(क) संशोधन (ड) पक्का माल उत्पादन

**उत्तर: संशोधन - ग्राहक सेवा - पक्का माल उत्पादन - कच्चा माल उत्पादन.**

(3) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे पुढील देशांचा क्रम लावा (चढत्या क्रमाने).

(अ) भारत (ब) अमेरिकेची संयुक्त संस्थाने

(क) केनिया (ड) डेन्मार्क

**उत्तर: केनिया - भारत - डेन्मार्क- अमेरिकेची संयुक्त संस्थाने.**

**प्रश्न 1 इ) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

(1) भौगोलिक विविधता व्यापारास मारक ठरते.

**उत्तर** : हे विधान चूक आहे.

(2) हवाई वाहतुकीचे प्रमाण वाढत आहे.

**उत्तर** : हे विधान बरोबर आहे.

(3) तृतीयक आर्थिक व्यवसायांत प्राथमिक व्यवसायांप्रमाणे निसर्गातून जसेच्या तसे उत्पादन घेतले जाते.

**उत्तर** : हे विधान चूक आहे.

(4) व्यापार म्हणजे दोन किंवा अधिक देशांमध्ये वस्तू आणि सेवांची ऐच्छिक देवाणघेवाण होय.

**उत्तर** : हे विधान बरोबर आहे.

(5) आंतरराष्ट्रीय व्यापार चालणे किंवा बंद होणे हे शासन धोरणावर अवलंबून असते.

**उत्तर** : हे विधान बरोबर आहे.

(6) पर्यटन हा एक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे.

**उत्तर** : हे विधान बरोबर आहे.

(7) भौगोलिक घटकांचा वाहतुकीवर व व्यापारावर परिणाम होतो.

**उत्तर** : हे विधान बरोबर आहे.

**प्रश्न 1 ई) विधानामधील अचूक सहसंबंध ओळखा.**

1) A: तृतीयक व्यवसाय हे सेवा क्षेत्र आहे.

R : कुशल मनुष्यबळ ही तृतीयक व्यवसायांची प्रमुख गरज आहे.

(अ) केवळ A हे बरोबर आहे. (ब) केवळ R हे बरोबर आहे.

(क) A व R हे दोन्ही बरोबर आहेत. (ड) A व R हे दोन्ही चूक आहेत.

**उत्तर : (क) A व R हे दोन्ही बरोबर आहेत.**

2) A: मोबाइल किंवा भ्रमणध्वनी उपकरण सध्या फार उपयुक्त आहे.

R : मोबाइल हा हातात मावणारा, लघु-संगणक आहे.

(अ) केवळ A हे बरोबर आहे. (ब) केवळ R हे बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर; परंतु R हे A चे योग्य कारण नाही.

**उत्तर: (क) A आणि R दोन्ही बरोबर आहेत; आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.**

3) A : तृतीयक व्यवसायामध्ये वस्तुनिर्मिती होत नाही.

R: या व्यवसायात केवळ सेवा दिली जाते.

(अ) केवळ A हे बरोबर आहे. (ब) केवळ R हे बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**उत्तर: (क) आणि R हे दोन्ही बरोबर आहेत; आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे**.

**प्रश्न 1 फ) चुकीचा घटक ओळखा**

(1) वाहतूक प्रकार -----------

(अ) नळ (ब) जल

(क) रस्ता (ड) आंतरजाल

**उत्तर : (ड) आंतरजाल**

(2) व्यापार ---------

(अ) घाऊक (ब) टपाल

(क) किरकोळ (ड) आठवडा बाजार

**उत्तर : (ब) टपाल**

(3) आधुनिक संदेशवहनाची साधने ----------

(अ) भ्रमणध्वनी (ब) दूरदर्शन

(क) विमान (ड) ई-मेल

**उत्तर : (क) विमान**

**प्रश्न 2) भौगोलिक कारणे लिहा.**

**(1) औद्योगिक प्रदेशात तृतीयक श्रेणीच्या व्यवसायांचा विकास होतो.**

**उत्तर** : **अ)** विकसित औद्योगिक प्रदेशात दाट लोकसंख्या आढळते.

**ब)** बहुतांशी लोकसंख्येला रोजगाराच्या विविध संधी प्राप्त होतात. त्यामुळे एकंदरीत राहणीमान्चं चांगले असते.

**क)** लोकांच्या विविध गरजा भागवण्याच्या विविध सेवा व्यवसायांचा विकास होण्यास तेथे पोषक परिस्थिती असते. वाहतूक, दळणवळण सुविधा तेथे उपलब्ध असतात.

**ड)** वरील सर्व कारणांमुळे औदयोगिक प्रदेशात व्यापार, वाहतूक, संदेशवहन, वित्तीय सेवा व इतर सेवा अशा विविध स्वरूपांतील तृतीयक श्रेणीचे व्यवसाय विकसित होतात.

**(2) तृतीयक आर्थिक क्रियांमध्ये सेवा आणि विनिमय यांचा समावेश होतो.**

**उत्तर** : **अ)** तृतीयक व्यवसाय हे प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीयक व्यवसायांना जोडण्याचे काम करतात.

**ब)** तसेच द्वितीयक व्यवसायाला पूरक असे कुशल मनुष्यबळ तयार करतात.

**क)** म्हणूनच वाहतूक, दळणवळण, व्यापार, संदेशवहन अशा अनेक सामाजिक सेवांमध्ये तृतीयक व्यवसायांचा विस्तार आढळतो.

**ड)** थोडक्यात प्रत्येक व्यवसायाचा विस्तार प्रामुख्याने सेवाक्षेत्राशी संबंधित आहे.

**(3) तृतीयक व्यवसायांना सेवाक्षेत्रातील व्यवसाय म्हणतात.**

**उत्तर** : **अ)** तृतीयक व्यवसाय हे कोणत्याही स्वरूपाच्या उत्पादनात सहभागी नसतात.

**ब**) तृतीयक व्यवसाय हे प्राथमिक व द्वितीयक व्यवसायांना जोडण्याचे कार्य करतात.

**क)** त्याचप्रमाणे या दोन व्यवसायांना पूरक अशा विविध सेवा, व्यापार, वाहतूक, संदेशवहन, वित्तीय सेवा व इतर सेवा पुरवणे हा तृतीयक व्यवसायांचा भाग असतो.

**ड)** थोडक्यात तृतीयक व्यवसाय हे कुठल्याही प्रकारचे उत्पादन न करता सेवा पुरवतात; म्हणून त्यांना सेवाक्षेत्रातील व्यवसाय म्हणतात.

**प्रश्न: 3 फरक स्पष्ट करा**.

1) जलवाहतूक आणि  हवाई वाहतूक

| **हवाई वाहतूक** | **जलवाहतूक** |
|---|---|
| 1) सर्वात महाग वाहतूक प्रकार आहे. | 1) सर्वात स्वस्त वाहतुक प्रकार आहे. |
| 2) मौल्यवान व नाशंवत माल वाहतुकीसाठी उपयुक्त आहे. | 2) अवजड वाहतूकीसाठी उपयुक्त आहे. |
| 3) वाहतुक क्षमता कमी किंवा मर्यादित असते. | 3) वाहतुक क्षमत जास्त असते. |
| 4) वाहतुकीचा वेगवान प्रकार आहे, वेळ कमी लागतो. | 4) जलवाहतुकीचा वेग कमी असतो व  वेळ जास्त लागतो. |
| 5) अपघात, नैसर्गीक आपत्ती, युध्दजन्य परीस्थितीत बचाव व मदत कार्यात उपयुक्त. | 5) राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व्यापारास उपयुक्त असल्याने देशाच्या विकासात महत्वाची भूमीका असते. |

**प्रश्न 4) टीपा लिहा**.

**(अ) तृतीयक व्यवसायांची वैशिष्ट्ये.**

उत्तर : (1) तृतीयक व्यवसाय हे प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीयक व्यवसायांना जोडण्याचे काम करतात.

(2) तृतीयक व्यवसायांत कोणत्याही प्रकारचे उत्पादन केले जात नाही.

(3) मात्र हे व्यवसाय प्राथमिक व द्वितीयक व्यवसायांना पूरक व्यवसाय म्हणून विविध प्रकारच्या सेवा पुरवतात. म्हणूनच यांना सेवा क्षेत्र किंवा सेवा व्यवसाय असेही म्हणतात.

(4) व्यापार, वाहतूक, संदेशवहन, वित्तीय सेवा, पर्यटन अशा अनेकविध सेवा आहेत.

(5) तृतीयक व्यवसायाचा विस्तार आणि आवाका खूप जास्त आहे आणि तो विविध सेवा क्षेत्रांशी संबंधित आहे.

(6) तृतीयक व्यवसायांमुळे साधनसंपत्तीची, कच्च्या मालाची, उत्पादित वस्तूंची, तसेच मजुरांची वाहतूक सुलभ होते.

(7) तृतीयक व्यवसाय करण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणातून कोणत्याही प्रकारच्या कच्च्या मालाची किंवा वस्तूंची गरज लागत नाही. तृतीयक व्यवसायांत नवीन उत्पादनांची निर्मितीही केली जात नाही.

**(ब) चतुर्थक व्यवसायांची वैशिष्ट्ये.**

उत्तर : (1) चतुर्थक व्यवसाय हे बुद्धी व कौशल्यावर आधारित असल्याने हे व्यवसाय बहुतांशी प्रमाणात वैयक्तिक स्तरावर राहतात.

(2) या व्यवसायांचा विस्तार अनेक क्षेत्रांत होतो. उदा., डॉक्टर, अभियंता, वकील, सनदी लेखापाल, कुशल तंत्रज्ञ, कलाकार, साहित्यिक, शिक्षक-प्राध्यापक यांचा या व्यवसायात समावेश होतो.

(3) या व्यवसायातील व्यक्ती त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व नामवंत असतात.

(4) मानवाच्या प्राथमिक, द्वितीयक व तृतीयक व्यवसायांच्या आधुनिकीकरणात चतुर्थक व्यवसाय महत्त्वाची भूमिका बजावतात.

(5) एकूणच मानवी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनात हे व्यवसाय मोलाची भर घालतात.

**(क) संदेशवहनातील कृत्रिम उपग्रहाचे महत्त्व.**

उत्तर : (1) संदेशांचे आदान-प्रदान मानव फार पूर्वीपासून करीत आलेला आहे. त्यासाठी चित्रे, मुद्रा, भाषा यांचा वापर करीत मानवाने विविध स्वरूपांतील संदेशवाहकांचीही मदत घेतली.

(2) वर्तमानकाळात मात्र संदेशवहनात कृत्रिम उपग्रहांद्वारे दूरध्वनी, मोबाइल, आंतरजाल या माध्यमांद्वारे वाणी, लिखित, विदा, ध्वनिफीत, चित्रफीत अशा विविध स्वरूपांच्या माहितीचे-संदेशांचे आदान-प्रदान केले जाते.

(3) कृत्रिम उपग्रहांमुळे 'अंतर' या अडथळ्यावरच पूर्णपणे मात झाली आहे. आता लक्षावधी लोकांपर्यंत, क्षणार्धात, जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात एकाच वेळेस अशक्यप्राय वाटणाऱ्या स्वरूपात माहितीची / संदेशांची देवाणघेवाण शक्य होत आहे.

(4) तसेच, कृत्रिम उपग्रहांमुळे समुद्राची स्थिती, हवामानाचा अंदाज, साधनसंपत्ती / खनिजसंपत्तीचा शोध, आपत्ती व्यवस्थापन, पर्यटन, हवाई वाहतूक, आंतराष्ट्रीय व्यापार या सेवा/व्यवसाय खूप सोपे झाले.

**प्रश्न 5 सविस्तर उत्तरे लिहा**

**प्रश्न : 1. कोणत्याही देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान का महत्त्वाचे असते ?**

उत्तर : **अ) प्रस्तावना :** माणसांना अथवा वस्तूंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्याच्या क्रियेला वाहतूक म्हणतात. वाहतूक हा मानवाचा एक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे. मानवाच्या आजपर्यंतच्या इतिहासात वाहतूक व्यवस्थेच्या विकासाने अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सध्याच्या जगात देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी वाहतूक मार्गांचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.

**ब) देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान:**

**(1) वस्तूंची उपलब्धता :** एखादया प्रदेशात मुबलक साधनसंपत्ती आणि दुसऱ्या प्रदेशात तिची कमतरता हा विरोधाभास वाहतुकीमुळे दूर करता येतो. वाहतुकीमुळे वस्तूंची, साधनसंपत्तीची देवाण-घेवाण करता येते. त्यामुळे मानव आपल्या गरजा सहजपणे भागवू शकतो. वाहतुकीमुळे वस्तूंची स्थळ उपयोगिता व काळ उपयोगिता वाढते आणि वस्तूंच्या किमती कमी होतात.

**(2) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार :** एखादया प्रदेशात विविध वस्तूंचे उत्पादन केले जाते, तर दुसऱ्या प्रदेशात त्या वस्तूंना मागणी असते. उत्पादन आणि मागणी या केंद्रांना जोडण्याचे महत्त्वाचे कार्य वाहतुकीमुळे होते. थोडक्यात वाहतुकीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. **(3) उद्योगांची स्थाननिश्चिती:** विविध उद्योगधंद्यांना विविध प्रकारचा कच्चा माल, मजूर, यंत्रसामग्री, पाणी, इंधन, साधने यांची गरज असते. या सर्व गोष्टी वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध असतात. मात्र या वस्तूंच्या गुणदोषांचा विचार करून उद्योगधंद्यांचे स्थान वाहतुकीमुळे ठरवता येते. वाहतुकीमुळे उद्योगांनी तयार केलेला पक्का माल बाजारपेठेत ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतो. **(4) आर्थिक विकास :** वाहतूक साधनांमुळे उद्योगांचा विकास होतो. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. वाहतूक साधनांमुळेच कुशल मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री मिळते. थोडक्यात, देशाच्या सर्वांगीण विकासास वाहतुकीच्या साधनांमुळे चालना मिळते.

**(5) शहरीकरण :** वाहतुकीच्या साधनांमुळे जशी मालाची वाहतूक होते, तशी लोकांची स्थलांतरे होतात. लोकसंख्येचे अधिकाधिक केंद्रीकरण होते आणि त्यामुळे शहरांची वाढ आणि विकास होतो. जेवढी वाहतूक साधने विकसित तेवढा शहरीकरणाचा वेगही जास्त असतो.

**(6) पर्यटन व्यवसायाचा विकास** : पर्यटन हा अत्यंत वेगाने वाढणारा मानवाचा एक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे. संपूर्ण पर्यटन क्षेत्राचा विकास हा पूर्णतः वाहतूक साधनांमुळे आणि वाहतुकीच्या मार्गामुळे होतो.

**(7) सामाजिक आदान-प्रदान :** वाहतुकीच्या साधनांमुळे विविध विचार करणारे, विविध सांस्कृतिक व राजकीय पार्श्वभूमी असलेल्या मानवी समूहांचे लोक एकत्र येतात. त्यांच्यामध्ये विचारांची देवाण-घेवाण होते आणि त्यामुळे सामाजिक अभिसरणाची क्रिया घडून येते. याचा प्रभाव शेवटी प्रदेशाच्या विकासावरही होतो.

**(8) आपत्ती निवारणातील महत्त्व :** युद्ध, दुष्काळ, पूर, भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी औद्योगिक अपघात, वाहतूक अपघात यांसारख्या नैसर्गिक किंवा मानवी आपत्तींच्या वेळी जलद वाहतूक मार्ग हे जीवनरेषेचे कार्य करतात. यामुळेच जीवित व आर्थिक नुकसानीचे प्रमाण कमी करता येते. त्याशिवाय वाचलेल्या लोकांचे स्थलांतर आणि योग्य पुनर्वसनही वाहतुकीमुळे शक्य होते. **क) समारोप :** थोडक्यात वाहतूक हे आता मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनले असून; मानवी जीवन, मानवी व्यवसाय, मानवी संस्कृती तसेच प्रदेशाचा आर्थिक विकास यांमध्ये वाहतुकीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

# 7 प्रदेश आणि प्रादेशिक विकास

**प्र.1 अचुक गट ओळखा**

1) अ) 1. सातपुडा 2. दख्खन 3. आल्प्स 4. पठारे
ब) 1. यवतमाळ 2. अमरावती 3. सोलापुर 4. बृहन्मुंबई
क) 1. थर 2. सहारा 3. हिमालय 4. गोबी
ड) 1. मराठवाडा 2. खान्देश 3. विदर्भ 4. कोकण

**उत्तर- ड)** 1 **मराठवाडा 2 खान्देश 3 विदर्भ 4 कोकण**

2) ब) 1. मैदाने 2. सरोवर 3. पर्वत 4. पठारे
ब) 1. वायुदाब 2. नद्या 3. तापमान 4.आर्द्रता
क) 1. विषुववृत्तीय वने 2. काटेरी वने 3. सुंदरी वने 4. पानझडी वने
ड) 1. मासेमारी 2. लाकूडतोड 3. शेती 4. बेकरी

**उत्तर- क) 1 विषववृत्तीय वने 2 काटेरी वने 3 सुदंरी वने 4 पानझडी वने**

**प्र. 2 रा - भौगोलिक कारणे लिहा.**

**1) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.**

**उत्तर -**

प्रदेशाचे स्थान, तेथील हवामान, प्रदेशाची प्राकृतिक रचना उंची मृदा, पाण्याची उपलब्धता समुद्राचे सानिध्य, नैसर्गिक बंदराची शक्यता असे विविध प्राकृतिक घटक त्या प्रदेशाच्या विकासावर परिणाम करतात.

सम आल्हाददायक हवामान असणारा प्रदेश विकासात अग्रेसर असतो तर तुलनेने विषम हवामानाचा प्रदेश विकासात मागे पडतो. सागरकिनारी मैदाने नद्याची मैदानी खोरी हे प्रदेश प्रादेशिक विकासात अग्रेसर असतात. तर पर्वतीय प्रदेश वाळवंटी प्रदेश घनदाट वनांचा प्रदेश प्रादेशिक विकासात मागे पडतात.

**2) निरक्षरता दारिद्रय यांसारख्या प्रादेशिक विकासावर परिणाम होतो.**

उत्तर-

1 कोणत्याही देशाची लोकसंख्या ही त्या देशाची साधन संपत्ती असते जर लोकसंख्या साक्षर असेल तर ती लोकसंख्या देशाच्या प्रगतीस हातभार लावते.

2. जर लोकसंख्या निरक्षर असेल तर अशी लोकसंख्या देशाच्या विकासाला हातभार लावू शकत नाही.

3. निरक्षरता व दारिद्रय या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व्यक्ती निरक्षत आहे म्हणून दरिद्री आहे व दारिद्रय असल्यामुळे कुटूंबातील मुलांना शिक्षण मिळू शकत नाही. परिणामी दारिद्रय वाढीस लागते.

4. एकुणच निरक्षरता असलेल्या प्रदेशात आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होत असल्याने प्रदेशातील साधनसंपत्तीचा विकास होत नाही म्हणजेच साधनसंपत्ती उपलब्ध असूनही त्या साधन संपत्तीचा उपयोग कसा करावा याचे लोकांना नसते परिणामी द्रारिद्रय वाढते.

**प्र.3) फरक स्पष्ट करा.**

**1**) कार्यात्मक प्रदेश आणि औपचारीक प्रदेश-

**उत्तर-**

| **कार्यात्मक प्रदेश** | **औपचारिक प्रदेश** |
|---|---|
| 1.जो प्रदेश एखाद्या नागरी केंद्राच्या आर्थिक व सामाजिक प्रभावाखाली असतो. त्याला कार्यात्मक प्रदेश म्हणतात. उदा. पुणे महानगर प्रदेश | 1. औपचारिक प्रदेश म्हणजे असा एक समान किंवा एक संघ प्रदेश की, जेथे त्या प्रदेशातील प्रत्येक जण, तेथील भाषा, हवामान, आर्थिक क्रिया, ठराविक पीक, उत्पादन किंवा प्राकृतिक वैशिष्टये इ. मिळून एकसंघ प्रदेश निर्माण होतो. त्यास औपचारिक प्रदेश म्हणतात. उदा. राज्य किंवा देश |
| 2. कार्याम्तक प्रदेश हे कार्याशिवाय इतर कोणत्याही औपचारिक वैशिष्टयांनी बांधलेले नसतात. उदा. वाय फाय, हॉटस्पॉटचे प्रभावी क्षेत्र | 2.औपचारिक प्रदेशात प्राकृतिक व राजकीय या दोन्ही प्रकारच्या प्रदेशाचा समावेश होतो. उदा. नदीखोरे व जिल्हा. |
| 3.कार्यात्मक प्रदेश हे एकजिनसी नसतात. एकापेक्षा अधिक प्राकृतिक / राजकीय प्रदेश समाविष्ट असू शकतात. | 3.प्रत्येक औपचारिक प्रदेशाला वेगवेगळया सीमा असतात. ज्यामुळे प्रदेश ओळखणे सोपे जाते.<br>उदा. देश |

2) प्राकृतिक प्रदेश आणि राजकीय प्रदेश -

**उत्तर-**

| प्राकृतिक प्रदेश | राजकीय प्रदेश |
|---|---|
| 1. नैसर्गिक प्रदेश म्हणजे असा प्रदेश की जो नैसर्गिक किंवा प्राकृतिक घटकांच्या सीमांमुळे इतरांपासून वेगळा होतो, त्यास नैसर्गिक किंवा प्राकृतिक प्रदेश म्हणतात. उदा. मोसमी हवामान प्रदेश | 1. राजकीय प्रदेश म्हणजे असा प्रदेश की ज्याची सीमा ही अशी सिमीत केलेली असते की, ज्यामुळे स्वतंत्र राज्य, राष्ट्र,प्रशासकीय विभाग, शासन प्रणाली इ. निकषांवर इतरांपासून वेगळा झालेला प्रदेश म्हणजे राजकीय प्रदेश होय. उदा. भारत - महाराष्ट्र - विदर्भ |
| 2. हे प्रदेश प्राकृतिक सीमांनी सिमीत असतात. उदा. पर्वत, पठार, मैदान,हवामान इ. | 2. हे प्रदेश राजकीय सीमांनी सिमीत असतात. उदा. महाराष्ट्र - गुजरात |
| 3.ज्या प्रदेशात प्राकृतिक / नैसर्गिक तत्तवे महत्तवपूर्ण असतात ते प्रदेश नैसर्गिक घटकांच्या आधारे निर्माण होतात.उदा. हिमालय पर्वतीय प्रदेश | 3.राजकीय प्रदेशात कोणत्याही नैसर्गिक तत्वांचा समावेश नसतो तेथे फक्त राजकीय सीमांचा विचार होता. |
| 4.प्राकृतिक प्रदेशांना प्राकृतिक घटकांमुळे वेगळे स्वरुप प्राप्त होते. जसे उंची, भू- रचना, हवामान इ. | 4. राजकीय प्रदेशात विविध सामाजिक, सांस्कृतिक, घटक जसे भाषा, वंश इ. मानवनिर्मित घटकांचा समावेश होतो. |

**प्रश्न 4 रा - टीपा लिहा.**

**1) प्रादेशिक विकासावर परिणाम करणारे घटक**

**उत्तर**- विकास हि एक सापेक्ष संज्ञा आहे विकास मोजण्यासाठी बरेच मापदंड आहेत विविध क्रियाद्वारे त्या क्षेत्रातील उत्पन्न लोकसंख्येचे प्रमाण आणि गुणवत्ता शिक्षण आयुर्मान दारिद्रयतेचे प्रमाण इ. विकासाचे मापदंड आहेत परंतू विकासाचा कोणताही एक मापदंड एखाद्या क्षेत्राचा विकास ठरविणारा एकमात्र घटक असू शकत नाही एक किंवा काही घटक निवडून प्रादेशिक विकासाचा सर्वागीण विचार करता येत नाही सर्व साधारणपणे जेव्हा एखादया क्षेत्राच्या विकासाचा विचार केला जातो तेव्हा प्राकृतिक,सामाजिक आर्थिक आणि पर्यावरणीय इ बाबी लक्षात घेतल्या जातात.

प्रदेशाचे स्थान,हवामान, प्राकृतिक रचना, उंची, मृदा पाण्याची उपलब्धता समुद्राचे सानिध्य नैसर्गिक बंदरांची शक्यता असे विविध प्राकृतिक घटक प्रदेशाच्या विकासावर परिणाम करतात. लोकसंख्या घनता व रचना जन्म-मृत्यूदराचे प्रमाण व्यवसाय रचना, प्रजनन क्षमता जीवनमान आयुर्मान क्रमशक्ती दारिद्रयाचे प्रमाण शिक्षणाचे असे लोकसंख्याविषय गुणात्मक घटक प्रदेशाच्या विकासावर परिणाम करतात.

**2) प्रादेशिक असंतुलन कमी करण्याचे धोरण**

**उत्तर** - प्रादेशिक विकास ही संकल्पना जरी भौगोलिक घटकांवर प्रामुख्याने अवलंबून असली तरी अंतिमत: ती लोकांशी आणि लोकांच्या राहणी मानाशीच जास्त निगडीत आहे. त्यामुळे प्राकृतिक घटकांमुळे जर एखादया प्रदेशाचा विकास असंतुलित झाला तरी शेवटी लोककल्याणासाठी आणि लोकांच्या भल्यांसाठी हा असमतोलपणा दूर करणे गरजेचे असते. लोककल्याणकारी राजव्यवस्थेत विकासातील समतोल साधने अत्यंत महत्वाचे असते. असमतोल दूर करण्यासाठी धोरणात पुढील बाबींचा समावेश होतो.

1) अविकसित प्रदेश शोधणे

2) हे प्रदेश शोधण्यासाठी निकष ठरविणे

3) हे प्रदेश अविकसित राहण्यामागची कारणे शोधणे

4) निकषांनुसार प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी निधी किंवा अनुदान मंजूर करणे.

5) ज्या विभागांमध्ये तातडीने गुंतवणुकीची आवश्यकता आहे असे विभाग ठरविणे. उदा. रस्ते, शाळा, गृहबांधणी, आरोग्य इ.

6) अशा विभागांमध्ये विभागनिहाय गुंतवणुक करुन वेळोवेळी आढावा घेणे.

7) आदिवासी प्रदेश, पर्वतीय प्रदेश, दुष्काळी किंवा अवर्षण ग्रस्त प्रदेश, नैसर्गिक आपत्तीने त्रस्त प्रदेश, यांसारख्या प्रदेशांमध्ये विशेष अनुदान निधी मंजूर करणे.

8) सार्वजनिक आणि पायाभूत सेवा सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने विशेष अग्रक्रम ठरवणे

९) संपूर्ण देशाचा संतुलित विकास होईल या दृष्टीने आवश्यक तेव्हा उद्योगांचे व अन्य व्यवसायांचे विकेंद्रीकरण धोरण ठरविणे आणि राबविणे.

**प्रश्न. 4 था - सविस्तर उत्तरे द्या.**

**1) प्रदेश कशाला म्हणतात ?**

उत्तर - भूगोलांमध्ये प्रदेश या शब्दांचे तात्पर्य त्यांच्या क्षेत्रीय एककाशी असते. ज्यामध्ये एक किंवा काही तत्वांची किंवा लक्षणांची एकरुपता असते. आणि जो दुसऱ्या प्रदेशापासून भिन्न असतो.

सामान्यता समानगुण आणि समान नैसर्गिक स्वरुप असणाऱ्या क्षेत्राला प्रदेश म्हटले जाते. विशिष्ठ गुणधर्मानी युक्त असा विभाग म्हणजे प्रदेश होय. हा विभाग सिमीत असतो म्हणजे त्याच्या सीमाही निश्चित करता येतात. उदा.एखादी प्रमुख नदी तिला येवून मिळणाऱ्या उपनद्या, नद्यांना येवून मिळणारे छोटे - छोटे जलप्रवाह यांनी मिळून ते सिमीत नदीचे खोरे निर्माण होते ते खोरे भौगोलिक प्रदेश म्ळणून ओळखले जाते.

- **नैसर्गिक प्रदेश :-**

भूरचना, हवामान, मृदा, वनस्पती, वन्यजीव ही वैशिष्टये एखाद्या क्षेत्राला प्रदेश करण्यासाठी कारणीभूत ठरतात. बेट एक भूमी आहे. जल नाही त्याची नैसर्गिक सीमा जेथे एक तत्व संपते व दूसरे तत्व सुरु होते. तसेच घनदाट वने संपवून आश्चर्य कारक रित्या खुले गवताळ प्रदेश बघण्यास मिळतात. निसर्गातील हा बदल एका घटकांमुळे उघडपणे पहावयास मिळतो हा बदल नैसर्गिक घटकांच्या आधारे निर्माण होणारे प्रदेश नैसर्गिक प्रदेश म्हणून ओळखले जाते.

- **3) सामाजिक प्रदेश :-**

सांस्कृतिक घटक जसे भाषा, वंशिकता, धार्मिकता, राजकीय घटक, प्रशासकीय घटक, ही प्रदेश वेगळे करतात. उदा मध्य प्रदेश महाराष्ट्र ही दोन राज्ये ज्यांना प्रशासकीय सीमांनी वेगळे केले आहे.

- **4) भाषिक प्रदेश :-**

जगात सर्वत्र सामाजिक गट असून वेगवेगळ्या भाषा बोलतात. विविध भाषांचे सीमांकन करुन भाषि प्रदेश निर्माण होतात. उदा. महाराष्ट्र, कर्नाटक, आसाम, गुजरात, या विविध राज्यांमध्ये स्वत:च्या प्रोदेशिक भाषा आहे. त्यावरुन भाषिक प्रदेश निर्माण होतात.

**2) कोणत्या वैशिष्ट्यांच्या आधारावर प्रदेश वेगळे केले जातात ?**

**उत्तर -**

**1 प्रदेशाला स्थान असते :-**

प्रदेशाला भौगोलिक स्थान असणे आवश्क असते. हे स्थान वृत्तांनी दाखविता आला पाहिजे. सर्व प्रदेश प्राकृतिक किंवा सांस्कृतिक घटकांवर निर्माण होतात हे प्रादेशिक नावांनी व्यक्त होतात. उदा. उत्तर भारत, मध्य पूर्व, आग्नेय आशिया, मोसमी हवामान प्रदेश इ.

**2 प्रदेशाला स्थान असते :-**

प्रदेशाच्या एक संघतेच्या आधारे प्रदेशाचा विस्तार निश्चित होतो. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या समरुप आणि सांस्कृतिक वैशिष्ट्य असे असते. की त्याला अभिक्षेत्रीय विस्तार असतो. उदा.भारतीय द्वीकल्पीय पठार अफ्रिकेतील सहारा वाळवंट, लॅटीन अमेरिका हे प्रदेश पृथ्वीच्या पृष्ठभागाचे वैशिष्ट क्षेत्र असतात.

**3 प्रदेशाला सीमा असतात :-**

प्रदेशाला स्वत:ची सीमा असते. या सीमाकणांच्या पलीकडे दुसरा प्रदेश सुरु होतो. उदा. भारतीय उपखंडात जेथे हिमालय पवर्तरांगा आणि शिवालिक रांगा समाप्त होतात. तेथे सिंधू-गंगा मैदान सुरु होते. आणि जेथे गंगेचे मैदान संपते तेथे भारतीय द्विकल्पीय पठाराचा प्रारंभ होतो. याचप्रमाणे भारतामध्ये भाषिक प्रदेशाची विभागणी करता येते. उदा. मराठी, कन्नडी, तेलगू प्रदेशाचे सीमांकन करता येते.

**4 प्रदेशाला श्रेणीबद्ध उतरंड असते:-**

एखाद्या प्रदेशाची समान गुणधर्माच्या आधारे त्या प्रदेशाची श्रेणीबद्ध उतरंड करता येते. उदा. उत्तर भारतीय मैदान त्याचे उपप्रदेश.

**5 प्रदेशाला संक्रमण सीमा असतात :-**

सर्वसाधारणपणे प्रदेशाला सुस्पष्ट सीमा असत नाही. बऱ्याचे वेळा अशा सीमा संक्रमण अवस्थेमधील असतात. याचा अर्थ एखादे घटनादृश्य घटना दृश्यांशी अतिव्याप्ती होते. उदा. वाळवंटी प्रदेशात सर्वत्र वाळूच आढळत नाही तर जवळपासचा प्रदेश झुडपे, गवत या समिश्र स्वरुपात आढळतो.

**6) प्रदेश कार्यात्मक असू शकतात.**

काही प्रदेश कार्यबंधनामुळे एकत्र आलेले दिसून येतात उदा. पुणे महानगर प्रदेशात अनेक प्राकृतिक प्रदेश राजकीय प्रदेश खेडी,तालुके, शहरे येतात ही क्षेत्रे आर्थिक क्रियांमुळे एकमेकांशी बांधलेली आहेत. भाजीपाला, फुले, फळे या सेवा मुख्य शहराला आजूबाजूच्या प्रदेशाकडून पुरविला जातात अशा पद्धतीने आपणास प्रदेशाची वैशिष्टये थोडक्यात सांगता येईल

**3) दरडोई उत्पन्न हे प्रादेशिक विकासाचे निर्देशक नाही स्पष्ट करा.**

**उत्तर-** दरडोई उत्पन्न म्हणजे एकूण लोकसंख्या व एकूण राष्ट्रीय स्थूल उत्पादन यांचे गुणोत्तरे होय. याचा अर्थ एकूण राष्ट्रीय उत्पन्नांच्या देशातील प्रती माणशी वाटा म्हणजे दरडोई उत्पन्न म्हटले जाते. अर्थात ही संकल्पना केवळ गणित संकल्पना असून दरडोई उत्पन्नाची मोजदाद केलेले उत्पन्न प्रत्येक व्यक्तीपर्यंत जाते किंवा पोहचतेच असे नाही. ही एक ढोबळ संकल्पना आहे.

दरडोई उत्पन्नातला एक दुसरा घटकही महत्तवाचा ठरतो जर प्रदेशात विकासाच्या पातळीत खूप जास्त विषमता असेल, तरी देशातील काही प्रांत,प्रदेश आणि काही लोकच या विकासाचे भागीदार असतील आणि त्या विकासाचा त्यांना प्रत्यक्ष लाभ होत असेल तरी दरडोई उत्पन्नाच्या वितरणात प्रादेशिक विषमता ही कुठल्याही प्रकारे गृहित धरली जात नाही. त्यामुळे खूप जास्त प्रादेशिक विषमता असेल तरी दरडोई उत्पन्नाची संख्या जास्त येवूनही प्रत्यक्षात खूप जास्त लोकसंख्या दारिद्रयरेषे खालील असण्याचा संभव आहे.

याचा अर्थ दरडोई उत्पन्न हा प्रादेशिक विकासाचा एकमेव निर्देशक होऊ शकत नाही. शिक्षणाच्या संधी साक्षरतेचे प्रमाण, आरोग्याच्या सेवा सुविधा, गुन्हेगारिचे प्रमाण, रोजगाराच्या संधी, आर्युमान आणि प्रत्यक्ष क्रयशक्ती अशा इतर अनेक घटकांचा विचारही प्रादेशि विकासाचे निर्देशक ठरवताना कराव लागेल.

# 8 स्वरुप व व्याप्ती

**प्र.1 अ) अचूक पर्याय निवडा.**

**1. प्राकृतिक भुगोल ----------------- घटकावर आधारीत आहे.**

अ) मानवी, ब) नैसर्गिक, क) प्रादेशिक, ड) सांस्कृतिक

**उत्तर**- ब) **नैसर्गिक**

**2. हवामानशास्त्र व ----------------- यांचा निकटचा संबंध आहे.**

अ) सागरशास्त्र, ब) खगोलशास्त्र, क) वातावरण, ड) भूगर्भयशास्त्र

**उत्तर**- क) **वातावरण**

**3. सागरशास्त्रात ---------------- हा अभ्यासविषय आहे.**

अ) घनता, ब) मृदा, क) क्षारता, ड) सुपीकता

**उत्तर**- क) **क्षारता**

**4. निसर्ग हा सर्वश्रेष्ठ आहे ही विचारसरणी ------------------ या नावाने ओळखली जाते.**

अ) निसर्गवाद**,** ब) संभाव्यवाद**,** क) शक्यतावाद**,** ड) अद्वैतवाद

**उत्तर**- अ) **निसर्गवाद**

**5. मानवी भूगोलाची ------------------- ही शाखा आहे.**

अ) हवामानशास्त्र, ब) खगोलशास्त्र, क) लोकसंख्या भूगोल, ड) प्राकृतिक भूगोल

**उत्तर-** क) लोकसंख्या भूगोल

**6. सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विषयांचा अभ्यास करणारी भूगोलाची मुख्य शाखा**

अ) आर्थिक भूगोल ब) प्राकृतिक भूगोल **क) मानवी भूगोल** ड) राजकीय भूगोल

**उत्तर- क) मानवी भूगोल**

**प्र. 1 ब) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

**1. मानवी भूगोलाच्या विविध शाखा- उपशाखा आहेत**

**उत्तर-** हे विधान - **बरोबर** आहे

**2. भूगोल या विषयाचे स्वरुपाचे स्थिर, अचल आहे**

**उत्तर-** हे विधान - **चूक** आहे

**3. भूगोल या विषयाचे स्वरुप द्वैतवादी आहे.**

**उत्तर-** हे विधान - **बरोबर** आहे.

**4. भूगोल अभ्यासकास संगणकाचे ज्ञान असणे गरजेचे नाही.**

**उत्तर-** हे विधान - **चूक** आहे

**प्र. 1) क अचूक गट ओळखा**

| **अ गट** | **ब गट** | **क गट** | **ड गट** |
|---|---|---|---|
| भुरुपशास्त्र | **नकाशाशास्त्र** | पर्यटन | राजकीय भूगोल |
| हवामानशास्त्र | **सर्वेक्षण** | वनसंवर्धन | प्राकृतिक भूगोल |
| जैव भूगोल | **माहिती संकलन** | वन्य प्राणी संवर्धन | लोकसंख्या भूगोल |
| ऐतिहासिक भूगोल | **GIS / GPS** | संस्कृती संवर्धन | आर्थिक भूगोल |

**उत्तर- ब गट) नकाशाशास्त्र सर्वेक्षण माहित संकलन GIS / GPS**

**2 )**

| **अ गट** | **ब गट** | **क गट** | **ड गट** |
|---|---|---|---|
| **पर्वत** | हवा | परिसंस्था | नदया |
| **मैदाने** | हवामान | अन्नसाखळी | सरोवरे |
| **पठारे** | वारे | परिसंस्थिकीय संतुलन | महासागर |
| **सागरी गुहा** | सागर | मानवी वंश | वाहतुक |

**उत्तर- ब गट) पर्वत मैदाने पठारे सागरी गुहा**

**प्र. 2) भौगोलिक कारणे लिहा.**

**1) मानवी भूगोलाचे स्वरुप विभिन्न शाखांशी निगडित आहे.**

**उत्तर- 1. भूगोल या विषयाच्या प्राकृतिक व मानवी भूगोल अशा प्रमुख दोन शाखा आहेत.**

2. मानवी भूगोलात नैसर्गिक घटक व मानव यांच्यातील परस्पर आंतरक्रियांचा अभ्यास अंतर्भूत असतो.

3. मानवाच्या आर्थिक क्रिया नैसर्गिक घटकांना अनुसरुन केल्या जातात. उदा. मासेमारी या व्यवसायाची समुद्र किनारी प्रदेशात वाढ होऊ लागते.

4.मानवाची वर्तणूक, देशाचे राजकीय धोरण तसेच समाजाच्या रुढी, प्रथा व परंपरा इ. अभ्यास मानवी भूगोलाच्या विविध शाखेत होतो.

5. मानव व निसर्ग यांच्यातील आंतरक्रिया स्थळ- काळ परत्वे भिन्न असतात. याशिवाय त्यांचे वितरण ही भिन्न असते.

6.म्हणूनच मानवी भूगोलाचा संबंध सामाजिक शास्त्रातील वेगवेगळया शाखांशी निगडित आहे.

**2) भूगोल विषयाचे स्वरुप गतिशील आहे.**

**उत्तर-** 1.भूगोल या विषयात भौगोलिक घटक व मानवी घटकांचा अभ्यास केला जातो.

2. मानव भौगोलिक घटकांना अनुसरुन स्वत:चे जीवन व्यतीत करीत असतो.

3. तसेच प्राकृतिक आणि सांस्कृतिक घटक हे स्थिरन असत नाहीत. काळानुसार त्यात बदल हात असतात.

4. त्यामुळे काळ व स्थळानुसार बदलत जाणाऱ्या प्राकृतिक  व सांस्कृतिक घटकांतील बदलांचा  अभ्यास भूगोल विषयात केला जातो.

5. त्यामुळे भूगोल विषयाचे स्वरुप गतिशील आहे.

**3) भूगोल विषयाचे स्वरुप द्वैतवादी आहेत.**

**उत्तर**- 1. भूगोल या विषयांत दोन परस्पर विरोधाभासी दृष्टीकोन प्रचलित आहे.

2. निसर्गवाद या विचार सरणीचे पुरस्करकर्ते हे निसर्गाला सर्वश्रेष्ठ मानतात. मानवाला निसर्गावर विजय मिळवता आला नाही. उदा. मानव भूकंप थांबवू शकत नाही.

3. संभाव्यवाद या विचार सरणीचे पुरस्कर्ते हे मानवाला सर्वश्रेष्ठ मानतात. मानव निसर्गातील शक्यता शक्यता ओळखून निसर्गातील शक्यता ओळखून निसर्गावर ताबा ठेऊ शकतो. उदा. धरण बांधून महापुर थांबवला.

4. या दोन्ही विचार सरणी बरोबर वाटतात. पण या विचार सरणी एकामेंकाविरुद्ध असल्यामुळे भूगोल विषयांचे स्वरुप द्वैतवादी बनले आहेत.

**प्रश्न 3 रा) फरक स्पष्ट करा.**

**1) प्राकृतिक भूगोल आणि मानवी भूगोल**

**उत्तर-**

| **उत्तर** | **प्राकृतिक भूगोल** | **मानवी भूगोल** | |
|---|---|---|---|
| i | पृथ्वीवरील नैसर्गिक घटकांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. | i | नैसर्गिक घटक यांच्यातील आंतकक्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. |
| ii | प्राकृतिक भूगोलाच्या स्वरुपशास्त्र, हवामानशास्त्र, जिवभूगोल, मृदाभूगोल इ. शाखा आहेत. | ii | मानवी भूगोलाच्या लोकसंख्या भूगोल, सामाजिक भूगोल, वर्तणुकीचे भूगोल, आर्थिक, राजकीय व ऐतिहासिक, भूगोल इ. शाखा आहेत. |
| iii | प्राकृतिक भूगोलात नैसर्गिक घटकांत स्थ-काळपरत्वे असणाऱ्या भिन्नतेची कारणमीमांसा केलेली असते. | iii | मानवी भूगोलात नैसर्गिक घटक व मानवी यांचा असणारा संबंध व त्याचे दोन्ही घटकांवर होणारे परिणाम यांची कारणमीमांसा केलेली असते. |

**2) निसर्गवाद आणि संभाव्यवाद.**

| **उत्तर** | निसर्गवाद | | **संभाव्यवाद** |
|---|---|---|---|
| **i** | निसर्ग हा मानवापेक्षा श्रेष्ठ आहे. यास निसर्गवाद असे म्हणतात. | **i** | मानव हा निसर्गापेक्षा श्रेष्ठ आहे. यास संभाव्यवाद असे म्हणतात. |
| **ii** | निसर्ग हा क्रियाशील आहे. असे ही विचारसरणी मानते. | **ii** | मानव हा क्रियाशील आहे असे ही विचार सरणी मानते. |
| **iii** | निसर्गाच्या अधिन राहून मानवाने जीवन जगावे अससे निसर्गवाद पुरस्कर्ते मानतात. | **iii** | निसर्गाने उपलब्ध करुन दिलेल्या शक्यता किंवा संभावना मानवाने निवडाव्यात व प्रगती करावी असे संभाव्यवाद पुरस्कर्ते मानतात. |

**प्रश्न. 4 ) टीपा लिहा.**

**1. प्राकृतिक भूगोल विज्ञानाच्या विविध शाखांमधील संबंध :**


**उत्तर-**

प्राकृतिक भूगोल विषायाचा विज्ञानातील भूगर्भशास्त्र वातावरणशास्त्र, जीवशास्त्र, मृदाशास्त्र इ. शाखेशी संबंध येतो. शिलावरणाचा अभ्यास करीत असतांना भूशास्त्रातील खडक संरचना खडकातील गुणधर्म पृथ्वीचे अंतर्गत रचना इ. घटकांचे ज्ञान आवश्यक असते. कारण भूउठाव निर्मिती प्रक्रिया प्रामुख्याने शिलावरणावर घडून येत असते. वातावरणातील विविध घटक वातावरण संरचणा हवा, हवामान इ. घटकांचा अभ्यास प्राकृतिक भूगोलाच्या हवामान शास्त्र या शाखेत केला जातो. वनस्पती, प्राणी या सारख्या सजीव घटकांचा समावेश जीवशास्त्र या विषयांत सुद्धा होतो. परंतु जैवभूगोल या विषयांत सजीव व पर्यावरण परिसंस्था त्यांचे अन्नचक्र या गोष्टी अभ्यासल्या जातात. मृदा निर्मिती प्रक्रिया तिचे प्रकार इ. घटकांचा अभ्यास करीत असतांना मृदाशास्त्रातील घटकांचे ज्ञान आवश्यक असते त्यामुळे प्राकृतिक भूगोलाचा विज्ञानातील विविध शाखांशी संबंध येतो.

**2. भूगोलातील आधुनिक कल :-** भूगोल या विषयांत मुलभूत घटकांचा कार्यकारण भाव तपासला जातो त्याकरीता सांख्यिकीय माहितीचे संकलन व विश्लेषनाचा वापर होऊ लागला आहे. संकलित केलेल्या माहितीच्या विश्लेषणाकरीता मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान, संगणक इत्यादीचा वापर वाढला आहे. नकाशा निर्मिती करीता मोठया प्रमाणात GIS आणि GPS तसेच सदुर संवेदन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. भविष्यकालीन लोकसंख्या वाढ औद्योगिकरण हवामान बदल यासारख्या गोष्टींच्या अंदाजाकरीता

उपयोजित भूगोलांमध्ये विविध ॲप तसेच गणितीय व संगणकीय प्रतिकृतिंचा वापर होऊ लागला आहेत. अशा रितीने भूगोल विषयात नवनवीन बदल होत आहेत.

**3. भूगोल अभ्यासासाठी लागणारे कौशल्य :-** भूगोलाच्या अभ्यासाकरीता प्रथमत: निरीक्षण करणे हे कौशल्य असावे लागते. निसर्ग ही एक प्रयोगशाळा असून निसर्गातील घटकांचे अचूक निरीक्षण करता आले पहिजे. निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे संकलन करता येणे गरेजेचे आहे. संकलित केलेल्या माहितीचे सांखिकीय पध्दतीद्वारे विश्लेषण करावे . विश्लेषित माहितीच सादरीकरण  करतेवळी अचूक नकाशे आलेखाचा वापर करता यावा. सवेक्षण करण्याकरीता उपकरणांची हाताळणी करता यावी ही सर्व कौशल्ये भूगोल अभ्यासकासाठी आवश्यक आहेत.




**प्रश्न 5ऋ  था - सविस्तर उत्तरे लिहा**

**1. दैनंदिन जिवनात जगतांना आपल्याला भूगोलाचा कसा उपयोग होतो ते उदाहरणासह स्पष्ट करा.**

**उत्तर-**

I. भूगोल हा विषय पृथ्वीशी संबंधित अभ्यास करीत असल्यामुळे पृथ्वीवरील मानवास तो दररोज उपयोगी पडत असतो.

II. एखादया नवीन शहरात गावात किंवा प्रदेशात गेल्यास तेथे दिशा ओळखण्यास भूगोलाच्या ज्ञानाचा उपयोग होतो. उदा. शिमला येथील दिशा आकलन.

III. शीतकटिबंधात घरे बांधतेवेळी सुर्याभिमुख विचारात घेतात. उदा. युरोपियन देश.

IV. जागतिक व स्थानिक हवामानातील बदलांनुसार आपण आपले आचरण, व्यवहार करीत असतो. उदा. पावसाळा ऋतुमध्ये रेनकोट वापरणे, हिवाळा ऋतुमध्ये स्वेटर वापर करणे इत्यादी.

V. एखादया नवीन शहरात नकाशाच्या मदतीने अचुक ठिकाणी शोधता येतात.  उदा. दिल्ली शहरातींल लोटस मंदीर.

VI. जमीन प्रकारानुसार पिक लागवड करतांना भूगोलिक ज्ञान उपयोगी ठरते. उदा. खडकाळ किंवा मुरमाड जमिन प्रकार असल्यास फळ लागवडीस योग्य असतो.

VII. एखादया उत्पादीत मालाची बाजारपेठ कुठे आहे ते समजते. उदा. सांगली येथील हळद बाजारपेठ.

VIII. नकाशातील वाचनावरुन त्या प्रदेशाची उंची, उतार, सांकेतिक खुणांच्या मदतीने मंदीरे मशिदी, लोहमार्ग इत्यादी घटकांचे आकलन होते. अशा रितीने भूगोलाच्या ज्ञानाच्या आपणांस उपयोग होतो.

**2) भूगोलाच्या इतर विषयांशी असलेला संबंध स्पष्ट करा.**

**उत्तर-**

i. भूगोल या विषयाचा विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्याशी संबंध आहेत.

ii. विज्ञानातील भगर्भशास्त्र, वातावरणशास्त्र, जीवशास्त्र, मृदाशास्त्र यांच्याशी संबंध येतो.

iii. भूगोलामध्ये पृथ्वीचे अंतरंग किंवा शिलावरणाचा अभ्यास करतेवेळी भूगर्भशास्त्रातील ज्ञानाची मदत होते. उदा. खडकांतील घटक, गुणधर्म व संरचना इ.

iv. वातावरणशास्त्रातील वातावरणाचे थर, वातावरणाचे घटक संरचना, हवेची हालचाल, वायुराशी, दाब, वारे इत्यादी घटकांचा अभ्यास भूगोल विषयांत केला जातो.

v. पृथ्वीवरील वनस्पती, प्राणी, मृदेचे घटक व गुणधर्म इत्यादींचा अभ्यास भूगोलामध्ये समाविष्ठ असतो.




iv. सामाजिक शास्त्रातिल लोकसंख्या समाजशास्त्र, मानसशास्त्र , अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास इ. विषयांशी भूगोल विषय जोडला जातो.

vii. लोकसंख्येची वैशिष्टये ही लोकसंख्या भूगोलात तसेच समाजातील चालीरिती, परंपरा धर्म इत्यादी घटक सामाजिक घटक भूगोलात आणि मानवी वर्तणुक विचार क्षमता इ. वर्तणुक भूगोलात अभ्यासतात.

viii. याशिवाय मानवाच्या आर्थिक क्रिया ह्या आर्थिक भूगोलात व देशाचे राजकीय डावपेज, ध्येय , धोरणे, इ. राजकीय भूगोलात अभ्यासले जातात.

ix. गणित व संख्याशास्त्र यांतिक आकडे मोडीचा उपयोग करुन भौगोलिक सिध्दांत अभ्यासलेले दिसून येतात.

**3) भूगोलाचे स्वरुप सविस्तर स्पष्ट करा.**

**उत्तर-**

i. सुरुवातीस भूगोलाचे स्वरुप हे वर्णनात्मक होते निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विशेषत: प्राकृतिक घटकांची वर्णने केलेली दिसून येतात उदा. हेकेट्स यांच्या ग्रेस - पिरिऑड्स यांच्या पुस्तकात भूमध्य सागर बेटे इ. वर्णनात्मक माहिती उपलब्ध होते.

ii. कार्यकारण भावात्म्क स्वरुप हे भूगोलात स्पष्टपणे दिसून येते एखादी घटना घडते तर त्या घटनेमागे कोणते भौगोलिक कारणे आहेत हे शोधून काढले जातात.

iii. भूगोलामध्ये सैध्दांतिक स्वरुप दिसून येते. मानवी व प्राकृतिक घटकांशी संबंधितक अनेक सिध्दांत भूगोलात आहेत.

iv. प्राकृतिक व मानवी घटक स्थळ आणि काळ यांनुसार बदलत अतसात . त्यामुळे भूगोलाचे स्वरुप गतिशील बनते.

v. भूगोलामध्ये अनेक विरोधाभासी विचारसरणी प्रचलित आहेत.  उदा. निसर्गवाद व संभाव्यवाद अशा दोन्ही विचारसरणीमध्ये प्रत्येक विचारसरणीस अनुसरुन मते मांडली आहेत. त्यामुळे भुगोल विषयांचे स्वरुप हे द्वैतवादी बनले आहेत.

vi. भूगोल या विषयाचा संबंध अनेक वेगवेग्गळया विदयाशांखेशी येतो. उदा. भूगर्भशास्त्र अर्थशास्त्र, संख्याशास्त्र यामुळे भूगोलाचे स्वरुप आंतरविदयाशाखीय बनले आहे.

vii. भूगोलामध्ये मोठया प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. उदा. GIS, GPS, सुदूर, सवेदण इ.मुळे भुगोलाचे स्वरुप हे तांत्रिक बनले आहे.

# पाठयपुस्तका बाहेरील उतारे व त्यावरील प्रश्न उत्तरे

**1) उतारा क्र- 1**

कोळशाचे उपयोग

कोळसा हे ऊर्जेचे सर्वात महत्त्वाचे व एक स्वस्त साधन आहे. कोळशाचा उपयोग औष्णिक वीज निर्मितीमध्ये इंधन म्हणून केला जातो. जगातील एकूण वीजनिर्मितीमध्ये कोळशाचा हिस्सा 40% आहे. जगातील अनेक भागात कोळशाच्या उष्णतेवर पाण्याची वाफ तयार करून यंत्रे चालविण्यासाठी केला जातो. तसेच जहाज व रेल्वेतील वाफेच्या इंजिनामध्ये कोळशाचा इंधन म्हणून उपयोग केला जातो. विद्युत निर्मितीनंतर कोळशाच्या सर्वाधिक उपयोग पोलाद निर्मितीच्या उद्योगात केला जातो. पोलादाच्या निर्मितीमध्ये कोळशाचा उपयोग लोहखनिज वितळविण्यासाठी व त्यातील अशुद्धता दूर करण्यासाठी केला जातो. सिमेंट उद्योगामध्ये कोळशाचा उपयोग इंधन म्हणून केला जातो. कोळशाच्या उपघटकापासून अनेक प्रकारच्या रासायनिक पदार्थाची निर्मिती केली जाते. उदा. डांबर, फिनेल, बेनझोल, प्लास्टिक, डाईज, जंतूनाशक, खते इत्यादी. कोळशापासून निर्माण केलेल्या वायूचा उपयोग जैविक रसायने तयार करण्यासाठी केला जातो. आज देखील कोळशाचा उपयोग अन्न शिजविण्यासाठी व घर ऊबदार ठेवण्याकरिता, घरगुती इंधन म्हणून केला जातो.

**प्रश्न 1) कोळशाचा घरगुती वापर कोणता.**
**उत्तर-** कोळशाचा घरगुती उपयोग अन्न शिजविण्यासाठी व घर ऊबदार ठेवण्याकरिता होतो.

**2) जगातील वीज निर्मिती मध्ये कोळशाचा साधारण किती उपयोग होत आहे. ?**
**उत्तर-** जगातील एकूण वीज निर्मितीमध्ये कोळशाचा हिस्सा 40% आहे.

**3) कोळशाच्या उपघटकापासून तयार होणाऱ्या पदार्थांची यादी करा.**
**उत्तर-** कोळशाच्या उपघटकापासून अनेक प्रकारच्या रासायनिक पदार्थाची निर्मिती केली जाते. उदा. डांबर, फिनेल, बेनझोल, प्लास्टिक, डाईज, जंतूनाशक, खते इत्यादी.

**4) यंत्रे चालविण्यासाठी कोळशाचा वापर कशा प्रकारे केला जातो.**
**उत्तर**- कोळशाच्या उष्णतेवर पाण्याची वाफ तयार करून यंत्रे चालविण्यासाठी वापर केला जातो

**2) उतारा क्र- 2**

## उद्योगधंदे

कच्च्या मालाचे प्रक्रियेद्वारे उपयुक्त उत्पादनात केलेले रूपांतर म्हणजे वस्तूनिर्माण प्रक्रिया होय. प्राथमिक उत्पादनांचे दुद्वितीयक उत्पादनांमध्ये रूपांतर करणे म्हणजे उद्योगधंदे होय. कारण त्यामुळे कच्च्या मालाची गुणवत्ता व उपयोगिता वृद्धींगत होते. दुसऱ्या शब्दात, उद्योगधंदे ही सातत्याने चालणारी प्रक्रिया होय, की ज्यात कच्चा माल हा पक्क्या मालात रूपांतरित केला जातो. उद्योगधंदे वेगवेगळ्या प्रकारात विभागले आहेत. जसे की, कृषिवर आधारित खनिजांवर आधारित, वनांवर आधारित, इ. परंतु आपणास असे दिसून येते की, अलिकडील काळात ज्ञानावर आधारित उद्योगांची वाढ वेगाने झालेली आहे.

उद्योगधंद्याची सुरूवात ही सुमारे 17 व्या शतकापासून अधिक वेगाने झाली. औद्योगिक विकासास, वाफेचे इंजिन व चाकाचा शोध कारणीभूत ठरले. त्याचा परिणाम म्हणजे युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. उद्योगात व आर्थिक उत्पादनाला त्यामुळे कलाटणी मिळाली. सध्या असे निरीक्षणात येत आहे की, दिवसेंदिवस बदलणाऱ्या तंत्रज्ञान व यंत्रामुळे वस्तूनिर्माण प्रकारात वेगाने विकास व बदल घडून येत आहेत.

**1) उदयोगधंदे कोण-कोणत्या प्रकारात विभागले गेले आहेत ?**

**उत्तर-** उद्योगधंदे कृषिवर आधारित, खनिजांवर आधारित, वनांवर आधारित या प्रकारात विभागले आहेत.

**2) वस्तुनिर्माण प्रक्रियेत वेगवान कोणत्या कारणाने झाले आहेत ?**

**उत्तर**- दिवसेंदिवस बदलणाऱ्या तंत्रज्ञान व यंत्रामुळे वस्तूनिर्माण प्रकारात वेगाने विकास व बदल घडून येत आहेत

**3) वस्तु निर्माण प्रक्रिया म्हणजे काय?**

**उत्तर-** कच्च्या मालाचे प्रक्रियेद्वारे उपयुक्त उत्पादनात केलेले रूपांतर म्हणजे वस्तूनिर्माण प्रक्रिया होय

**4) औदयोगिक विकासात कारणीभूत ठरलेले घटक कोणते ?**

**उत्तर-** औद्योगिक विकासास, वाफेचे इंजिन व चाकाचा शोध कारणीभूत ठरले आहेत.

**उतारा क्र - 3**

भौगोलिक परिस्थितीमुळे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील मोठ्या प्रमाणात होणारे वस्तूंचे उत्पादन आणि दुसऱ्या प्रदेशातील तुटवडा हा व्यापाराला चालना देत असतो. व्यापाराचे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत व्यापार असे दोन प्रकार आहेत. विकासासाठी व्यापार हा संतुलित असणे अभिप्रेत आहे. व्यापाराच्या विकासात कोणत्या प्रकारच्या उत्पादनाचा व्यापार केला जात आहे यात बंदरांची भूमिका फार महत्त्वाची असते. जागतिक व्यापाराला चालना मिळावी, देशांतर्गत सहकार्य वाढीस लागावे आणि व्यापार वृद्धिंगत व्हावा यासाठी, काही आर्थिक संघटनांची निर्मिती झाली. त्यातील काही संघटना पुढील प्रमाणे आहेत. जागतिक व्यापार संघटना, युरोपियन संघ, आग्नेय आशियातील राष्ट्रांचा महासंघ, पेट्रोलियम उत्पादक आणि निर्यात करणारे देश, आशिया प्रशांत आर्थिक संघटना आणि सार्क संघटना इत्यादी.

**1) जागतिक आर्थिक संघटनेची निर्मिती कोणत्या**

**उत्तर-** जागतिक व्यापाराला चालना मिळावी, देशांतर्गत सहकार्य वाढीस लागावे आणि व्यापार वृद्धिंगत व्हावा यासाठी, काही आर्थिक संघटनांची निर्मिती झाली.

**2) आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्वाचा घटक कोणता.**

**उत्तर-** आंतरराष्ट्रीय व्यापारात बंदरांची भूमिका फार महत्त्वाची असते.

**3) व्यापाराला कोणत्या घटकांमुळे चालना मिळत असते.**

**उत्तर-** भौगोलिक परिस्थितीमुळे एखाद्या विशिष्ट प्रदेशातील मोठ्या प्रमाणात होणारे वस्तूंचे उत्पादन आणि दुसऱ्या प्रदेशातील तुटवडा हा व्यापाराला चालना देत असतो.

**4) व्यापाराचे मुख्य प्रकार किती व कोणते.**

**उत्तर**- व्यापाराचे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत व्यापार असे दोन प्रकार आहेत.

**उतारा क्र - 4**

व्यक्ती किंवा वस्तू यांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरण करणे म्हणजे वाहतूक होय. तर विचार किंवा कल्पनांचे स्थलांतरण म्हणजे संप्रेषण होय. कारखान्यांमध्ये प्रक्रिया करण्यासाठी कच्चा माल तर बाजारपेठांमध्ये वितरणासाठी पक्क्या मालाची ने-आण वाहतुकीच्या साधनांद्वारे होते.

प्राचीन काळापासून मानव दळणवळणाच्या साधनांच्या मदतीने मालाची ने-आण किंवा व्यापार करीत आला आहे. अगदी प्रारंभीच्या काळातील ओझेवाहक मानव ते प्राणी आणि नंतर हातगाडी ते आधुनिक वाहने अशा क्रमाने वाहतूक विकसित होत गेली. आजही ग्रामीणक्षेत्र, पर्वतीय प्रदेश, वाळवंट किंवा बर्फाच्छादित प्रदेशात प्राण्यांचा दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. वाहतुकीच्या पारंपरिक प्रणालीत शक्तिशाली इंजिने आणि गाड्यांच्या नवनवीन आविष्कारांमुळे क्रांती झालेली आहे. आधुनिक वाहनांमुळे वाहतुकीची केवळ गतीच नाही, तर भारवहन क्षमताही वाढली आहे. जलद वाहतूक प्रणालीमुळे लोक एकमेकांच्या अधिक संपर्कात आहेत.

**1) वाहतुकीच्या पारंपार कोणत्या घटकांमुळे क्रांती झाली?**

**उत्तर-** वाहतुकीच्या पारंपरिक प्रणालीत शक्तिशाली इंजिने आणि गाड्यांच्या नवनवीन आविष्कारांमुळे क्रांती झालेली आहे

**2) संप्रेशन म्हणजे काय?**

**उत्तर-** विचार किंवा कल्पनांचे स्थलांतरण म्हणजे संप्रेषण होय

**3) दळणवळणांसाठी आजही कोणत्या प्रदेशात प्रांण्याचा उपयोग होत आहे.?**

**उत्तर-** ग्रामीणक्षेत्र, पर्वतीय प्रदेश, वाळवंट किंवा बर्फाच्छादित प्रदेशात प्राण्यांचा दळणवळणासाठी उपयोग केला जातो.

**4) उदयोग व व्यापारात वाहतुकी सांधनांचा वापर कशा प्रकरे उपयोग होत आहे.**

**उत्तर-** कारखान्यांमध्ये प्रक्रिया करण्यासाठी कच्चा माल तर बाजारपेठांमध्ये वितरणासाठी पक्क्या मालाची ने-आण वाहतुकीच्या साधनांद्वारे होते.

## -* श्रेय नामावली *-

| सुलभकांचे नाव | पद | शाळेचे नाव |
|---|---|---|
| **प्रा. मनोज बाळासाहेब देशमुख** | उच्च. माध्य. शिक्षक | राष्ट्रीय ज्युनियर कॉलेज चाळीसगाव जि. जळगाव |
| **डॉ. हनमंत लक्ष्मण नारायणकर** | उच्च. माध्य. शिक्षक | चंद्रभागाबाई यलगुलवार कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर |
| **डॉ. संतोष गणपती जांभळे** | उच्च. माध्य. शिक्षक | यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, कोल्हापूर |
| **प्रा. दिपक संभाजी भोसले** | उच्च. माध्य. शिक्षक | राष्ट्रीय कन्याशाळा व ज्युनियर कॉलेज चाळीसगाव जि. जळगाव |